# मेहता मराठी ग्रंथजगत

सप्टेंबर, २०१६ । पृष्ठे १०० । किंमत १५ रुपये





## गणपती बाप्पा मोरया

वक्रतुण्ड महाकाय सूर्यकोटिसमप्रभ ।
निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा ।।

## नवं कोरं



# 'VIRTUALLY YOURS'

भास – आभासाच्या जंजाळात गोंधळलेल्या
मनोव्यापाराचा मागोवा

## 'मेहता मराठी ग्रंथ जगत'
२०१६

### दिवाळी अंकात ..

व्हर्च्युअल पिढीचे प्रतिनिधी मांडताहेत आभासी जगण्यातल्या कल्पनाविलास
'फारकतीचे फकीर', 'दुःखाचं ॲडीक्शन',
'निळ्या चमकदार काळोखातले अप – डाउन्स'
'सु'मंगलाष्टक', 'व्हर्च्युअली युवर्स', 'रिक्वेष्ट सेंट'
सारख्या अफलातून कथा ....
आणि
नव्या ढंगाच्या कवितांचा आस्वाद



**सहभाग :**

राहूल बनसोडे
राजू परुळेकर
बालाजी सुतार
अजिंक्य दर्शने
मंगेश सपकाळ
जुई कुलकर्णी

पृष्ठसंख्या : १३६
किंमत : ₹१००/-

मेहता पब्लिशिंग हाऊस
१९४१, सदाशिव पेठ, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, माडीवाले कॉलनी, पुणे-३०.
फोन - (०२०)२४४७६९२४, २४४७५४६२
mmgj@mehtapublishinghouse.com | www.mehtapublishinghouse.com

# मेहता मराठी ग्रंथजगत

। सप्टेंबर २०१६ । वर्ष सोळावे । अंक नववा ।

मांडणी-अक्षरजुळणी

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर,
पुणे - ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४
२४४७५४६२
Extension
(ग्रंथजगत विभाग) - २३८
E-mail : info@mehtapublishinghouse.com

संपादक
**सुनील मेहता**

कार्यकारी संपादक
**शंकर सारडा**

अंकाची किंमत **१५ रु.**

वर्गणी
**मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.**

प्रसिद्धी
**दरमहा ११ तारखेस**

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| संपादकीय | ४ |
| दिन विशेष | १० |
| उपक्रम | १४ |
| साहित्यवार्ता | २० |
| पुरस्कार | ५४ |
| *पुस्तक परिचय* | |
| चिकन सूप फॉर द फादर्स सोल भाग -१ | ६० |
| स्मरण | ८२ |
| श्रद्धांजली | ८८ |
| अभिप्राय | ९० |
| जिज्ञासू तथ्य! | ९४ |

**डिजिटल अंकाची वर्गणी : तीन वर्षांची ३००रु., पाच वर्षांची ४००रु.**

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.



## संपादकीय

# पोकेमान– अबालवृद्धांना वेड लावणारा गेम

हॅरी पॉटरसारख्या पुस्तकांवर आधारलेले चित्रपट गाजतात; लोकप्रिय होतात. आता पोकेमानसारखे चित्रपट लहानथोर प्रेक्षकांना गेम म्हणून आकृष्ट करीत आहेत. मूळ जपानी पोकेमान अनेक देशात प्रदर्शित होत आहेत. पुस्तकांप्रमाणे हे ॲनिमेटेड चित्रपटही भरपूर कमाई करीत आहेत. 'गेम'ला रंजन क्षेत्रात प्रतिष्ठित करीत आहेत.

हॅरी पॉटर, दि लॉर्ड ऑफ दि रिंग वगैरे फँटसींची चोखंदळ वाचकांना भूल पडली. लाखो प्रती खपल्या. लेखकांना त्यांनी श्रीमंत बनवले. त्या कादंबऱ्यांवर निघालेल्या चित्रपटांनी लक्षावधी डॉलर्स मिळवले. आपल्याला रसिकवाचक म्हणून या पुस्तकांनी अमाप आनंद दिला. गेल्या दोन-तीन महिन्यांपासून भारतीय माध्यमात आणि वृत्तपत्रात पोकेमान या कॉमिकवर आधारीत बातम्यांची चलती आहे. मूळ जपानी पोकेमॅन वेगवेगळ्या भाषांमधून वेगवेगळ्या देशात दाखविण्यासाठी मार्केटिंगचे प्रभावी तंत्र वापरले जात आहे. तरुणवर्ग समोर ठेवून पोकॅमॅनची निर्मिती चालू आहे. गेम फ्रीक या संस्थेने दरवर्षी एक चित्रपट असे धोरण ठेवून १९९८ पासून जपानमध्ये पोकेमॉनचा प्रचार चालवला आहे. पोकेमॉन हा एक रंजक खेळ आहे. त्याची निर्मिती निनटेंडू या व्हिडिओ गेम्स उत्पादक संख्येने केली आहे. मुद्रित पुस्तकाच्या रूपातही कादंबरी म्हणून पोकेमानची कीर्ती गाजत आहे. इ.स. २००५ पर्यंत २०

कोटी प्रतींची मजल पोकेमानने मारली आहे. पोकेमनने फ्रँचाइजी देऊन वेगवेगळ्या उत्पादकांना निर्मिती आणि वितरण यांचे हक्क दिले आहेत. मे २००६ पर्यंत या मार्गाने ४६.२ अब्ज डॉलर्सची कमाई झाली आहे. मोबाइलने पोकेमॅनच्या वापराला मोठीच चालना मिळाली. नोव्हेंबर २०१६ मध्ये जनरेशन गेम्स बाजारात आणण्यात येणार आहे. या मालिकेची मूळ कल्पना रेड अँड ग्रीन पिकर मॉन्स्टर्सची होती, सातोशी ताजिरी आणि केन सुगमोरी यांचेही मोठे योगदान होते.

पोकेमन या गेममध्ये ट्रेनर्स हे प्रशिक्षित क्रीडापटू खेळाडूंना बागबगीचे, प्रेक्षणीय स्थळे, कॉलेज, वनराई, तलाव व सरोवरे, गजबजलेले रस्ते वगैरे ठिकाणी मोबाईलवरून 'अमुक पोकेमॉनला स्मार्टफोनच्या स्क्रीनवर पो--वॉल फेकून तो पकडायचा. अमुक जागेजवळ दिसला होता... त्याला पकडून मारता आले तर बघा. म्हणजे तुम्हाला पॉइंट्स मिळतील. त्या पॉइंट्सच्या प्रमाणात तुम्हाला वरिष्ठ स्थान मिळेल. असे नोटिफिकेशन येते. चित्रविचित्र प्राणी वा कीटक गोळा करणे आणि लढाई करून आपल्या शत्रूचा खात्मा करणे ही खेळआची दोन उद्दिष्टे आहेत. आपल्या भागातील सर्व पोकेमॉनना एकत्र आणणे आणि त्यांच्यावर बॉल फेकून हल्ला करणे; शत्रूला सावध करणे किंवा शत्रूकडे इतर स्पर्धकांचे लक्ष वेधणे. क्रिकेटमध्ये जसा धावफलक असतो तसाच या गेममध्येही हिशेब ठेवला जातो. खेळताना कधी कधी खेळाडूंना मार लागतो, चक्कर येते, जखम होते. बॉल ट्रेनरचा आदेश सर्वांना पाळावा लागतो. पोकेमानने आपल्या प्रतिस्पर्ध्यावर हल्ला करताना कधीही प्राणघातक शस्त्र वा साधन वापरता कामा नये. प्रतिस्पर्ध्याचा पाठलाग करताना मोबाइलवरून मिळणाऱ्या सूचना किंवा आदेश पाळण्यात चूक केली तर रस्त्यावरील वाहनाखाली येऊन त्याला इजा होऊ शकते. तेव्हा पोकेमानने सावधगिरी बाळगणे इष्ट.

'पोकेमॅन गो'मध्ये आभासी वास्तवाचा वापर करण्यात आला आहे. तुमच्या मोबाइल स्मार्ट फोनच्या स्क्रीनवर दिसणाऱ्या पोकेमनला

पोकिबॉल नेम धरून टिपला तर तुम्हाला त्याबद्दल पॉइंट्स मिळतात. ज्याचे पॉइंट्स जास्त त्याला अर्थातच यशस्वी म्हणून गौरवण्यात येते. पोकेमॉनच्या प्रत्येक पिढीत काहीतरी नवे वैशिष्ट्य असते. प्रत्येक पिढीमध्ये त्यांनी विशिष्ट संख्या असते. त्यामुळे नवी आवृत्ती आली की, ती विकत घेऊन अद्ययावत राहावे लागते. विल्वागार्डन या संकेत स्थळावरील पोकेमानला इंटरनेटचा सर्वांत जास्त तपशील असणारा डाटाबेस प्रोजेक्ट असे मानले जाते.

पोकेमानचा पहिला चित्रपट म्युटोबा स्ट्राइक्स बॅक १९९६ मध्ये प्रदर्शित झाला. २००० दि पॉवर ऑफ वन, स्पेल ॲल दि अननोन हे चित्रपट इ.स. २००० पर्यंत निघाले. व्हाइस ऑफ दि फॉरेस्ट (२००१), हीरोज (२००२), जिराची वुइश मेकर (२००३), डेस्टिनी डिओक्स (२००५), ल्यु कार्टो, रेंजर अँड टेंपल ऑफ दि सी, दि राइस ऑफ डार्क (२००७), ब्लॅक व्हिक्टिम, मास्टर ऑफ इल्युजन्स (२०१०) वगैरे नावांवरूनही कथावस्तूच्या वेगळेपणाची कल्पना येईल. लक्षावधी मोबाइलधारक स्मार्ट फोनवरून हे चित्रपट बघत असतात. अमेरिकन राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक लढवणाऱ्या हिलरी क्लिंटनने आपल्या प्रचारासाठी मोबाइलचा वापर केलेला आहे.

पोकेमानचे नियम पाहून हा गेम खेळावा लागतो. जिंकणाऱ्या खेळाडूंना लक्षावधी डॉलर्सची बक्षीसे मिळतात. आधुनिक मार्केटिंग तंत्राचा वापर करण्यात आला. अमेरिका-युरोप यांची मक्तेदारी उरणार नाही, चिनी-जपानी (आणि भारतीयही पुस्तके, चित्रपट, फँटसी, गेम शो, टीव्ही वगैरे माध्यमे यात मागे राहणार नाहीत असे मानायला हरकत नाही. या सर्व माध्यमांच्या परस्पर संपर्काने केवळ पुस्तकांपुरते लेखन सीमित राहणार नाही. पोकेमानने जागतिक करमणूक क्षेत्राच्या सीमा व्यापक केल्या आहेत; ही बाब लक्षात घेऊन त्याच्या संहितेत नावीन्य आणत राहावे लागेल.



# मेहता मराठी ग्रंथजगत

## विशेष...

दि. १ मार्च, २०१६ पासून
मेहता पब्लिशिंग हाऊस
'मेहता मराठी ग्रंथजगत'ची
वार्षिक वर्गणी
बंद करीत आहोत.
तरी आपण
त्रैवार्षिक किंवा पंचवार्षिक वर्गणी
पाठवून सहकार्य करावे,
ही विनंती.

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

त्रैवार्षिक वर्गणी ३५०रुपये / पंचवार्षिक वर्गणी ५००रुपये

## वाचकांसाठी सुवर्णसंधी!

# WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

## बेळगाव / कोल्हापूर / औरंगाबाद

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स अन्यही बरेच काही आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे. सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

बेळगाव, कोल्हापूर, औरंगाबाद येथील वर्डपॉवरचा पत्ता पुढीलप्रमाणे

पहिला मजला, खानापूर रोड, भंडारी कॅपिटल, कॉसमॉस बँकेच्या वर, खानापूर रोड, टिळकवाडी, बेळगाव-५९०००६. टेलिफोन क्र. (०८३१)-४२००६७६

शॉप नं १, ग्राऊंड फ्लोअर, अथर्व एम्पाअर, ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६००३. टेलिफोन क्र.(०२३१)-६६१७६२५/२६

स्टार बझार, पुणे-बेंगलोर हायवे, कोल्हापूर – ४१६००१

शॉप नं. - जी/१५, प्रोझोन मॉल, चिखलठाणा, एमआयडीसी, औरंगाबाद - ४३१००६.

अधिक माहितीसाठी संपर्क

www.wordpowerbookshop@gmail.com

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, युपीएसी, एमपीएसी, सेट-नेट, इंजीनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ **(शनिवारी बंद)**
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१

Email : mehtabooksellers@gmail.com

GET IT ON Google Play आणि dailyhunt

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी,
सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

eBooks





दिन विशेष

# लोकशाहीचे पाईक होऊ या!

जगभरातील लोकशाही राष्ट्रांना चालना आणि सर्व लोकांना विशेषत: युवक-युवतींना लोकशाहीचे महत्त्व पटवून देण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने २००७मध्ये दरवर्षी लोकशाही दिन साजरा करण्याचा निर्णय जाहीर केला. त्यानुसार लोकशाही शासन व्यवस्था असणाऱ्या देशांनी १५ सप्टेंबर रोजी लोकशाही दिनानिमित्त विविध उपक्रमांद्वारे नागरिकांमध्ये लोकशाहीबद्दल आस्था निर्माण करावी, असे ठरवण्यात आले.

'लोकांनी, लोकांसाठी, लोकांकडून चालवली जाणारी शासन-व्यवस्था' म्हणजे लोकशाही होय. नागरिकशास्त्रामध्ये शिकवली जाणारी ही छोटी व्याख्या तीन वेळा 'लोक' शब्द आल्याने सहज लक्षात राहते. पुढे जीवनात कसा अनुभव येतो हा भाग वेगळा! लोकशाही म्हणजे सर्व नागरिकांना (लोकांना) आचार, विचार आणि उच्चार (किंवा अभिव्यक्तीचे) स्वातंत्र्य म्हणजेच हक्क; अर्थात त्यामध्ये सार्वजनिक बंधने आणि कर्तव्याचे पालन अभिप्रेत आहे, हे कायम लक्षात ठेवायला हवे. किंबहुना हक्कांविषयी जागरूकतेने मागणी करताना कर्तव्याची जाणीव हवी हे ओघाने आलेच!

स्वातंत्र्य आणि समानतेमधून सार्वजनिक जीवनात सर्वांची प्रगती व्हावी, सर्वत्र शांतता नांदावी हा लोकशाहीचा प्राथमिक हेतू आहे. आपले स्वातंत्र्य उपभोगताना इतरांचे स्वातंत्र्य अबाधित राखणे हे लोकशाहीचे मूलभूत तत्त्व आहे. नागरी समाज अर्थात सर्व लोक हा लोकशाहीचा प्राण आहे. एकूण, सामाजिक प्रगती आणि देशाच्या आर्थिक विकासाला तो प्रेरणादायी ठरतो. तसेच आर्थिक व सामाजिक-

दृष्ट्या दुर्बल घटकांचे हित साधण्यात नागरी समाज महत्त्वाची भूमिका बजावतो. आर्थिक समृद्धी आणि राष्ट्रीय उत्पन्नाचे न्याय्य वाटप म्हणजेच समाजातल्या अगदी गरीब माणसाच्या मूलभूत गरजा पूर्ण होणे, हा लोकशाहीचा मुख्य उद्देश असतो.

राजेशाही, हुकूमशाही आणि लोकशाही अशा विविध राजपद्धतींमध्ये लोकशाही राज्यपद्धती सुवर्णमध्य असल्यासारखी सर्वांत चांगली समजली जाते. अर्थात लोकशाही स्वीकारल्यावर देशातील सर्व समस्या व आव्हानांचे चुटकीसरशी निराकरण होईल असे नाही. प्रत्येक देशामध्ये तेथील परिस्थितीनुसार उद्‌भवणारे प्रश्न सोडवण्यासाठी लोकशाहीची मूलभूत तत्त्वे आत्मसात करणे आणि त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी व्हायला हवी; तरच त्याचे अपेक्षित सुपरिणाम दिसतील, हे ध्यानात घ्यायला पाहिजे. सरकार हे लोकांचे सेवक व त्यांच्या हक्कांचे संरक्षक असून, लोकहितासाठी काम करणारी संरचना आहे. किंबहुना राजकीय क्षेत्रात ही लोकशाहीची गृहीत तत्त्वे आहेत. यामध्ये लोक सार्वभौम असून, लोकमताचा आदर करणे अपेक्षित आहे. प्रत्यक्षात पाहिले असता अद्याप अनेक देशांत लोकशाहीने मूळ धरलेच नाही; साहजिकपणे तेथील लोकांच्या जीवनावर त्याचा अतिशय विपरीत परिणाम झाला. त्यांची प्रगती खुंटली. भारतासारख्या लोकशाहीचा पुरस्कार करणाऱ्या देशांत काही प्रमाणात ती यशस्वी ठरली, म्हणजे आपण लोकशाही मूल्ये अंगीकारली किंवा देशात लोकशाहीची मूलभूत तत्त्वे रुजली असे नाही; कारण आर्थिक उन्नतीचे लाभ सर्वार्थाने तळागाळापर्यंत पोहोचले नाहीत, असे दिसून येते. स्वातंत्र्य, समता व बंधुता यांचा सर्वत्र जयघोष केला जातो; पण भारतातील अनेक राज्यांत अद्याप सरंजामशाहीचे वातावरण असल्याचे दिसते; त्यामुळे भारतासह अन्य आशियाई राष्ट्रे आणि इतर विकसनशील देशांमध्ये लोकशाहीचे मजबुतीकरण करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येक नागरिकाला आपल्या हक्कांची तसेच त्याबरोबर येणाऱ्या कर्तव्याची जाणीव करून देणे हा 'लोकशाही दिन' साजरा करण्याचा प्रमुख हेतू आहे. तो साध्य करायला आपण सारे लोकशाहीचे पाईक होण्याचा संकल्प करू या.

# लोकशाही दिन

सर्वसामान्यांच्या योग्य समस्यांचे निराकरण व्हावे, त्यांना न्याय मिळण्यासाठी निकोप व्यासपीठ उपलब्ध व्हावे या दृष्टीने राज्य शासनातर्फे दर महिन्याला विशिष्ट दिवशी ‘लोकशाही दिना’चे आयोजन केले जाते. जर या दिवशी शासकीय सुट्टी असेल तर लोकशाही दिनाचा नवा कार्यक्रम जाहीर केला जातो.

महापालिका, नगरपालिका, जिल्हाधिकारी कार्यालय तसेच तालुका पातळीवर तहसीलदार यांच्या कार्यालयातही लोकशाही दिनी नागरिक कोणत्याही शासकीय विभागाविषयी लेखी तक्रार करू शकतात. यावेळी विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित असतात. शक्यतो जागेवरच समस्यांची सोडवणूक केली जाते. तसेच नागरिकांकडून आलेल्या तक्रारी ज्या त्या खात्याकडे पाठवल्या जातात आणि त्यांचा पाठपुरावाही केला जातो.

लोकशाही दिनाच्या कार्यक्रमावर देखरेखीसाठी विभागीय आयुक्त कार्यालयातून निरीक्षक नेमला जातो. लोकशाही दिनी आलेल्या तक्रारींपैकी किती तक्रारी सोडविल्या याचा आढावा संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यास पुढील लोकशाही दिनी सादर करावा लागतो.

या माध्यमातून प्रशासन अधिकाधिक लोकाभिमुख करण्याचा आणि नागरिकांच्या समस्या तातडीने सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न शासनाने चालवला आहे. सर्वसामान्य लोकांना आपल्या तक्रारींचे निराकरण करून घेण्यासाठी मिळालेले हे प्रभावी साधन आहे. डोळसपणे त्याचा वापर करून सामान्य नागरिकांनी आपल्या समस्या सोडवून घ्याव्यात.

**– उदय हर्षे**

**नवं कोरं**

# हरवलेल्या मंदिराचे रहस्य

मूळ लेखक : **सुधा मूर्ती**

अनुवाद - **लीना सोहोनी**

**किंमत : १६०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**




भारताच्या लाडक्या कथाकार सुधा मूर्ती यांच्या लेखणीतून साकार झालेली एक नवी साहसकथा.

शहरात वाढलेली मुलगी अनुष्का सुट्टीत आपल्या आजी-आजोबांच्या गावी येते. खेड्यातलं संथ जीवन बघून तिला आश्चर्याचा धक्का बसतो; पण ती लगेचच तिथे रुळते. तिथल्या वेगवेगळ्या गोष्टींमध्ये ती सहभागी होऊ लागते. पापड बनवणं, सहलीला जाणं, सायकल चालवायला शिकणं आणि नव्या मित्र-मंडळींबरोबर झालेली दोस्ती या सगळ्यात तिचे दिवस भराभर जाऊ लागतात...

आणि एक दिवस गावाजवळच्या रानात आपल्या मित्र-मंडळींबरोबर सहलीला गेलेली असताना अनुष्काला एका जुन्या, पायऱ्या असलेल्या विहिरीचा शोध लागतो. या विहिरीबद्दल तिनं नुकतीच आजीकडून एकदंत कथा ऐकलेली असते.

निर्भय अनुष्का सोबत एका नव्या साहसासाठी तयार व्हा! सुधा मूर्ती यांच्या लेखणीतून उतरलेल्या या पुस्तकाची गोडी अवीट आहे. ते एकदा हातात आल्यावर खाली ठेवावंसं वाटणारच नाही!



# उपक्रम

# दिनविशेष

दिसामाजि काहीतरी ते लिहावे।
प्रसंगी अखंडित वाचित जावे।।

- श्री स्वामी समर्थ रामदास

***वाचकांसाठी सुवर्णसंधी***
**'करा मैत्री पुस्तकांशी'**
**'मेहता पब्लिशिंग हाऊस' चा**
**नवीन उपक्रम**
**१७ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर २०१६**
**दरम्यानचा दिनविशेष**

*आपल्या लाडक्या लेखकांना वा अनुवादकांना शुभेच्छा*
*या ईमेलवर पाठवा.*
**authors@mehtapublishinghouse.com**

## दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर
# ५० टक्क्यांपर्यंत सूट

### १५ सप्टेंबर - श्याम भुर्के यांचा जन्मदिन

‘आनंदाचं पासबुक, मंत्र श्रीमंतीचा, सभेत कसे बोलावे, द माइंड जिम, द स्टार प्रिन्सिपल’ या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ९९०/-**

*१५ सप्टेंबर ते १६ सप्टेंबरपर्यंत.*

**सवलत किंमत ५९९/-**

### १५ सप्टेंबर- कमलाबाई ओगले यांचा जन्मदिन

‘रुचिरा भाग–१, रुचिरा भाग–२’ या कमलाबाई ओगले लिखित पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ४५०/-**

*१५ सप्टेंबर ते २० सप्टेंबरपर्यंत.*

**सवलत किंमत २९९/-**

### २१ सप्टेंबर - जागतिक कर्करोग दिन

Cancer Care & Mysteries & Yoga, इट्स नॉट अबाऊट द बाइक, कॅन्सर रोखू या’ या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ७७०/-**

*२१ सप्टेंबर ते २२ सप्टेंबरपर्यंत.*

**सवलत किंमत ४९९/-**

### २१ सप्टेंबर- दीपा पोरे यांचा जन्मदिन

‘ज्ञानदा निबंधमाला’ या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत - ९०/-**

*२१ सप्टेंबर ते २२ सप्टेंबरपर्यंत.*

**सवलत किंमत ५९/-**

## २२ सप्टेंबर- डी. एस. इटोकर यांचा जन्मदिन

‘A To Z विज्ञान, छंदातून विज्ञान, फक्त खेळण्यांसाठी, खेळणी विज्ञानाची, खेळणीच खेळणी, वाचनातून विज्ञान, वैज्ञानिक खेळणी’ पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ६५५/-**

*२२ सप्टेंबर ते २३ सप्टेंबरपर्यंत.*

**सवलत किंमत ३९९/-**

## २६ सप्टेंबर - जागतिक पर्यटन दिन

‘स्वान्सीतील दिवस’ या वीणा देव लिखित पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत - ३९५/-**

*२६ सप्टेंबर ते ३० सप्टेंबरपर्यंत.*

**सवलत किंमत २४९/-**

## २८ सप्टेंबर - निर्मला मोने यांचा जन्मदिन

**निर्मला मोने** लिखित **१९ बालसाहित्य** पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - १०६०/-**

*२८ सप्टेंबर ते १ ऑक्टोबरपर्यंत*

**सवलत किंमत ६४९/-**

## २९ सप्टेंबर -जागतिक हृदय दिन

‘चला जाणून घेऊ या हार्ट ॲटॅक, हृदयविकार निवारण, हृदयाचे पुनरुज्जीवन करणारे ई.ई.सी.पी. तंत्र’ या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत — ४५०/-**

*२९ सप्टेंबर ते १ ऑक्टोबरपर्यंत*

**सवलत किंमत २७०/-**

## १ ऑक्टोबर - उमा कुलकर्णी यांचा जन्मदिन

'पर्व, आवरण, चिदंबर रहस्य, डॉलर बहू, ज़िगर, काठ, कर्वालो, केतकर वहिनी, महाश्वेता, मंद्र, परिघ, परिशोध, पारखा, सामान्यांतले असामान्य, तडा, तंतू, वंशवृक्ष' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत – ४५५०/-**

*१ ऑक्टोबर ते ३ ऑक्टोबरपर्यंत.*

**सवलत किंमत २५९९/-**

## १ ऑक्टोबर - जागतिक वृद्ध दिन

'चिकन सूप फॉर द ग्रँडपेरेंटस सोल, सुखद वृद्धत्व' या दोन पुस्तक संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत – ४२०/-**

*१ ऑक्टोबर ते ४ ऑक्टोबरपर्यंत.*

**सवलत किंमत २४९/-**

## २ ऑक्टोबर - महात्मा गांधी यांची जयंती

'दुसरे प्रॉमिथिअस : महात्मा गांधी, लेट्स किल गांधी, मोहनदास, महात्मा गांधी आणि तीन माकडे' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत – १९०५/-**

*२ ऑक्टोबर ते ६ ऑक्टोबरपर्यंत.*

**सवलत किंमत ९९९/-**

## ४ ऑक्टोबर - जागतिक प्राणी दिन

'Eat Spray Love, निर्व्याज प्रेम, एका प्राणिसंग्रहालयाची गोष्ट, सफारी आफ्रिकेतील, मी एरिक' या अनुवादित पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - १०८०/-**

*४ ऑक्टोबर ते ६ ऑक्टोबरपर्यंत.*

**सवलत किंमत ६९९/-**

## ५ ऑक्टोबर - जागतिक शिक्षक दिन

'टु सर विथ लव्ह, चिकन सूप फॉर द सोल इंडियन टिचर्स' या पुस्तकावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ४४०/-**

सवलत किंमत २९९/-

*५ ऑक्टोबर ते ७ ऑक्टोबरपर्यंत.*

## ६ ऑक्टोबर - जागतिक वन्यप्राणी दिन

'Eat Spray Love, निर्व्याज प्रेम, एका प्राणिसंग्रहालयाची गोष्ट, सफारी आफ्रिकेतील, मी एरिक' या अनुवादित पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - १०८०/-**

सवलत किंमत ६९९/-

*६ ऑक्टोबरपर्यंत.*

## ८ ऑक्टोबर - भारतीय हवाई दल दिन

'प्रेमाची परिभाषा' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत - ३३०/-**

सवलत किंमत १६५/-

*८ ऑक्टोबर ते ९ ऑक्टोबरपर्यंत.*

## १२ ऑक्टोबर - शान्ता शेळके यांचा जन्मदिन

'रेशीमरेघा, सांगावेसे वाटले म्हणून..., संस्मरणे, सुवर्णमुद्रा, त्रिवेणी, वर्षा, आंधळी, आंधळ्याचे डोळे, अनोळख, अनुबंध, चौघीजणी, गोंदण, कविता स्मरणातल्या, किनारे मनाचे, मेघदूत, रंगरेषा, पावसाआधीचा पाऊस, पूर्व संध्या' या पुस्तक संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - २४६५/-**

सवलत किंमत १४९९/-

*१२ ऑक्टोबर ते १६ ऑक्टोबरपर्यंत.*

## १५ ऑक्टोबर - ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती

'अदम्य जिद्द, माझी जीवनयात्रा, टर्निंग पॉइंट्स, योद्धा शास्त्रज्ञ– राष्ट्रपती ए.पी.जे अब्दुल कलाम' या अनुवादित पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ६२०/-**

*४ ऑक्टोबर ते ६ ऑक्टोबरपर्यंत.*

**सवलत किंमत ३९९/-**

## १५ ऑक्टोबर - मारिओ पुझो

'ओमेर्ता' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत - २५०/-**

*१५ ऑक्टोबर ते १६ ऑक्टोबरपर्यंत.*

**सवलत किंमत १२५/-**

आमचे लेखक-अनुवादक यांचा जन्मदिन वा स्मृतिदिन यानिमित्त तसेच दिनविशेषावर आधारित विषयावरील पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**अधिक माहितीसाठी संपर्क :**

फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२

**website : www.mehtapublishinghouse.com**


**आपल्या आवडत्या लेखकांची पुस्तके online खरेदी करा**

**www.mehtapublishinghouse.com**

**e-books** आपल्या आवडत्या लेखकांची पुस्तके आता Computer, i-pad आणि Tab वर वाचा.

play.google.com/store/books ● m.dailyhunt.in/Ebooks/marathi

**मेहता मराठी ग्रंथजगत (Digital Edition)**
पाच वर्षांचे सभासद व्हा आणि आमच्या सर्व पुस्तकांवर ३०% सवलत मिळवा. वर्गणी - ४०० रुपये.(स्वामी सोडून)

**T-Book Club**
TBC ची मेंबरशीप घ्या. आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किंमतीत मिळवा.

मेहता पब्लिशिंग हाऊस • : 9422046575 • sales@mehtapublishinghouse.com



# साहित्य वार्ता

## ✍ 'हम खवातीन' नाटक

मुस्लिम महिला म्हणजे तलाक, बहुपत्नीत्व, इस्लामी फतवे आणि समान नागरी कायदा... असं समीकरण दिसून येतं. मात्र, शंभर वर्षांपूर्वी भारतात मुस्लिम महिला नक्की कसं जगत होत्या, त्या व्यक्त कशा होत होत्या, यांची संवादसाधनं काय होती, अशा प्रश्नांची उत्तरं सध्याच्या संदर्भात देणाऱ्या 'हम खवातीन' ('आम्ही स्त्रिया') या नाट्यप्रयोगाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

त्या सगळ्या धर्माने मुस्लिम... विविध विषयांवर मोकळेपणाने मतप्रदर्शन करणाऱ्या... उर्दू पत्रिकांमधून लिहिणाऱ्या... ज्याला समाजाचा मुख्य प्रवाह म्हणून ओळखलं जातं, त्यात सक्रिय सहभाग असणाऱ्या. अगदी सामाजिक रूढी-परंपरांबद्दलही मुक्तपणे आपली मते मांडणाऱ्या... वाचल्यावर काहीसे आश्चर्य वाटेल; पण या सर्वजणी आपल्याच देशात 'स्वतंत्रपणे' जगत होत्या तब्बल शंभर वर्षांपूर्वी!

मुस्लिम समाजाच्या विविध प्रश्नांवर काम करणाऱ्या 'रचना विकास' या संस्थेने आयोजिलेल्या नाट्यप्रयोगातून हा अंतर्मुख करणारा अनुभव उपस्थितांना घेता आला. ब्रिटिशकालीन भारतात मुस्लिम महिला काय लिहित होत्या, याचा मनोवेधक आलेख या नाटकात मांडला आहे. 'रसचक्र' या दिल्लीस्थित संस्थेने याची निर्मिती केली होती, तर विनोद कुमार यांचे दिग्दर्शन होते.

ज्येष्ठ विचारवंत प्रा. पुष्पा भावे, रचना विकासच्या अध्यक्ष रजिया पटेल उपस्थित होत्या.

मुस्लिम स्त्रिया त्या काळात जगाकडे कशा बघत होत्या, हे यातून लक्षात येते. विस्मृतीत गेलेले मुस्लिम महिलांचे विद्रोही आवाज आणि भारतीय

सामाजिक इतिहासातले मुस्लिम स्त्रियांचे अस्तित्व अधोरेखित करणारे हे नाटक आहे.

## संत साहित्याचे डिजिटायझेशन

'संतांनी सत्याची अनुभूती घेतलेली असते. त्यांचे साहित्य जीवन जगण्यासाठी प्रेरणादायी असते. त्यांनी लिहिलेले साहित्य जीवनाचे प्रयोजन सांगणारे आहे. त्यामुळे त्याकडे अंधश्रद्धा म्हणून पाहणे चुकीचे ठरते. आजच्या माध्यमांशी हे साहित्य जोडून घेण्यासाठी त्याचे डिजिटायझेशन (संगणकीकरण) व्हायला हवे,' असे मत ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांनी व्यक्त केले.

सिद्धिविनायक मानव कल्याण मिशन आयोजित डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज लिखित 'मुक्ताई जाहली प्रकाश' या पुस्तकाचे प्रकाशन माईर्स एमआयटीच्या संत ज्ञानेश्वर सभागृहात डॉ. भटकर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ कराड होते. या प्रसंगी नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस. एन. पठाण, डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज, ह. भ. प. मारुतीबुवा कुऱ्हेकर, भाजपचे प्रदेश संघटनमंत्री रवी भुसारी, माजी आमदार उल्हास पवार, ज्येष्ठ शास्त्रज्ञ आर. एन. शुक्ला आदी उपस्थित होते.

डॉ. विजय भटकर म्हणाले, ''या पुस्तकाद्वारे मुक्ताईचे आयुष्य उलगडण्याचा प्रयत्न झाला आहे. साहित्य किती प्रदीर्घ आहे, यापेक्षाही ते किती दर्जेदार आहे याला अधिक महत्त्व असते. मुक्ताईच्या साहित्यातून त्याची प्रचिती येते. ज्ञानेश्वरी हे सर्व शास्त्रांचे सार असून, त्याची निरूपणे डिजिटल स्वरूपात यावीत, यासाठी प्रयत्न चालू आहेत.''

डॉ.गट्टे म्हणाले, ''मुक्ताईंच्या रचनेची उंची अनोखी आहे. माझ्या गुरूंच्या मुखी नेहमी 'मुक्ताई की जय' असायचे. त्यातून माझी जिज्ञासा वाढत गेली. त्यावर पीएच.डी. केली. अतिशय त्रोटक उपलब्धीतून त्यांच्या साहित्याचा अभ्यास करीत आहे.'' कुऱ्हेकर महाराज म्हणाले, ''लहान वयात मुक्ताईंनी प्रगल्भ मांडणी केली आहे. मुंगी उडाली आकाशी, ताटी उघडा ज्ञानेश्वरा अशा रचना त्यांच्या साहित्याची उंची दाखवतात.'' डॉ. कराड म्हणाले, ''संत ज्ञानेश्वर, संत निवृत्तीनाथ यांनाही अधिकारवाणीने बोलणारी मुक्ताई किती श्रेष्ठ असावी, याची प्रचिती त्यांचे साहित्य वाचल्यावर येते. भारतीय संस्कृतीचे

वेगळे दर्शन घडविणारी ही बहीण होती.'' प्राचार्य विश्वनाथ खेडकर यांनी प्रास्ताविक केले. रूपाली अवचरे यांनी सूत्रसंचालन केले.

## अण्णा भाऊंच्या वीस दुर्मिळ कादंबऱ्या

लेखणीला शस्त्र बनवून ग्रामीण, दलित, महिला, शोषितांचे जगणे आपल्या साहित्यातून मांडणाऱ्या अण्णा भाऊ साठे यांच्या दुर्मिळ कादंबऱ्या आता खंडरूपाने वाचकांसमोर येणार आहेत. यासाठी राज्य सरकारच्या 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समिती'ने पुढाकार घेतला आहे.

लोकशाहीर म्हणून अण्णा भाऊ साठे परिचित असले, तरी कथा, कादंबरी, नाटक हे साहित्य प्रकारही त्यांनी ताकदीने हाताळले. तमाशा या कलेला प्रतिष्ठा मिळवून दिली.

शाहिरीतून त्यांनी दिलेले योगदानही तितकेच महत्त्वाचे आहे. अण्णा भाऊंच्या प्रत्येकी दहा कादंबऱ्यांचे दोन खंड प्रकाशित होणार असून, शासकीय फोटोझिंको मुद्रणालयात त्याची छपाई होणार आहे. पहिल्या खंडात 'वारणेचा वाघ', 'चित्रा', 'फकिरा', 'वैजयंता','चंदन', 'आवडी', 'मंगला', 'माकडीचा माळ,' 'वैर', 'गुलाम', या कादंबऱ्यांचा; तर 'रानगंगा', 'पाझर', 'अकलूज', 'मास्तर', 'कुरूप', 'तास', 'मूर्ती', 'अग्निदिव्य' यासह आणखी दोन कादंबऱ्यांचा दुसऱ्या खंडात समावेश करण्यात आला आहे. समितीच्या या योजनेला सरकारने मान्यता दिल्यामुळे  दोन्ही खंडांच्या प्रत्येकी दहा हजार प्रती छापल्या जातील.

अण्णा भाऊंच्या जवळपास ३३ कादंबऱ्या आहेत; पण त्यातील अनेक कादंबऱ्या बाजरात मिळत नाहीत. काही मिळतात. पण, त्या मूळ कादंबऱ्या नाहीत. याचा विचार करून आणि त्यांच्या सत्यप्रती मिळवून या खंडांसाठी एकूण वीस दुर्मिळ कादंबऱ्यांची निवड केली आहे.

## बालसाहित्याचे आधुनिक विश्व गुंफण्याची गरज

''तंत्रज्ञानाच्या युगात रमणाऱ्या लहान मुलांसाठी त्यांच्या भावविश्वाशी सुसंगत असे बालसाहित्य लिहिणे हे लेखकांसमोर मोठे आव्हान आहे. कारण सध्याची ही पिढी बालसाहित्यापासून तुटली आहे,  ही चिंतेची बाब आहे. त्यामुळे त्यांच्यासाठी बालसाहित्याचे आधुनिक विश्व गुंफण्याची गरज आहे,''

**नवं कोरं**

'THE BRIDGES OF MADISON COUNTY' आणि
'A THOUSAND COUNTRY ROADS'
या जगप्रसिद्ध कादंबऱ्यांचा अनुवाद

# अद्वैत




मूळ लेखक- **रॉबर्ट जेम्स वॉलर**

अनुवाद- **लीना सोहोनी**

**किंमत : ३५०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

तुम्ही जर आयुष्यात कधीही अत्यंत उत्कट, खऱ्याखुऱ्या प्रेमाचा अनुभव घेतला असेल... आणि परिस्थितीमुळे किंवा इतर काही कारणांमुळे जर ती प्रेमकहाणी अपूर्ण राहिली असेल, तर हे पुस्तक तुमच्या हृदयाला नक्कीच स्पर्श करून जाईल. १९९५ साली पहिल्यांदा हे पुस्तक जेव्हा बाजारात आलं, तेव्हा अगदी अल्पावधीतच ते जगभरात प्रथम क्रमांकाचं बेस्ट सेलर होऊन गेलं. जगभरातील पस्तीसहून अधिक भाषांमध्ये त्याचा अनुवाद झाला. फोटोग्राफर रॉबर्ट किनसेड आणि फ्रॅन्सेस्का जॉन्सन यांच्या या प्रेमकहाणीने जगभरातील वाचकांना अक्षरश: झपाटून टाकलं... वेड लावलं. ही कथा प्रातिनिधिक स्वरूपाची आहे. जगाच्या पाठीवर ठिकठिकाणी राहत असलेल्या असंख्य स्त्री आणि पुरुषांच्या अंतर्मनातील उत्कट, अपुऱ्या इच्छा-आकांक्षांचं प्रतिबिंब यात पडलेलं आहे. दोन मनं... अवघा चार दिवसांचा सहवास... आणि इतक्या जवळ येतात; इतक्या विलक्षण, इतक्या अद्वितीय प्रेमाचा अनुभव घेतात, स्वत:चं अस्तित्व विसरून परस्परांत इतकी विलीन होतात... की, त्यांची आयुष्यंच बदलून जातात.

ही प्रेमकहाणी म्हणजे एक हलकीफुलकी, सर्वसाधारण प्रेमकथा नव्हे; तर एका परिपक्व, अद्वितीय आणि चिरंतन अशा प्रेमाचं ते यथार्थ चित्रण आहे.

असे मत प्रा. मिलिंद जोशी यांनी व्यक्त केले.

'फाउंटन म्युझिक कंपनी'च्या 'गंमत गाणी' या ध्वनिफितीत डॉ. पाटील यांनी लिहिलेल्या ११ कविता आणि बालगीतांचा समावेश करण्यात आला आहे.

## ✍ जगण्यातील समस्यांवर 'स्टार्ट अप'मधून उत्तर शोधा : डॉ. देशपांडे

''करिअरचा विचार करताना नोकरीमागे धावण्यापेक्षा नव उद्योजक बनून स्वत:चा व्यवसाय सुरू करा. सर्जनशील संकल्पनांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत रोजच्या जगण्यातील समस्यांवर उत्तर शोधा,'' असा सल्ला 'पर्सिस्टंट सिस्टिम्स'चे संस्थापक-अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. आनंद देशपांडे यांनी युवा पिढीला दिला.

डॉ. दीपक शिकारपूर लिखित 'ऑनलाइन स्टार्ट अप : ई-व्यवसायाचा रोडमॅप' या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी डॉ. आनंद सरदेशमुख, प्रा. मिलिंद जोशी, मालती कलमाडी, प्रकाशक आनंद आगाशे, प्राचार्य डॉ. एस. बी. खरोसेवकर उपस्थित होते.

देशपांडे म्हणाले, ''स्टार्ट अप सुरू करण्यामागे निव्वळ पैसा कमावणे, ही आंत्रप्रेन्युअरची भूमिका नसते. त्यामुळे व्यवसाय सुरू करताना केवळ भांडवल गुंतवणूक म्हणून याकडे बघण्यापेक्षा समस्यांचा शोध घ्या. त्यांची सोडवणूक करताना त्यांचे मागणीत रूपांतर करीत आपले बिझनेस मॉडेल यशस्वी करा.'' डॉ. मुक्ता करमरकर यांनी सूत्रसंचालन केले.

## ✍ इंग्रजी, मराठी 'शब्देश्वरी'

इंग्रजी शब्दांचा मराठी अर्थ आणि मराठी शब्दांचा इंग्रजी अर्थ सांगणाऱ्या शब्दकोशांचे असंख्य ॲप्स सध्या अँड्रॉइडवर उपलब्ध आहेत. यापैकीच अथेन्सा सॉफ्टची 'मराठी डिक्शनरी' ही लक्षणीय आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे हे ॲप ऑफलाइन आणि पूर्णत: मोफत आहे. त्यामुळे तुम्ही इंटरनेटशिवाय त्याचा वापर करू शकता. या ॲपमध्ये इंग्रजी व मराठी दोन्ही भाषांत शब्द टाइप करण्याची सुविधा असून, शब्द टाइप करत असतानाच शब्दांचे बहुपर्याय 'पॉपअप' होत असतात. या ठिकाणी एकाच शब्दाचे दुसऱ्या भाषेतील अनेक समानार्थी शब्द प्रदर्शित करण्यात येतात. तसेच शब्दांच्या विरुद्धार्थी शब्द

शोधण्याची सुविधाही या ॲपमध्ये आहे. त्यामुळे शब्दांचे अधिक अचूक अर्थ जाणून घेणे सोपे जाते. हे ॲप एकप्रकारे भाषा शिकवण्याचेही काम करते. या ॲपमध्ये 'मल्टिपल चॉइस क्वेश्चन'ची सुविधा असून, त्याद्वारे शब्द, त्यांचे उच्चार, अर्थ शिकता येतात.

## ✍ संत नामदेवांची जीवनगाथा कीर्तनातून उलगडली

मनुष्यजन्माचे करावे सार्थक, ऐसा दे विवेक पांडुरंग... नामा म्हणे विसू आत्मा, सर्वभूती ऐसी दे मती पांडुरंग... जय जय रामकृष्ण हरी... देह देवाचे मंदिर... या या डोळ्यांनी मी गं पाहिला, देव जेवला गं देव जेवला... अशा अभंग गायनातून प्रा. संगीता मावळे यांनी कीर्तनाच्या माध्यमातून संत नामदेवांची जीवनगाथा उलगडली.

संत नामदेव महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्त मंदिरामध्ये संगीता मावळे यांचे कीर्तन झाले. मावळे म्हणाल्या, "संत नामदेवांनी भारतभर भ्रमण करून जनमानसात भक्तीचा जागर केला. विश्वात्मक धर्म सांगणारे ते संत होते. कीर्तन भक्ती त्यांनी माणसांमध्ये रुजवली. माणसाच्या देहात जोपर्यंत पंचतत्त्वे असतात, तोपर्यंत त्याने सत्कर्म केले पाहिजे. माणसाच्या शरीरात पंचतत्त्वे असतात, त्याचप्रमाणे संत हे पृथ्वीवरील पंचतत्त्वे आहेत. संत नामदेव, संत तुकाराम, समर्थ रामदास, संत एकनाथ, संत ज्ञानेश्वर हे महाराष्ट्राचे पंचप्राण आहेत. संतांनी आपल्या वाणीने आणि कार्याने महाराष्ट्राची भूमी पावन केली आहे. येथील माणसांची मने त्यांनी श्रद्धेने चेतविली. त्यांच्यामुळेच महाराष्ट्र भूमीवर श्रद्धेचे आणि भक्तीचे पीक उभे राहिले."

## ✍ नेवासे येथील उत्खनन

नेवासे येथील उत्खननातून पुरातत्त्ववेत्ते हसमुखलाल सांकलिया यांनी संत ज्ञानेश्वर महाराजांचा कालखंड, तसेच तेथील लोकपरंपरेशी संबंधित अनेक बाबींवर प्रकाश टाकला. त्याचा विस्तृत अहवाल 'एक्सकॅव्हेशन ॲट नेवासा' या ग्रंथाच्या माध्यमातून १९६० साली डेक्कन कॉलेजने प्रकाशित केला.

नगर जिल्ह्यातील प्रवरा नदीच्या काठावर वसलेल्या नेवासे गावाने राज्याला एक सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारसा दिला आहे. नेवाशामध्ये ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी रचली आणि तेथील लोकांना ज्ञानेश्वरांच्या मुखातून ज्ञानेश्वरी ऐकण्याचे

भाग्य लाभले. या ऐतिहासिक घटनेबरोबरच अनेक ऐतिहासिक ग्रंथांमध्ये नेवासा गावाचा उल्लेख करण्यात आला. ज्ञानेश्वरी रचली गेली त्या काळातील संस्कृती, तत्कालीन ओव्या, साहित्य आणि गाण्यांमधून समोर आली; मात्र त्याही पलीकडे जाऊन नेवाशामधील राहणीमान, तत्कालीन नागरिकांकडून वापरल्या जाणाऱ्या वस्तू सांकलिया यांनी इंग्रजी अहवाल ग्रंथाच्या माध्यमातून सामान्य वाचक आणि अभ्यासकांसमोर आणल्या. ही महत्त्वपूर्ण माहिती आणि त्याचे पुरातत्त्वीय आणि सांस्कृतिक महत्त्व लक्षात घेऊन साहित्य आणि सांस्कृतिक मंडळाने अनुवादाची जबाबदारी घेतली आहे.

'एक्सकॅव्हेशन ॲट नेवासा' हा ग्रंथ मराठीत अनुवादित झाल्यानंतर त्याचा इतिहासतज्ज्ञांना मोठ्या प्रमाणावर उपयोग होणार आहे.

## ✍ अज्ञाताचा शोध ही आनंदाची अनुभूती : सबनीस

''मानवी जीवनातील अनेक बाबींचा शोध अतिप्रगत विज्ञानही घेऊ शकले नाही. त्याचा शोध घेता येईल, अशी शाश्वतीही नाही. तरीही त्याचा शोध घेण्याचा प्रवास ही एक आनंदाचीच प्रक्रिया मानायला हवी,'' असे मत डॉ. श्रीपाल सबनीस यांनी व्यक्त केले.

रंगत-संगत प्रतिष्ठान आणि लोकमंगल शिक्षण संस्थेच्या वतीने ज्योतिषशास्त्राचे अभ्यासक रमणलाल शहा यांचा सहस्त्रचंद्रदर्शनाच्या निमित्ताने सत्कार करण्यात आला. प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रमोद आडकर, 'लोकमंगल'चे शिरीष चिटणीस उपस्थित होते. सबनीस म्हणाले, ''मानवी मन, आत्मा, मृत्यूनंतरचे जीवन या आधुनिक विज्ञानालाही न उलगडलेल्या बाबी आहेत. तत्त्वज्ञान विज्ञान व अध्यात्म याचा वेध घेत आहे; मात्र निष्कर्ष मिळू शकले नाहीत. तरी वेध घेण्याची प्रक्रिया निराशेच्या गर्तेत सापडलेल्या तरुणांना प्रेरणा देणारी आहे.''

शहा म्हणाले, ''ज्योतिष हे पाच हजार वर्षे प्रचलित असलेले शास्त्र असून, अनेक यशस्वी व्यक्ती त्याचा आधार घेतात.'' प्रभा सोनवणे यांनी सूत्रसंचालन केले.

## ✍ फडके दांपत्याची साहित्य सेवा

''पांढरे शुभ्र धोतर...त्यावर बंडी... हातात पाइप... धूर सोडण्याची आगळी तऱ्हा... झोपाळा पुढे जाईल तसे धुराचे होत जाणारे वर्तुळ... आणि

शेजारी बसलेली रूपवती, असे हे कणखर सह्याद्री आणि शीतलतेचे जोडपे आम्ही अनुभवले आहे. तिळगुळाप्रमाणे मकर संक्रांतीला हे जोडपे एकत्र आले आणि या उभयतांनी महाराष्ट्राची साहित्य सेवा केली...'' सिक्कीमचे राज्यपाल श्रीनिवास पाटील ना.सी.फडके व कमला फडके यांच्या आठवणींमध्ये हरखून गेले.

कमला फडके यांच्या जन्मशताब्दीपूर्ती निमित्त आयोजित कार्यक्रमात पाटील यांनी आपल्या शब्दप्रभुत्वाने मैफल सजवली. फडके यांच्या कन्या गीतांजली जोशी लिखित 'कमला' या ललित चरित्राचे प्रकाशन पाटील यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ लेखक श्रीनिवास भणगे, मिलिंद जोशी, एअर मार्शल (निवृत्त) अविनाश जोशी, सुनिधी प्रकाशनचे अविनाश काळे व वीणा संत या वेळी उपस्थित होते. जन्मशताब्दी कथा स्पर्धेतील सताळकर, गौरी गाडेकर व शशिकांत जहागिरदार या विजेत्यांना गौरविण्यात आले.

जोशी म्हणाले, ''फडके उभयतांनी भांड्यांचा संसार केला नाही, त्यांनी सर्जनाचा संसार केला. लेखकाचे वैयक्तिक आयुष्य आणि साहित्य यामध्ये फरक करण्याची उंची साहित्य क्षेत्रात नव्हती आणि नाही म्हणून या दाम्पत्यावर टीका झाली. पूर्वग्रहदूषित मनोवृत्ती आजाराने मराठी साहित्य क्षेत्र ग्रस्त आहे.''

## डॉ. गणेश देवी यांनी उलगडल्या महाश्वेतादेवींच्या आठवणी

''गौनेश, मै मरुंगी नही... मुझे मरना नहीं है... अभी बहुत संघर्ष बाकी है, मुझे जीना है...'' असे महाश्वेतादेवी नेहमी म्हणायच्या. त्यांना लोकांच्या स्मरणात राहायचे नव्हते, तर प्रत्यक्ष लोकांसाठी कार्य करायचे होते. स्त्रीवादी, कम्युनिस्ट अशी 'लेबल्स' त्यांनी स्वत:ला कधीही चिकटू दिली नाहीत. वयाच्या ऐंशीव्या वर्षांपर्यंत स्वत:च्या मालकीचे घरही नव्हते, अशी ही साधी बाई होती...'' अशा शब्दांत भाषातज्ज्ञ डॉ. गणेश देवी यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

महाराष्ट्र कल्चरल सेंटर आणि सुदर्शन कलामंचातर्फे महाश्वेतादेवींच्या स्मरण सभेचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यावेळी महाश्वेतादेवी यांना आदरांजली वाहताना ते बोलत होते. देवी पुढे म्हणाले, ''आपल्यातून या आधी दिलीप चित्रे गेले. नंतर अनंतमूर्ती, नारायणभाई देसाई, के. जी. सुब्रह्मण्यमही गेले आणि आता महाश्वेतादेवी निवर्तल्या. समाजाला आपल्या विचारांनी आणि ज्ञानाने सदैव प्रकाश दाखवणारे हे सगळेच समाजाचे 'कॉन्शस कीपर' (सदसद्विवेक

आणि सामाजिक भान जागे ठेवणारे धुरीण) होते.

देवी म्हणाले, ''माणूस बदलून जावा, झपाटून जावा असे त्यांचे लेखन आणि व्यक्तिमत्त्व होते. महत्त्वाचे म्हणजे बोलण्यात आणि वागण्यात त्या अत्यंत विनयशील होत्या. आपण कुणी वेगळे आहोत, इतरांपेक्षा वरच्या दर्जाचे लेखक वगैरे आहोत, अशा विचारांना त्यांच्या लेखी कधीही स्थान नव्हते. महाश्वेतादेवींनी कधीही दिखाऊपणा केला नाही. किंबहुना 'देखावा' आणि 'बडेजाव' हे शब्दच त्यांच्या शब्दकोशात नव्हते.''

पंचावन्नाव्या वर्षी महाविद्यालयातील नोकरी सोडून त्यांनी पत्रकारिता स्वीकारली. त्या खेड्यापाड्यांत जात. तिथल्या समस्यांवर प्रत्यक्ष लेखन करीत. वास्तवाच्या एवढ्या जवळ जाणारे लेखक फारच दुर्मिळ म्हणायला हवे. महाश्वेतादेवी यांच्या कथेवर आधारित व संदेश भंडारे दिग्दर्शित 'महादू' हा चित्रपट यावेळी दाखवण्यात आला.

## ✍ महाविद्यालयात 'बुक क्लब'ची स्थापना

तंत्रज्ञानाच्या युगात, पुस्तकांना नाही विसरणार, पुस्तकांशी करून मैत्री, ज्ञान आम्ही मिळवणार... अशी भावना आहे सर परशुरामभाऊ महाविद्यालयातील 'बुक क्लब'च्या सदस्यांची. कला-वाणिज्य-विज्ञान शाखांतील या विद्यार्थ्यांनी स्वयंप्रेरणेने बुक क्लब स्थापन करून वाचन संस्कृती जोपासण्याचा प्रयत्न केला आहे.

गेल्या वर्षी १५ जुलैला मराठी अनुवादक रवींद्र गुर्जर यांच्या हस्ते या बुक क्लबचे उद्‌घाटन झाले.

बुक क्लबसाठी ३०-४० विद्यार्थ्यांनी जुनी-नवी पुस्तके दिली. वर्षभरात कथासंग्रह, कवितासंग्रह, कादंबरी, नाटके, ऐतिहासिक आदी ४०-५० पुस्तके जमा झाली. क्लबचे प्रतिनिधी आठवड्यातून एकदा व्हॉट्सॲप ग्रुपवर उपलब्ध पुस्तकांची यादी प्रसिद्ध करतात व पुस्तकांची देवाणघेवाण करतात. वाचलेल्या पुस्तकांवर चर्चाही होते. भविष्यात वाचनाबरोबर वक्तृत्व स्पर्धा, अभिवाचन स्पर्धा घेण्याचा विद्यार्थ्यांचा मानस आहे.

## ✍ ग्रंथालय पुरस्कारासाठी माहिती पाठविण्याचे आवाहन

राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचा गुणात्मक विकास व्हावा

व त्यांना अधिक चांगल्या सेवा देण्यासाठी प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने दरवर्षी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार' आणि ग्रंथालय चळवळीस योगदान देणाऱ्या सार्वजनिक ग्रंथालय क्षेत्रातील सेवकांनी अधिक चांगल्या सेवा देण्यासाठी प्रवृत्त व्हावे, म्हणून 'डॉ. एस. आर. रंगनाथ उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक ग्रंथ मित्र पुरस्कार' देण्यात येतो.

राज्यातील शहरी व ग्रामीण विभागातील 'अ', 'ब', 'क', 'ड' वर्गातील उत्कृष्ट ग्रंथालयांना अनुक्रमे रुपये पन्नास हजार रुपये, तीस हजार, वीस हजार आणि दहा हजार रुपये रोख पारितोषिक, सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह सन्मानपूर्वक देऊन सन्मानित करण्यात येते. राज्य स्तरावर प्रत्येकी एक उत्कृष्ट कार्यकर्ता व सेवक यांना प्रत्येकी पंचवीस हजार रुपये रोख, सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह, तसेच राज्यातील प्रत्येक महसुली विभाग स्तरावर प्रत्येकी एक कार्यकर्ता व सेवक यांनाही गौरवण्यात येते.

## निवडणुकीपूर्वी मराठी अभिजात?

महानगरपालिकांच्या आगामी निवडणुकीच्या तोंडावर केंद्र सरकारकडून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचे संकेत दिले जात आहेत. मुंबई, पुण्यासह राज्यातील दहा प्रमुख महापालिकांच्या निवडणुकीत मराठीच्या मुद्द्यावर लढणारे काही पक्ष आहेत. त्या पक्षांना शह देण्यासाठी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देऊन भाजपकडून 'मराठी कार्ड' वापरले जाण्याची शक्यता आहे. मराठी भाषेच्या प्रस्तावावर केवळ केंद्रीय मंत्रिमंडळाची मोहोर उमटणे बाकी असल्याने पालिका निवडणुकीच्या आधी हा निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली.

मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त होण्यासाठी गेल्या चार वर्षांपासून प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी तत्कालीन आघाडी सरकारने रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. या समितीने पाठविलेला अहवाल मान्य करून साहित्य अकादमीने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, अशी शिफारस केंद्र सरकारकडे केली. अकादमीकडून केंद्राला अहवाल सादर झाल्यानंतर दीड वर्षाचा कालावधी उलटून गेला असला, तरी अद्यापही मराठीच्या अभिजात दर्जावर शिक्कामोर्तब झालेले नाही.

केंद्र सरकारने उडिया भाषेला अभिजात दर्जा दिला असून, त्यासंबंधी

आक्षेप घेणारी याचिका मद्रास उच्च न्यायालयात दाखल आहे. ही याचिका निकाली निघेपर्यंत कोणत्याच भाषेच्या अभिजात दर्जाविषयीचा प्रस्ताव स्वीकारायचा नाही, असा निर्णय केंद्र सरकारने घेतला असल्याने मराठीला अभिजात दर्जा मिळू शकलेला नाही. मात्र, आधीच्या भाषांना ज्या निकषाने हा दर्जा मिळाला, ते सर्व निकष मराठी भाषेने पूर्ण केलेले आहेत. उडिया भाषेच्या अभिजाततेविषयी घेतलेले आक्षेप आणि मराठीचा प्रस्ताव याचा काही संबंध नाही. केंद्रात भाजप सरकार आल्यानंतर एकाही भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला नाही. या पार्श्वभूमीवर मराठीचा प्रस्ताव पडून आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देऊन, त्याचा राजकीय फायदा उठविण्याचा प्रयत्न भाजप आगामी पालिका निवडणुकांमध्ये करणार असल्याची चर्चा साहित्य व राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. मुंबई पालिकेत शिवसेनेचे वर्चस्व आहे. मुंबई, पुणे व इतर शहरांमधील मराठी मतदाराला आपल्याकडे खेचण्यासाठी भाजपकडून 'मराठी कार्ड' वापरले जाईल, असे बोलले जात आहे.

'मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याच्या प्रस्तावाचा पाठपुरावा करावा' असे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे देण्यात आले. 'मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, यासाठीच्या सर्व आवश्यक गोष्टींची पूर्तता करूनही केंद्र सरकारचा त्याबाबतचा निर्णय होऊ शकलेला नाही. 'मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्याची संपूर्ण महाराष्ट्र आतुरतेने वाट पाहात आहे. आपण समस्त मराठी जनतेचे प्रतिनिधित्व करीत आहात. आपण व्यक्तिश: याबाबतचा पाठपुरावा करावा,' असे निवेदनात म्हटले आहे.

## पुरुषी भावनांविषयीचे 'ग्रूमिंग द इंडियन मेल'

पुरुषांच्या भावभावनांवर आधारित असलेले 'ग्रूमिंग द इंडियन मेल' हे पुस्तक जगभर प्रदर्शित करून जागतिक साहित्य प्रदर्शनांमध्ये ठेवण्यात येणार आहे. जगभरात पुरुषांमध्ये असलेल्या भावभावनांचा वेध घेण्याचा प्रयत्न या पुस्तकातून करण्यात आला आहे. पुस्तकाच्या लेखिका सुरभी बॅनर्जी म्हणाल्या, ''लहानपणापासून तयार होत जाणाऱ्या पुरुषी भावनांना संस्कारित करणे गरजेचे असते, हे मांडण्याचा प्रयत्न या पुस्तकाच्या आधारे केला.'' पुस्तकाचे प्रकाशन जर्मनी, मेक्सिको, ब्रिटन, अमेरिका, चीन या देशांमध्ये करण्यात येणार आहे.

## ✍ 'यशोगाथा'चे प्रकाशन

''केवळ स्वत:च्या संस्थांचे साम्राज्य वाढविणाऱ्या तथाकथित शिक्षणसम्राटांपेक्षा तत्त्वनिष्ठ आणि स्वावलंबी विद्यार्थ्यांची पिढी घडवणाऱ्या शिक्षणतज्ज्ञांची समाजाला गरज आहे,'' असे मत पालकमंत्री गिरीश बापट यांनी व्यक्त केले. स्वातंत्र्यदिनानिमित्त यशस्वी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या 'शिका व कमवा' योजनेतील विद्यार्थ्यांच्या 'यशोत्सव' स्नेहसंमेलनात ते बोलत होते. बापट यांच्या हस्ते 'यशोगाथा' विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. महिला व बाल विकास विभागाचे विभागीय उपायुक्त राहुल मोरे, तसेच किशोर केंचे, डॉ. सी. एम. चितळे, 'यशस्वी'चे अध्यक्ष विश्वेश कुलकर्णी, संचालक प्रदीप तुपे, यशस्वी एज्युकेशन सोसायटीचे संचालक डॉ. आमोद मरकळे, स्मिता धुमाळ आदी उपस्थित होते.

## ✍ व्यक्तिनिरपेक्ष लिखाणाने साहित्य अजरामर : सावंत

''लेखक ज्यावेळी व्यक्तिनिरपेक्ष होतो आणि लेखन करतो, त्या वेळी त्याची साहित्यकृती अजरामर होते. अशा साहित्यावर लेखकाचे नाव असले-नसले तरीही ते कायम स्मरणात राहते. आचार्य अत्रे हे असेच नामनिरपेक्ष साहित्यिक होते. त्यांचे साहित्य त्यांच्या लेखणीने आधी ओळखले जाते, मग त्यांच्या नावाने, हे त्यांचे श्रेष्ठत्व आहे,'' अशा शब्दांत महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विवेक सावंत यांनी आचार्य अत्रे यांचे महत्त्व विशद केले.

आचार्य अत्रे स्मृती प्रतिष्ठान, विनोद विद्यापीठातर्फे आचार्य अत्रेंच्या ११८व्या जयंतीनिमित्त 'हास्य-विनोद-आनंद' महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात 'सकाळ'च्या औरंगाबाद आवृत्तीचे संपादक संजय वरकड, चित्रकार सुहास बहुलकर, कवयित्री सिसिलिया कार्व्हालो, डॉ. स्वाती कर्वे, मधू पोतदार, पत्रकार सुनीता लोहोकरे, उद्योजक श्रीराम कुलकर्णी यांना औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती आर. एम. बोर्डे यांच्या हस्ते आचार्य अत्रेंच्या नावाने पुरस्कार देण्यात आला. बोर्डे यांच्या पत्नी सविता बोर्डे, प्रतिष्ठानचे संस्थापक बाबूराव कानडे उपस्थित होते. वरकड यांच्या 'काम चालू, रस्ता बंद' या विडंबन काव्यसंग्रहासाठी त्यांना पुरस्कार देण्यात आला.

अत्रेंच्या आठवणी सांगताना सुहास बहुलकर म्हणाले, ''आचार्य अत्रे यांच्याशी मी शाळेत असताना भेट झाली होती. मी लहानपणापासून चित्रे

काढायचो. माझ्या चित्राची वही घेऊन मी त्यांना एकदा भेटलो. त्या वेळी मी इवलासा आणि समोर धिप्पाड देहाचे आचार्य अत्रे, असे दृष्य आजही माझ्या डोळ्यांपुढे तरळते. माझे चित्र पाहून त्यांनी त्यावर 'आशीर्वाद' असे लिहून त्यावर सहीसुद्धा केली आणि वही हातात देऊन मला चक्क वर उचलले.''

## ✍ साहित्य संमेलनासाठी सात ठिकाणांहून निमंत्रणे

आगामी नव्वदाव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजनासाठी महाराष्ट्रातील सहा ठिकाणांसह बेळगाव येथून एक अशी एकूण सात निमंत्रणे आली आहेत. 'सप्तपदी'च्या फेऱ्यातील या ठिकाणांवर पुढील महिन्यात पुण्यात होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या बैठकीत शिक्कामोर्तब केले जाणार आहे.

महामंडळाकडे आलेल्या एकूण सात निमंत्रणांमध्ये आगरी यूथ फोरम (डोंबिवली), सार्वजनिक वाचनालय (कल्याण), महाराष्ट्र साहित्य परिषद, शाहूपुरी शाखा (सातारा), श्री प्रभू प्रबोधन संस्था, रिद्धपूर (अमरावती), कल्याण शिक्षण संस्था, तळोध्री (चंद्रपूर), महाराष्ट्र साहित्य परिषद, इंदापूर शाखा (पुणे) आणि सार्वजनिक वाचनालय (बेळगाव) यांचा समावेश आहे. संमेलन स्थळांची निवड करण्यासाठी महामंडळाची 'संमेलन स्थळ निवड समिती' स्थापन करण्यात आली असून, यात महामंडळाच्या चार पदाधिकाऱ्यांसह अन्य तीन सदस्यांचा समावेश आहे. निमंत्रणे आलेल्या संस्थांना व त्या ठिकाणांना समितीचे सदस्य भेट देऊन पाहणी व चर्चा करतात आणि त्यानंतर याबाबतचा अहवाल महामंडळाकडे सादर केला जातो.

## ✍ 'आयसिसच्या जबड्यातून सुटका' या पुस्तकाचे प्रकाशन

गरीब कुटुंबातील मुलीची फसवून केलेली विक्री, तिचा खडतर प्रवास, जिहादी लोकांचा अत्याचार आणि तिच्यासारखीच फसवून आणलेली आणखी एक युवती... अशी कहाणी लेखक रंगा दाते यांनी ''आयसिसच्या जबड्यातून सुटका'' या पुस्तकाद्वारे वाचकांसमोर आणली आहे. 'साहित्य दरबार'तर्फे १५ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे पार पडलेल्या या कार्यक्रमास दहशतवादविरोधी पथकाचे पुणे विभागाचे प्रमुख

**नवं कोरं**

# स्वर्गाच्या वाटेवर काहीतरी घडलं...




मूळ लेखक- **सुधा मूर्ती**

अनुवाद- **लीना सोहोनी**

**किंमत : १५०/-रु. ।**

**पोस्टेज :५०/-रु.**

आपल्यापैकी प्रत्येकाकडेच एक कहाणी असते, जिच्यामुळे आपला जगण्यावरचा विश्वास दृढ होतो...

सुधा मूर्तींच्या पुस्तकाच्या पानोपानी भेटणारी माणसं आणि त्यांच्या रोमहर्षक कहाण्या आपल्या मनावर कायमचा ठसा ठेवून जातात; पण या सर्व पुस्तकांमधून आपल्याला जी कुणी माणसं भेटतात, ती सुधा मूर्तींच्या सामाजिक कार्याच्या निमित्तानं वेळोवेळी त्यांच्या आयुष्यात येऊन गेलेली असतात. अशाच प्रकारच्या कहाण्या इतरांच्याही आयुष्यात घडल्या असतील. प्रत्येकाकडेच सांगण्यासारखं काहीतरी असेल.

'स्वर्गाच्या वाटेवर काहीतरी घडलं' हा अत्यंत संस्मरणीय अशा वीस सत्यकथांचा संग्रह आहे. पेंग्विन प्रकाशनातर्फे जी खुली कथा स्पर्धा आयोजित करण्यात आली, त्या स्पर्धेत उतरलेल्या असंख्य कथांचं सुधा मूर्ती यांनी जातीनं परीक्षण करून, त्यातून उत्कृष्ट अशा या वीस कथा निवडल्या.

आपण आपल्या खडतर, कष्टप्रद अशा दैनंदिन जीवनाची वाटचाल करत असताना हे जीवन आशा, श्रद्धा, दयाळूपणा आणि आनंद यांनी किती ओतप्रोत भरलेलं असतं, याची प्रचिती या कथा वाचून आपल्याला येते.

अत्यंत हृदयस्पर्शी आणि प्रेरणादायी अशा कथांचा हा संग्रह, माणसाच्या चांगुलपणावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक वाचकाला मंत्रमुग्ध करून टाकेल.

भानुप्रताप बर्गे, मनसेचे बाळा नांदगावकर, प्रवक्ते अनिल शिदोरे, महापालिका गटनेते किशोर शिंदे  उपस्थित होते.

## द्वेषाची जणू स्पर्धाच लागलीय : राजन खान

''अनेक प्रकारचे भेद हे आपल्या समाजाचे वैशिष्ट्य बनले आहे. माणूस समजून न घेता एकमेकांत द्वेष निर्माण करण्याची जणू स्पर्धाच सुरू आहे. त्यातूनच विकृत आणि असहिष्णू परंपरा वाढीस लागली आहे. या परंपरांचा व्यर्थ अभिमान बाळगणाऱ्या मानसिकतेतून बाहेर येण्याची गरज आहे,'' असे मत साहित्यिक राजन खान यांनी व्यक्त केले.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या हडपसर येथील अण्णासाहेब मगर महाविद्यालयात आयोजित केलेल्या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन पुणे जिल्हा बँकेचे संचालक सुरेश घुले यांच्या हस्ते, तर ग्रंथालय विभाग व मराठी विभाग यांनी स्थापन केलेल्या 'वाचक मंचा'चे उद्घाटन खान यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. भाऊसाहेब बेंद्रे होते. प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा. नाना झगडे यांनी केले.

डॉ. आनंदा महाजन, प्रा. दत्तात्रय सांगळे, डॉ. शुभांगी औटी, डॉ. एन. डी. पवार, डॉ. मेघना भोसले, प्रा. वंदना सोनवणे आदी या वेळी उपस्थित होते.

खान म्हणाले, ''देव, धर्म, जाती, पंथ, वर्ण, संप्रदाय, लिंगभेद, प्रदेशभेद या आधारे जगभर वैर, विद्वेष यांनी धुमाकूळ घातला आहे. या भेदांचे हत्यार करून माणसं एकमेकांवर तुटून पडत आहेत. हे सर्व थांबविण्यासाठी संवेदनशील माणसांची गरज आहे. ती जबाबदारी तरुण पिढीने घ्यावी.''

प्राचार्य बेंद्रे म्हणाले, ''भौतिक विकासाबरोबर सामाजिक विकास ही संकल्पना रूढ व्हायला हवी होती, ती झाली नाही. ग्रंथवाचनाने नीतिमान समाज निर्माण होणे शक्य आहे. असहिष्णुता हा चिंतेचा विषय असून, सामाजिक जबाबदारीचे भान प्रत्येकाला आले पाहिजे.''

सूत्रसंचालन प्रा. संजय मोरे यांनी केले. आभार प्रा. दत्तात्रेय सांगळे यांनी मानले. डॉ. एन. डी. पवार व प्रा. वंदना सोनवणे यांनी संयोजन केले.

## डाव्यांमुळे मूल्यांना तडा : सहस्रबुद्धे

''मतभेद हीच लोकशाही, असे समजणाऱ्या आणि विचाराधारित राजकीय

पक्षांची हानी झाली,'' असा आरोप भाजपचे राष्ट्रीय उपाध्यक्ष खासदार विनय सहस्रबुद्धे यांनी केला.

भाजपचे राज्याचे मुख्य प्रवक्ते माधव भांडारी लिखित आणि रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी प्रकाशित 'डाव्यांची ढोंगबाजी, भ्रष्टाचार, हिंसाचार आणि दंडुकेशाही' या पुस्तकाचे प्रकाशन पंडित नेहरू आर्ट गॅलरी येथे झाले. कार्यक्रमाला बेंगळुरूचे ब्लॉगर संदीप बालकृष्णन, भाजपचे शहराध्यक्ष योगेश गोगावले, प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक रवींद्र साठे, शेफाली वैद्य आदी उपस्थित होते. या वेळी बालकृष्णन यांची प्रकट मुलाखत घेण्यात आली.

''देशामध्ये डावेपणाचे जाणीवपूर्वक उदात्तीकरण करण्यात आले आहे. डावे असणे हे प्रतिष्ठेचे समजले गेले. विचारसरणींच्या कथनी आणि करणीत अंतर पडले की ढोंगबाजी सुरू होते. डाव्यांच्या ढोंगबाजीची अनेक रूपे आहेत,'' असे सहस्रबुद्धे यांनी स्पष्ट केले.

''असहिष्णुतेची भाषा करणाऱ्या डाव्यांच्या वैचारिक असहिष्णुतेची असंख्य उदाहरणे आहेत. डाव्यांच्या ढोंगबाजीची अनेक रूपे १९७० नंतर उघड होत गेली. निष्कर्ष काढायचे, शेरेबाजी करायची, इतरांना कमी लेखायचे ही डाव्यांची वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळेच डाव्या विचारांची शकले झाली आहेत,'' अशी टीकाही त्यांनी केली.

''डाव्या चळवळींमध्ये तपस्वी मंडळीही होती. या चळवळींच्या घसरणीची मांडणी भांडारी यांनी या पुस्तकातून केली आहे,'' असे त्यांनी नमूद केले.

''हे पुस्तक डाव्यांच्या विचारांबद्दलचे आहे. डाव्यांनी गेल्या ९० वर्षांत काय केले, याची तपासणी झाली पाहिजे. त्यांचा आर्थिक आणि बौद्धिक अप्रामाणिकपणा यातून दाखवला आहे,'' असे भांडारी म्हणाले.

''राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला (आरएसएस) कायम आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणारे डावे हे नक्षलवाद्यांबद्दल चकार शब्दही काढत नाहीत. हा देश टोळ्यांचा आहे, अशी मांडणी डाव्यांनी केली. भारत-चीन युद्धात त्यांनी शत्रूराष्ट्राला पाठिंबा दिला. त्यांचा हा ढोंगीपणा पुस्तकातून मांडला आहे,'' असे भांडारी यांनी सांगितले.

## प्रा. सोनग्रालिखित पुस्तकाचे प्रकाशन

''आयुष्यात मिळालेल्या संधीचा पुरेपूर उपयोग करणे जमले पाहिजे. जो

संधीचा उपयोग करतो, तो यशस्वी होतो. तुम्ही संधीच्या लाटेवर स्वार व्हा आणि यश मिळवा,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेविका आणि विचारवंत डॉ. माधवी खरात यांनी केले.

महाराष्ट्र विद्यार्थी साहाय्यक मंडळ आणि आर. के. सोनग्रा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रा. रतनलाल सोनग्रा लिखित 'विधी विधान से संविधान तक' या पुस्तकाच्या पाचव्या आवृत्तीचा प्रकाशन सोहळा नुकताच पार पडला. महाराष्ट्र विद्यार्थी सहाय्यक मंडळाचे सचिव डॉ. विकास आबनावे, गुजरातच्या नामवंत निवेदिका सुनीता चौधरी, अशोक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या उज्ज्वला देशमुख आदी या वेळी उपस्थित होते.

प्रा. सोनग्रा म्हणाले, ''जीवन जगण्यामागे काहीतरी हेतू असावा लागतो; पण तो गवसणे फार महत्त्वाचे असते. आंबेडकर सोप्या पद्धतीने मिळत नाहीत. त्यासाठी अतोनात कष्ट घ्यावे लागतात.'' विकास आबनावे यांनी प्रास्ताविक केले. विद्या चौकसे यांनी सूत्रसंचालन केले.

## दोन कोटी वृक्ष जगावेत : सी. विद्यासागर राव

''राज्यात काही दिवसांपूर्वीच विविध प्रकारच्या सुमारे दोन कोटी ८२ लाख रोपांची लागवड करण्यात आली. त्यापैकी दोन कोटींच्या वर वृक्ष जगले पाहिजेत आणि त्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. याबाबत कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना मुख्यमंत्र्यांना देखील केल्या आहेत,'' अशी टिप्पणी राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी केली.

राव यांच्या हस्ते राज्याच्या वन विभागाच्या वतीने उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ४८ कर्मचाऱ्यांचा आणि अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच 'पश्चिम घाटातील मत्स्यसंपदा' या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. महापौर प्रशांत जगताप, वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, आदिवासी विकास राज्यमंत्री अंबरीश आत्राम, जलसंपदा राज्यमंत्री विजय शिवतारे, वन विभागाचे सचिव विकास खारगे, प्रधान मुख्य वनसंरक्षक सर्जन भगत, मफिउल हुसेन, कुंडल ॲकॅडमीचे महासंचालक नरेश झुरमुरे, आमदार मेधा कुलकर्णी, जगदीश मुळीक उपस्थित होते.

राव म्हणाले, ''राज्याच्या काही भागांत वन्यप्राणी आणि मानव यांच्यातील संघर्ष तीव्र आहे. कायद्याची अंमलबजावणी करण्याबरोबरच सौहार्दपूर्ण भावनेने या संघर्षाकडे पाहिले जावे. तसेच त्यांची मानसिकता व दृष्टिकोन बदलण्यासाठी

प्रयत्न झाले पाहिजेत. हा संघर्ष हाताळण्यासाठी वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांना सुरक्षा दिली जाईल. त्याचबरोबर कार्यक्षमता वाढविण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील. एकाच दिवशी दोन कोटी ८२ लाख वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट साध्य करण्यात आले. वृक्ष लागवडीच्या चळवळीची गती अशीच कायम ठेवली पाहिजे. मात्र, लावलेली रोपे जगवण्यासाठी नागरिकांनी आणि सरकारने एकत्रित काम केले पाहिजे.''

''उद्योगधंद्यांमुळे मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होते. त्यामुळे त्यांच्या वाढीसाठी सरकारकडून विविध योजना आखण्यात येतात. मात्र, आता वाघांना पाहणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढत असून, त्यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होत आहे. उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी, उद्योगपतींसाठी ज्याप्रमाणे रेड कार्पेट टाकले जाते, त्याप्रमाणे राज्यातील वाघांसाठी आता रेड कार्पेट टाकण्याची गरज आहे,'' असे मुनगंटीवार यांनी सांगितले.

वन्यजीवांची हत्या आणि तस्करी रोखण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. वन व्यवस्थापन व वन्यजीवांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी वन विभागाकडून केले जाणारे प्रयत्न कौतुकास्पद आहेत. मात्र, त्याचबरोबर वन्यजीवांची हत्या आणि तस्करी करणाऱ्यांच्या विरोधात ठोस कारवाई करण्याची आवश्यकता असल्याचे राव यांनी सांगितले.

## १९वे आचार्य अत्रे मराठी साहित्य संमेलन

साहित्य निर्मितीच्या व समाजजीवनाच्या ज्या ज्या प्रवाहात आचार्य अत्रे शिरले, तो तो प्रवाह त्यांनी आपल्या कर्तृत्वाने व्यापून टाकला. लेखणी व वाणी ही शब्दशक्तीची दोन्ही रूपे प्रसन्न करतानाच, त्यांनी जीवनाच्या युद्धात लढण्यासाठी प्रभावी शस्त्र म्हणून विनोदाचा वापर केला,'' असे मत प्रा. मिलिंद जोशी यांनी सासवड येथे व्यक्त केले.

## प्रमाण मराठीचे महामंडळाला वावडे

**व्याकरणाच्या सुधारित नियमांचे काम आठ वर्षांनंतरही अपूर्ण**

भाषिक प्रदूषण वाढल्यामुळे प्रमाण मराठीची गरज भासू लागली. त्यासाठी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने प्रमाण मराठी लेखनाचे सुधारित नियम करण्याचे काम हाती घेतले; परंतु सुमारे आठ वर्षांनंतरही हे काम पूर्ण

होऊ शकलेले नाही. साहित्य महामंडळाच्या समोर हा विषय नसल्याची माहिती पुढे आली आहे.

मराठी भाषेबाबतचे साहित्य महामंडळाचे १९६२मधील नियम आज प्रचलित आहेत. महामंडळाच्या मराठीबाबतच्या नियमात अनेक त्रुटी व विसंगती असल्याने विविध तक्रारी व सूचना आल्या होत्या. प्रमाण मराठी कोणती, शुद्ध-अशुद्ध लेखन, प्रमाण मराठी कशी लिहावी व ती कशी बोलावी या विविध नियमांसाठी साहित्य महामंडळाचे कार्यालय मुंबई येथे असताना सात सदस्य समिती नेमण्यात आली होती. त्यापूर्वी १९९०मध्ये यासाठी प्रयत्न झाला होता; पण त्यास यश येऊ शकले नाही.

महामंडळाने या संदर्भात २००८मध्ये चार शहरांमध्ये चर्चासत्रे घेतली व त्यातून सात सदस्यीय समिती नेमण्यात आली. मराठीच्या नियमात काय बदल करायला हवा, त्रुटी कशा दूर करता येतील, संस्कृत प्रभावातून लिखाणापेक्षा स्वतंत्र शैलीतून लिहावे का, अशा विविध सूचना या समितीने आपल्या अहवालातून केल्या. या समितीने आपला अहवाल या वर्षी मार्च महिन्यात साहित्य महामंडळाकडे सुपूर्द केला. मात्र, त्याचवेळी महामंडळाच्या पुण्यातील कार्यालयाची मुदत संपत असल्याने त्यावर फार कम होऊ शकले नाही. साहित्य महामंडळाचे दर तीन वर्षांनी फिरते असणारे कार्यालय मुंबई, पुणे येथून आता नागपूरला गेल्याने हा अहवाल महामंडळाच्या पुण्यातील तत्कालीन पदाधिकाऱ्यांनी नागपूरच्या पदाधिकाऱ्यांकडे सुपूर्द केला आहे; पण त्यावर पुढे काहीच काम होऊ शकलेले नाही.

## संस्कृत बुकमार्कचे प्रकाशन


संस्कृत भाषेचा दैनंदिन जीवनातील वापर वाढावा आणि वेगवेगळ्या उपक्रमांतून संस्कृत भाषा सर्वांपर्यंत पोचावी, यासाठी गमभन प्रकाशनाने एक पाऊल उचलले आहे. संस्कृत सुभाषिते व समान आशय असलेली प्रसिद्ध वचने घेऊन वाचनखुणा (बुकमार्क), कॉफी मग आणि शबनम यांची निर्मिती गमभन प्रकाशनाने केली.

## संस्थेची शताब्दी आणि माजी अध्यक्षांची जन्मशताब्दी

प्राच्यविद्या संशोधनामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर नावाजलेल्या भांडारकर

**नवं कोरं**

# कॉन-टिकी




मूळ लेखक - **थॉर हेयेरडाल**

अनुवाद- **श्रीया भागवत**

**किंमत : २९५/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

"मग तू स्वतःच हा प्रवास करून का पाहत नाहीस?" प्रश्न आव्हानात्मक होता. आणि आव्हाने घ्यायची, धाडस करायची वृत्तीच मुळी त्या तरुण संशोधकाच्या अंगी भिनली होती.

थॉर हेयेरडाल या तरुण संशोधकाने तराफ्यावरून हजारो सागरी मैलाचा प्रवास करून प्रशांत महासागरापल्याडचा पोलिनेशिया गाठायचा, हे ठरविले. अर्थातच अनेकांनी त्याला वेड्यात काढले; पण तो ठाम राहिला. कारण त्याच्या सिद्धान्तानुसार कैक हजार वर्षांपूर्वी- अश्मयुगात असेच एका संस्कृतीचे स्थानांतरण झाले होते. मग त्याने अनेक अडथळ्यांवर मात करून, त्या लोकांसारखाच तराफा सिद्ध केला.

ही कहाणी, या 'वेड्या', अद्‌भुत वाटाव्या अशा साहसी प्रवासाची... ही कहाणी मानवी संस्कृती, निसर्ग, समुद्री जीवन, जलचर, वादळवारे यांची; मानवी इच्छाशक्तीची, एका शोधाची आणि एका तराफ्याची– 'कॉन-टिकी'ची!

प्राच्यविद्या संशोधन संस्थेची शताब्दी आणि संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. एम. आर. यार्दी यांची जन्मशताब्दी असा योग जुळून आला आहे. हे औचित्य साधून यार्दी कुटुंबीयांकडून २० ऑगस्टला संस्थेला देणगी प्रदान करण्यात आली.

केंद्रीय अर्थखात्याचे निवृत्त सचिव, पुण्याचे माजी जिल्हाधिकारी आणि संस्कृतचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. मधुकर रामराव ऊर्फ एम. आर. यार्दी यांची जन्मशताब्दी २२ ऑगस्ट रोजी सुरू झाली. ज्येष्ठ प्राच्यविद्या संशोधक डॉ. रा. ना. दांडेकर यांच्या आग्रहास्तव यार्दी सलग दोन वेळा भांडारकर संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष झाले. नोकरीतून निवृत्त झाल्यानंतर यार्दी यांनी भांडारकर संस्थेमध्ये संस्कृत विषयामध्ये अध्ययन आणि संशोधन करून ग्रंथनिर्मिती केली. भारतीय विद्या भवन संस्थेच्या पुणे शाखेचे संस्थापक असलेल्या यार्दी यांनी आळंदी देवस्थानचे विश्वस्त म्हणून प्रदीर्घ काळ जबाबदारी सांभाळली होती.

भांडारकर संस्थेशी असलेला ऋणानुबंध जपण्याची भूमिका घेत यार्दी कुटुंबीयांनी जन्मशताब्दीचे औचित्य साधून शताब्दी वर्षांत पदार्पण केलेल्या भांडारकर संस्थेला ५० हजार रुपयांची देणगी दिली. या देणगीतून संस्थेमध्ये दरवर्षी संत साहित्य, रामायण, महाभारत यापैकी एका विषयावर व्याख्यान आयोजित केले जाणार आहे. त्याचबरोबरीने डॉ. यार्दी यांचे छायाचित्र संस्थेला भेट देण्यात येणार आहे. हे छायाचित्र भांडारकर संस्थेच्या ग्रंथालयात लावण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थेचे माजी ग्रंथपाल वा. ल. मंजूळ यांनी दिली.

## साहित्यिकांनी मते मागून बघावीत : रामराजे

''तत्त्वज्ञान, वादविवाद सर्व ठीक आहे. साहित्यिक आणि प्रवचनकारांनी आमच्यासारखी मते एकदा मागून बघावीत. मग खरे काय ते कळेल. एक राजकारणी म्हणून मला साहित्य व राजकारण दोन्ही बाजू आपल्याच वाटतात,'' अशा शब्दांत विधान परिषदेचे सभापती रामराजे नाईक निंबाळकर यांनी साहित्यिक, त्यांचे वाद आणि राजकारणी यांच्यातील फरक विशद केला.

## अण्णा भाऊंचे स्मारक रशियात व्हावे : डॉ. साळुंखे

''भारतातीलच नव्हे, तर रशियातील लोकांनीही अण्णा भाऊ साठे

यांच्यावर प्रेम केले. त्यामुळे रशियात अण्णा भाऊंच्या नावाचे अध्यासन किंवा स्मारक उभारू, असे राज्य सरकारने मान्य केले होते. मात्र, हे अद्याप झाले नसल्याने यासाठी सर्वांनी पाठपुरावा करायला हवा,'' असे डॉ. आ. ह. साळुंखे यांनी सांगितले.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जन्मशताब्दीनिमित्त क्रांती थिएटर्सतर्फे मॉस्को (रशिया) येथे आंतरराष्ट्रीय साहित्य व सांस्कृतिक संमेलन होणार आहे. या निमित्ताने आयोजित समारंभात संमेलनाच्या बोधचिन्हाचे अनावरण डॉ. साळुंखे यांच्या हस्ते झाले. 'बार्टी'चे संचालक राजेश डाबरे, सामाजिक कार्यकर्ते अंकल गायकवाड, 'प्रबुद्ध रंगभूमी'चे टेक्सास गायकवाड, प्रा. कविता म्हेत्रे, संस्थेचे अध्यक्ष भगवान अवघडे, कार्याध्यक्ष अमर गायकवाड उपस्थित होते.

डॉ. साळुंखे म्हणाले, ''दुसऱ्याचे हृदय ओळखणाऱ्या आणि इतरांच्या काळजात स्थान मिळवलेल्या अण्णा भाऊंनी मराठी साहित्याचा झेंडा दूरवर फडकवला. जातिव्यवस्था, शोषणाच्या विरोधात लेखन केले. स्त्रिया, शेतकरी, दलित, शोषितांचे दुःख मांडले. रशियातील लोकही त्यांचे चाहते बनले. तेथे अण्णा भाऊंच्या नावाचे अध्यासन किंवा स्मारक उभारू, असे राज्य सरकारच्या सांस्कृतिक धोरणात नमूद केले आहे. ते प्रत्यक्षात उतरले, तर रशियातील जुनी पिढी अण्णा भाऊंवर किती प्रेम करत होती, हे नव्या पिढीलाही समजेल.''

## 'हे गजवदन...' नव्वद सुरांतून एक आवाज

कलेची देवता असलेल्या गणरायाच्या आगमनाची जोरदार तयारी सुरू झाली आहे. गणरायाची आरती असलेल्या वेगवेगळ्या ध्वनिफितीही बाजारात येऊ लागल्या आहेत. 'हे गजवदन...' या नावीन्यपूर्ण गीताबाबत उत्सुकताही वाढत आहे. कारण, या गीताच्या निमित्ताने एकत्र आले आहेत तब्बल ९० गायक, वादक, संगीतकार. प्रयोगशील कलाकार डॉ. सलिल कुलकर्णी यांनी हे शिवधनुष्य उचलले आहे.

आरती प्रभू यांनी १९७०च्या सुमारास 'अजब न्याय वर्तुळाचा' या नाटकासाठी लिहिलेली नांदी आणि प्रत्येक मराठी मनात वसलेली 'सुखकर्ता दुःखहर्ता' ही आरती अशा दोन काव्यांचा संगम करून कुलकर्णी यांनी 'हे गजवदन वक्रतुंड महाकाय' ही रचना स्वरबद्ध केली आहे. पियानो, गिटार, सतार, सरोद, पखवाज, मृदंग अशी वेगवेगळी वाद्यं, कथक नृत्यासाठीची

पढंत, पाश्चात्त्य ड्रम अशा वेगवेगळ्या स्वर-तालांचा समावेश यात आहे.

ज्येष्ठ गायक सुरेश वाडकर यांच्या सुरेल नंतर शास्त्रीय संगीतातील शौनक अभिषेकी, संजीव अभ्यंकर, आनंद भाटे, राहुल देशपांडे, सावनी शेंडे, मंजूषा पाटील, अनुराधा कुबेर, महेश काळे, भावसंगीत व चित्रपट गीतातील अवधूत गुप्ते, स्वप्निल बांदोडकर, बेला शेंडे, नंदेश उमप, वैशाली सामंत, संदीप खरे, मधुरा दातार, विभावरी आपटे, हृषीकेश रानडे, ऊर्मिला धनगर, मंगेश बोरगावकर, अभिजित कोसंबी वगैरे वेगवेगळ्या पिढीतील गायकांचे स्वर हे कानावर पडतात. या गायकांसोबतच कौशल इनामदार, मिलिंद इंगळे, नीलेश मोहरीर, मिथिलेश पाटणकर, मिलिंद जोशी या संगीतकारांनीही या गाण्याला आपला स्वर दिला आहे. या सर्वांनी एक-एक ओळ आपल्या आवाजात गायली आहे.

‘‘नांदी आणि आरती एकत्र करून हे गीत तयार केले आहे. एक नावीन्यपूर्ण प्रयोग म्हणून मानधन न घेता या गीतासाठी कलाकार एकत्र आले आहेत. ’’

## ‘निवडणूक नियम’ पुस्तकाचे प्रकाशन

‘सहकारी संस्था निवडणूक नियम आणि प्रक्रिया’ या पुस्तकाचे अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते प्रकाशन झाले. ‘पॉलिटिकल रिसर्च अँड ‘ॲनालिसिस ब्युरो’चे प्रमुख चंद्रकांत भुजबळ यांनी सहकारी संस्थांच्या निवडणुकांत ९७व्या घटना दुरुस्तीनंतर जे बदल झाले ते लक्षात घेऊन पुस्तक लिहिले आहे. अण्णा भाऊ साठे सभागृहात हा कार्यक्रम झाला. या वेळी महापौर प्रशांत जगताप, आमदार मेधा कुलकर्णी आदी उपस्थित होते.

## सावरकर विश्व संमेलन

औरंगाबाद येथील स्वातंत्र्यवीर सावरकरप्रेमी मित्र मंडळातर्फे ९ नोव्हेंबर रोजी इंडोनेशियातील बाली येथे ‘स्वातंत्र्यवीर सावरकर विश्व संमेलना’चे आयोजन केले आहे. अध्यक्षपदी शंकरराव रायकर असतील. साहित्यिक स्नेहल पाठक, प्रा. संजय पोहरकर, डॉ. नंदकुमार नाईक, सुधीर सेवेकर, प्रमोद सरकटे आदी यात सहभागी होतील. तसेच चित्रकला, रांगोळी स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रम होतील. या शिवाय सावरकरांचे विचार मांडणाऱ्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन होईल.

## ✍ ३ कोटी २० लाख संदर्भ लेख

इंटरनेट हे माहितीचे महाजाल आहे. या महाजालात माहितीचा अफाट खजिना आहे; परंतु नेमकी आणि मुद्देसूद माहिती मिळवणे हे दिव्य असतं. बऱ्याचदा आपण एखाद्या घटनेविषयी किंवा व्यक्तीविषयी इंटरनेटवर सर्च करायला जातो, तेव्हा अपेक्षित माहितीपेक्षा वेगळी आणि अनावश्यक माहितीच आपल्याला अधिक पाहायला मिळते. अशा वेळी 'विकीपीडिया' हे संकेतस्थळ अतिशय उपयुक्त ठरते. २८० भाषांतील तीन कोटी २० लाख नोंदी आणि संदर्भ असलेले हे संकेतस्थळ विद्यार्थ्यांपासून तज्ज्ञांपर्यंत प्रत्येकालाच उपयोगी पडते. आपल्याला हवे ते संदर्भ झटकन मिळवता येतात. माहितीचे वाचन सोपे जावे म्हणून या ॲपमध्ये काही बदलही करण्यात आले आहेत. विकीपीडियावरील एखादा संदर्भ वाचत असताना काही शब्दांना स्वतंत्र इंटरनेट लिंक दिलेली असते. ही लिंक ओपन केल्यानंतर पुन्हा पूर्वलेखाकडे जाता यावे, यासाठी या ॲपमध्ये 'टॅब्ड ब्राउजिंग'ची सुविधा देण्यात आली आहे. त्यायोगे अशा लिंक स्वतंत्र होतात. या लिंकचा 'प्रीव्ह्यू' देखील आपल्याला पाहता येतो. या ॲपमध्ये हवे ते लेख संकलित करून ठेवल्यामुळे ऑफलाइन असला तरी हे लेख वाचता येतात. या ॲपचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे,आसपासची महत्त्वाची ठिकाणे, गोष्टी यांची यादी हे ॲप आपोआप प्रदर्शित करते. याचा फायदा कुठल्याही पर्यटनस्थळी गेल्यानंतर होऊ शकतो.

## ✍ ह.मो.मराठे यांची न्यूज स्टोरी

"मराठी साहित्यात नवकथेचा कालखंड हा १९४५ ते १९७५ असा तीन दशकांचा समजला जातो. कथेतील पात्रांच्या अंतर्मनाचे पापुद्रे उलगडून दाखवण्याचे काम नवकथाकार प्रामुख्याने करीत असत. समाजमनाचे पापुद्रे उलगडून दाखवावेत या प्रेरणेतून माझे पुष्कळसे कथालेखन झाले आहे," असे मनोगत ज्येष्ठ साहित्यिक ह. मो. मराठे यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या 'कथासुगंध' या उपक्रमात व्यक्त केले. महाराष्ट्र कल्चरल सेंटरचे सचिन जोशी आणि प्रमोद काळे यांनी मराठे यांच्या 'न्यूज स्टोरी' या कथेचे अभिवाचन केले.

मराठे म्हणाले, "'न्यूज स्टोरी' ही कथा मी १९८१ मध्ये लिहिली. याच कथेवरचे 'दोन स्पेशल' हे नाटक गेल्या वर्षी रंगमंचावर आले असून, ते सध्या गाजत आहे. या कथेला त्या वर्षीच्या दिवाळी अंकातील सर्वोत्कृष्ट कथेचा पुरस्कार

मिळाला होता. त्या वेळी मी ‘किर्लोस्कर’ मासिकाच्या कार्यालयात उपसंपादक म्हणून काम करीत होतो. मला त्याआधीचा वर्तमानपत्रातील कामाचा अनुभव होता. रात्रपाळीचा मुख्य उपसंपादक म्हणूनही मी काम केले होते. त्या काळातले वर्तमानपत्राच्या कार्यालयातले रात्रपाळीचे व्यापार मला उत्तमरीत्या माहीत होते. त्याचा उपयोग या कथेचे लेखन करताना झाला. घटनेतील दुसरी बातमी मला अर्धवट झोपेत सुचली. ताबडतोब उठून मी कथा पूर्ण करून टाकली. मराठी कथा-कादंबऱ्यांचे अनेक नायक दोन बायकांच्या पेचात सापडलेले आढळतात. ‘न्यूज स्टोरी’ चा नायक दोन बातम्यांच्या पेचात सापडला आहे. पुनर्लेखन ही गोष्ट कथेला कसदार करते, तशीच अनेकदा ती कथा बिघडवूनही टाकते. प्रत्येक कथाकाराची अनुभवाकडे पाहण्याची दृष्टी वेगळी असते, त्यामुळे निर्मितीची प्रक्रिया आणि विषय एकच असूनही कथाकारांकडून वेगवेगळ्या कथा निर्माण होतात.

## अभिजात मराठीसाठी जावडेकर यांना साकडे

केंद्र सरकारने देशातील सहा भाषांना अभिजात दर्जा दिला आहे. मराठी भाषेलादेखील अभिजात दर्जा देण्यासाठीचा प्रस्ताव केंद्र सरकारने लवकरात लवकर संमत करावा, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री प्रकाश जावडेकर यांच्याकडे केली आहे.

मनसेचे शहराध्यक्ष हेमंत संभूस यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जावडेकर यांची भेट घेऊन मागण्यांचे निवेदन दिले.

महाराष्ट्र सरकारने भाषेच्या अभिजात दर्जासंदर्भात सविस्तर अहवाल तयार करण्यासाठी प्रा. रंगनाथ पठारे यांची समिती नेमली होती. समितीने अहवाल तयार केला; पण मागील दीड वर्षांपासून तो केंद्राकडे पडून आहे. मराठी भाषेला दोन हजार वर्षांचा इतिहास असून, तिला अभिजात दर्जा मिळावा, असे निवेदनात म्हटले आहे.

## आवड असून चालत नाही, चिंतन करा : विक्रम गोखले

‘‘साहित्याची आवड आहे, असे म्हणून चालत नाही; तर त्यासाठी मनन, चिंतन करावे लागते. वाचन हीदेखील एक भूक आहे, याचा विसर पडू देऊ नये,’’ असे मत ज्येष्ठ अभिनेता विक्रम गोखले यांनी व्यक्त केले. शकुंतला फडणीस यांच्या ‘हसरी गॅलरी’ या पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी ते बोलत होते.

**नवं कोरं**

**I Shall Not Hate** या पुस्तकाचा अनुवाद

गाझामधील एका डॉक्टरचा जीवनपट

# मी तिरस्कार करणार नाही

मूळ लेखक - **डॉ. इझेलदिन अबुइलेश**

अनुवाद- **श्यामल कुलकर्णी**




**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

डॉ. इझेलदिन अबुइलेश- ज्यांना आता 'तो गाझा डॉक्टर' असे ओळखले जाते, त्यांनी त्यांच्यावर कोसळलेल्या भयानक दुर्घटनेनंतर जगातील सर्व माध्यमांचे लक्ष वेधून घेतले आणि लोकांच्या हृदयात स्थान मिळवले. १६ जानेवारी, २००९ रोजी त्यांच्या घरावर झालेल्या इस्त्राईलच्या बॉम्बहल्ल्यात त्यांच्या तीन मुली आणि पुतणी बळी पडल्या.

गाझामधील लोकांच्या धडपडीचा आणि हलाखीच्या जीवनाचा अबुइलेश यांनी सांगितलेला वृत्तान्त वाचताना कधी स्फूर्तिदायक, तर कधी हृदयद्रावक वाटतो. गाझामध्ये राहणारा आणि इस्त्रायली इस्पितळात काम करणारा हा पॅलेस्टिनी असलेला वंध्यत्वोपचार तज्ज्ञ डॉक्टर आयुष्यभर या दोन विभागांतील सीमारेषा दररोज पार करत असे. एक डॉक्टर या नात्याने आणि मानवतेच्या दृष्टिकोनातून सार्वजनिक आरोग्य व्यवस्था सुधारणे आणि स्त्रियांचे शिक्षण यावर भर देणे, हे मध्य पूर्वेतील एकूण परिस्थिती सुधारण्यासाठी आवश्यक आहे, असे त्यांना वाटते.

या वेळी चित्रकार रविमुकुल, ‘वात्रटिका’कार रामदास फुटाणे उपस्थित होते. गोखले म्हणाले, ‘‘दुःखाने भरलेल्या या जगाला व्यंग्यचित्रांद्वारे हसविण्याचे काम शि. द. फडणीस यांनी केले. म्हणूनच त्यांचे आयुष्य नेमके काय आहे, हे सांगण्याचे आणि त्यांच्या व्यंग्यचित्रांचा काळ पुस्तकातून उलगडण्याचे काम शकुंतला फडणीस यांनी केले आहे.’’

शि. द. फडणीस म्हणाले, ‘‘चित्रकला कधीच संपत नाही; तर ती कायम जिवंत असते. नव्या पिढीला नव्या आशयामध्ये ती कायम भेटत राहते. चित्रामधील आशयही चित्रकार आणि पाहणाऱ्यांनाही पुन्हा नव्याने उमगत जातो.’’ रवीमुकुल म्हणाले, ‘‘तब्बल ५० वर्षांपासून फडणीस आपल्या व्यंग्यचित्रांद्वारे सर्वांना हसवत आहेत. अनेक अवघड विषय ते अगदी सोप्या पद्धतीने मांडत जातात. तपशिलाच्या भानगडीत न पडता साध्या, सोप्या पद्धतीच्या मांडणीमुळेच त्यांची चित्रे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली.’’

छायाचित्रकार मोहन गोखले यांचा या वेळी सत्कार करण्यात आला.

## आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सव

‘‘माहितीपटांना किंवा लघुपटांना चित्रपटांइतकी रसिकप्रियता मिळत नाही. लेखकांची नजरही लघुपटांकडे फारशी वळत नाही. लघुपट वास्तव मांडणारे असल्याने लोकांना भेडसावणारे प्रश्न मांडण्याचे व सोडवण्याचे आव्हान लघुपट निर्मात्यांनी पेलले पाहिजे.’’ असे मत डॉ. श्रीपाल सबनीस यांनी व्यक्त केले.

सम्यक आंतरराष्ट्रीय लघुपट व माहितीपट महोत्सवातील पारितोषिक वितरण ज्येष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगाशे व सबनीस यांच्या हस्ते झाले. महोत्सवाचे मुख्य संयोजक डॉ. अनिल सपकाळ, प्रा. विनोदकुमार जाधव, टेक्सास गायकवाड, धनंजय भावलेकर उपस्थित होते.

डॉ. सबनीस म्हणाले, ‘‘चित्रपटांमध्ये कल्पना अधिक असतात. मनोरंजन हा त्यांचा मुख्य उद्देश असतो. तरीही चित्रपटांना मोठा प्रतिसाद मिळतो; पण माहितीपट किंवा लघुपट वास्तववादी व प्रबोधन करणारे असूनही त्यांना रसिकांचा कमी प्रतिसाद मिळतो. विकसित मानवतेला हे चित्र शोभणारे नाही. लेखक-दिग्दर्शक-तंत्रज्ञ यांनी हे चित्र बदलले पाहिजे.’’

या वेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर माहितीपट पुरस्काराचे प्रथम

क्रमांकाचे पारितोषिक ‘जिलीपी’ या माहितीपटासाठी तुहीन मुखर्जी यांना तर आंतरराष्ट्रीय लघुपटाचा पुरस्कार ‘फॅटा मरगॅना’ या लघुपटासाठी अमेलाइ वेन यांना मिळाला. संदेश भंडारे, प्रा. संजीवकुमार कांबळे, अरविंद दवे, देविका दफ्तरदार यांनी परीक्षण केले.

## ✍ डॉ. कुमार सप्तर्षी यांचा गौरव

“वैचारिक मतभेद असले पाहिजेत. मात्र, या विरोधाचे रूपांतर शत्रुत्वात होऊ न देण्याचे भान जपणारी नेतृत्वाची पिढी बाळासाहेब ठाकरे, डॉ. कुमार सप्तर्षी यांची होती. विरोधी विचारांना संपविण्याचा कपटीपणा त्या पिढीने कधी दाखवला नव्हता. आता मात्र विरोध केला जातो तो संपविण्यासाठी, हे योग्य नाही,” असे प्रतिपादन शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केले.

अमृत महोत्सवानिमित्त डॉ. कुमार सप्तर्षी यांचा सर्वपक्षीय गौरव पुण्यात झाला. माजी न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर, ऊर्मिला सप्तर्षी, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, रजनी पाटील, हुसेन दलवाई, पालकमंत्री गिरीश बापट, बबन पाचपुते, विजय शिवतारे, अरुण गुजराथी, बच्चू कडू, डॉ. सदानंद मोरे, गिरीश कुलकर्णी आदी या वेळी उपस्थित होते. अन्वर राजन यांनी स्वागत केले.

ठाकरे म्हणाले, “सप्तर्षी यांची आणि आमची विचारधारा वेगळी आहे; परंतु उद्दिष्ट एकच आहे. आम्ही जात-पात मानत नाही; पण धर्म मानतो. आमच्या पिढीपुढे जे आदर्श होते, त्यापैकी एक सप्तर्षी असल्याने मी आवर्जून आलो. तुमचे विचार पटोत न पटोत, पण त्या विचारांशी सप्तर्षी यांनी कधी प्रतारणा केली नाही. मर्यादांच्या खुर्चीत ते कधीच बसले नाहीत; अन्यथा ते केव्हाच राज्यपाल झाले असते.” “स्वतंत्र भारताच्या इतिहासातील महाराष्ट्रातील आगळे व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. सप्तर्षी. ‘वादळ’ हा शब्दप्रयोग त्यांच्या बाबतीत खरा आहे. सप्तर्षींनी आंदोलने केली; पण तोडफोड, आक्रस्ताळेपणा कधी केला नाही. एका पिढीची वैचारिक जडणघडण त्यांनी केली. आजचे सत्ताधारी हुशारीने धार्मिक ध्रुवीकरण करू पाहत आहेत. या लढाईला सप्तर्षी यांनी बौद्धिक बळ द्यावे,” असे पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितले. “न पटणारे विचार मांडले तर तुम्हाला संपवले जाण्याची भीती वाटावी, असा आजचा काळ आहे. या विरोधात सत्याग्रह करण्याची गरज आहे,” असे चपळगावकर

म्हणाले. ''चुकीचे काही सांगायचे नाही आणि आंदोलनात एकही मणूस मरता कामा नये हा माझा कटाक्ष होता,'' असे डॉ. सप्तर्षी म्हणाले.

उद्धव ठाकरे यांनी डॉ. सप्तर्षी यांचा खास सत्कार करताना त्यांच्या खांद्यावर भगवी शाल टाकली आणि गणपतीची मूर्ती भेट दिली. या वेळी सप्तर्षी यांनी ''धाकट्याच्या खोड्यांकडे लक्ष देऊ नकोस,'' असा वडीलकीचा सल्ला उद्धव यांना दिला. ''शिवसेनेची स्थापना केल्यावर वर्षभराने बाळासाहेब ठाकरे पुण्यात आले होते, तेव्हा त्यांनी मला सेनेत येण्याचा आग्रह केला. ते मला ज्येष्ठ होते. ''तू लढाऊ आहेस; सेनेत का येत नाही?' असा प्रश्न त्यांनी केला होता. वेगळ्या वैचारिक भूमिकांमुळे ते घडले नाही; परंतु आमच्यातील स्नेह कायम राहिला. पुढे जयप्रकाश नारायण (जेपी) यांना मुंबईत सभा घ्यायची होती. मुंबईतील पहिलीच सभा सेनेमुळे अयशस्वी झाली तर देशात वाईट संदेश जाईल, अशी भीती जेपींनी माझ्यावर टाकली होती. त्यावेळी बाळासाहेबांचा पाठिंबा मिळवण्याची भूमिका 'जेपी'ना भेटायलाही गेले,'' असे डॉ. सप्तर्षी यांनी सांगितले.

## इंटरनेट वापर दुप्पट

देशातील ग्रामीण भागात इंटरनेटचा प्रसार वेगाने होत असून, २०२०पर्यंत देशातील इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या दुप्पट होऊन ७३ कोटींपर्यंत जाईल, असा अंदाज 'नॅसकॉम'च्या अहवालात व्यक्त केला आहे. 'द फ्युचर ऑफ इंटरनेट इन इंडिया' नावाचा हा अहवाल 'नॅसकॉम' आणि अकामाई टेक्नॉलॉजीने तयार केला आहे. २०१५ अखेरीस देशात ३५ कोटी इंटरनेट वापरणारे असल्याचे या अहवालात म्हटले आहे.

'इंटरनेट वापराच्या बाबतीत भारताच्या पुढे केवळ चीनच आहे. येत्या काळात ७५ टक्के इंटरनेट यूजर ग्रामीण भागातील असतील. भारतातील इंटरनेटचा वापर नुकताच अमेरिकच्याही पुढे गेला आहे. इंटरनेट वापराच्या बाबतीत भारत जगात दुसऱ्या स्थानी आहे. नव्या यूजर्सपैकी सुमारे ७५ टक्के लोक स्थानिक भाषांमध्ये माहिती मिळवतील. इंटरनेटचा प्रसार झाल्याने ऑनलाइन शॉपिंगला चालना मिळेल, असेही अहवालात म्हटले आहे.

''भारतात २०२० पर्यंत इंटरनेटचा प्रसार सर्वदूर होईल. त्यामुळे सर्वांना मोठ्या संधी उपलब्ध होतील,'' असे 'नॅसकॉम'चे अध्यक्ष आर. चंद्रशेखर म्हणाले.

देशात इंटरनेटचा प्रसार झाल्याने ई-कॉमर्स बाजारपेठ वाढणार आहे. २०१५-१६ या वर्षात देशातील ई-कॉमर्स बाजारपेठ सुमारे १७ अब्ज डॉलर्स आहे. २०२०पर्यंत देशातील ई-कॉमर्स ३४ अब्ज डॉलर्सपर्यंत जाईल. त्यात सुमारे साडेसतरा कोटी व्यक्ती ऑनलाइन व्यवहार करतील.

## पंजाबात नामदेव अध्यासन

संत नामदेवांमुळे महाराष्ट्र आणि पंजाबची संस्कृती जोडली गेली. याच नावामुळे दोन्ही राज्यांतील शैक्षणिक क्षेत्रही जोडले जात आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मदतीने पंजाब सरकार अमृतसरमधील गुरू नानक देव विद्यापीठात संत नामदेव अध्यासन सुरू करणार आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात गेल्या वर्षी गुरू नानक देव विद्यापीठात संत नामदेव अध्यासन सुरू करण्याची चर्चा झाली होती. त्यासाठी सर्व साहाय्य करण्याची तयारी कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे यांनी केली होती. 'सरहद'चे संजय नहार यांनी त्यासाठी दोन्ही विद्यापीठांच्या कुलगुरूंमध्ये चर्चा घडवून आणली. त्यानुसार पुणे विद्यापीठाने आराखडा तयार केला.

डॉ. गाडे याबाबत म्हणाले, "पंजाब सरकारचे मुख्यमंत्री प्रकाशसिंग बादल आणि गुरू नानक देव विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अजेबसिंग ब्रार यांच्यासोबत चर्चा झाली आहे. अध्यासनासाठी पंजाब सरकार आर्थिक मदत करणार आहे. पुढील शैक्षणिक वर्षात ते सुरू होईल. तेथील अध्यासनाची रचना, त्यासाठी आवश्यक साहित्य आणि अभ्यासक्रम तयार करण्यासाठी विद्यापीठ शैक्षणिक साहाय्य करणार आहे. संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे हे तेथे पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करतील."

"संत नामदेवांचा दृष्टिकोन सर्वसमावेशक होता. महाराष्ट्रातील पुरोगामी परंपरा घेऊन ते पंजाबपर्यंत गेले. त्यांचे विचार आजही उपयुक्त आहेत, ते दोन्ही राज्यांतील नव्या पिढीपर्यंत पोचविण्याची गरज आहे. त्यामुळे संत नामदेव आणि पंजाबची परंपरा यांची सांगड घालून त्या विषयाला अध्यापनाच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोचविण्याचा प्रयत्न अध्यासनाच्या माध्यमातून केला जाईल."

"या अध्यासनामुळे नामदेवांवरील नवीन संशोधन समोर येईल आणि ते सामाजिक आणि राष्ट्रीय ऐक्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल. केवळ महाराष्ट्र आणि

पंजाब यांच्या नात्यासाठीच नाही, तर या अध्यासनाचे महत्त्व राष्ट्रीय असेल. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायासाठी ही अभिमानाची गोष्ट आहे.''

## सामाजिक स्थित्यंतरांनुसार कविता अधिक व्यापक : गणोरकर

''कवितालेखन हा एक आविष्कार आहे. महिलांसाठी कविता या स्वातंत्र्याचा उद्‌गार ठरल्या. संत परंपरेनुसार महिलांसाठी कवितालेखन ही मानसिक गरज होती. त्यांच्या जाणिवांचा प्रवास यातून उलगडत गेला. सामाजिक स्थित्यंतरांनुसार महिलांच्या जाणिवा बदलत गेल्या आणि कवितांमधील विषय अधिक व्यापक झाले,'' असे मत प्रभा गणोरकर यांनी व्यक्त केले.

'मिळून साऱ्याजणी' मासिकाच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमामध्ये व. बा. उत्पल यांनी प्रभा गणोरकर आणि कविता महाजन यांची मुलाखत घेतली. 'मिळून साऱ्याजणी' मासिकाच्या संपादिका विद्या बाळ, वि. म. गीताली, सरिता आवाड तसेच संस्थेच्या पदाधिकारी या वेळी उपस्थित होत्या. या वेळी गणोरकर आणि महाजन यांना 'मराठी स्त्रियांच्या कवितांमधील बदलत्या जाणिवांचा प्रवास' मनोगतातून उलगडला.

''ध्येय पडलेले महिलांच्या जीवनाचे प्रतिबिंब कविता आहे. पूर्वीच्या काळात महिलांवर किती प्रकारचे दडपण होते, ते त्यांच्या लेखनातून जाणवते. आज सामाजिक परिस्थितीत बदल झाले असले, तरी महिलांची आव्हाने संपलेली नाहीत. नव्या पिढीच्या कवयित्रीदेखील हे विषय ताकदीने मांडत आहेत,'' असे गणोरकर यांनी सांगितले.

''काव्यरचना करताना महिलांवर अनेक प्रकारची बंधने घातली जातात. ही बंधने तोडून आपल्याला आलेल्या अनुभवांची मांडणी केली पाहिजे. याच वेळी आपले लेखन उथळ होणार नाही, याची काळजीही घेतली पाहिजे,'' असा सल्ला त्यांनी नवोदित कवयित्रींना दिला.

''चांगला अर्थ असणाऱ्या कविता या मराठी वाचकांपर्यंत पोचवल्या गेल्या पाहिजेत. मराठीमध्ये त्या उपलब्ध नसतील तर इतर भाषांतील कविता मराठीत अनुवादित करून छापल्या पाहिजेत. नवोदित कवयित्रींनी विषयाची मांडणी करताना अनुभवाचा आधार घेतला पाहिजे. कवितेमध्ये खोटारडेपणा नसावा. कविता लिहिताना स्वत:शी प्रामाणिक राहावे,'' असे महाजन यांनी सांगितले. विद्या बाळ यांनीही मनोगत व्यक्त केले. या वेळी 'मिळून साऱ्याजणी'

या मासिकाच्या अंकाचे, तसेच मीना सप्रे यांनी लिहिलेल्या 'ते माझे घर' या पुस्तकाचे आणि वंदना भागवत यांच्या 'शिट्टी' या कवितासंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. वि. म. गीताली यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले आणि सरिता आवाड यांनी सूत्रसंचालन केले.

## 'बालकथांतून जगण्याची प्रेरणा'

आयुष्य सुंदर करताना या पुस्तकातील छोट्या-छोट्या गोष्टींतून जगण्याची प्रेरणा मिळते. ही प्रेरणाच आयुष्य सुंदर करते असे मत समुपदेशक नीलिमा किराणे यांनी व्यक्त केले. 'गमभन प्रकाशन'तर्फे हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले. या वेळी ई-बुकचेही प्रकाशन करण्यात आले.

पुस्तकाचे लेखक जयप्रकाश झेंडे, डेलिहंटचे प्रतीक पुरी, प्रकाशक जयदीप कडू उपस्थित होते.

## हॅरी पॉटरची आठवी कादंबरी

नवी पिढी 'पोकेमॉन गो'च्या मागे लागलेली असतानाच बाजारात एक जुना 'सुपरहीरो' नव्याने आला आहे. तब्बल नऊ वर्षांच्या 'गॅप' नंतर त्याची 'एन्ट्री' झाली असली, तरी वाचकांनी त्याचे जोरदार स्वागत केले आहे. तो 'सुपरहीरो' म्हणजे हॅरी पॉटर. त्याची जादूई दुनिया अनुभवण्यासाठी 'हॅरी पॉटर अँड दी कर्स चाइल्ड' पुस्तकावर वाचकांच्या अक्षरश: उड्या पडत आहेत.

हॅरी पॉटर हा जे.के.रोलिंग या ब्रिटिश लेखिकेच्या कादंबरी शृंखलेतील आठवा भाग जुलैमध्ये वाचकांसमोर आला. बाल-कुमार वयोगटाबरोबरच पालकांनाही या पुस्तकाची उत्सुकता होती. त्यामुळे पुण्यात या पुस्तकाच्या हजारो प्रतींची विक्री झाली. काही दुकानांत तर वाचकांनी रांगा लावून पुस्तकाची खरेदी केली. प्रत्यक्ष खरेदीप्रमाणेच 'फ्लिपकार्ट', 'ॲमेझॉन'वरील खरेदीला वाचकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. यावरून हॅरी पॉटरची भुरळ कायम असल्याचे दिसून येत आहे.

'क्रॉसवर्ड'चे व्यवस्थापक अजय गुप्ता म्हणाले, ''हॅरी पॉटर' चा सातवा भाग २००९ मध्ये आला होता. त्यानंतर आठवा भाग सात वर्षांनी बाजारात दाखल झाला. तो येणार हे माहिती असल्याने अनेक वाचकांनी आमच्याकडे गर्दी केली. पहिल्याच दिवशी जवळपास एक हजार प्रतींची विक्री झाली. हा प्रतिसाद कायम आहे. आठ ते एकवीस वर्षांच्या वयोगटाकडून या पुस्तकाला

विशेष मागणी आहे.'' हॅरी पॉटर ही जे. के. रोलिंग या ब्रिटिश लेखिकेची आठ कादंबऱ्यांची शृंखला आहे.

१९९७ मध्ये 'हॅरी पॉटर अँड द फिलॉसॉफर्स स्टोन' हे पहिले पुस्तक प्रकाशित झाले. २००८ अखेरीस हॅरी पॉटर पुस्तकाच्या ४० कोटी प्रती विकल्या गेल्या. हॅरी पॉटर शृंखला आजवर ६७ भाषांमध्ये भाषांतरित करण्यात आली आहे.

## बालभारतीचे 'ई-लर्निंग' सॉफ्टवेअर

राज्यभरातील 'ई-लर्निंग' शाळांच्या विद्यार्थ्यांसाठी राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळातर्फे (बालभारती) स्वतंत्र संगणक प्रणाली (सॉफ्टवेअर) विकसित करण्यात येत आहे. राज्यात सध्या अस्तित्वात असलेल्या 'ई-लर्निंग' प्रणालींमध्ये अनेक त्रुटी असल्याने बालभारतीने हा निर्णय घेतला आहे. पुढील शैक्षणिक वर्षात हे सॉफ्टवेअर येईल.

'ई-लर्निंग'च्या शालेय साहित्याच्या तपासणी आणि प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याचे आवाहन ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१५मध्ये बालभारतीने केले होते, त्याला प्रतिसाद देत ई-लर्निंगचे सॉफ्टवेअर तयार करणाऱ्या १४ कंपन्यांनी बालभारतीकडे अर्ज केला. पहिली ते आठवीपर्यंतचे ई-लर्निंगचे साहित्य तपासणीसाठी बालभारतीकडे येते. त्यात सुमारे ६०० 'टायटल्स'वर (एखाद्या इयत्तेतील एका विषयाचे पाठ्यपुस्तक) आधारित साहित्याचा समावेश आहे; परंतु ऑडिओ-व्हिडिओ व्यवस्थित नसणे, पाठ्यपुस्तकाशी सुसंगत मजकुराचा अभाव, व्याकरणाच्या चुका इत्यादी त्रुटी या सॉफ्टवेअरमध्ये आढळल्या आहेत.

बालभारतीच्या सचिव धनवंती हर्डीकर म्हणाल्या, ''सॉफ्टवेअरमधील त्रुटी दूर करण्याच्या सूचना संबंधित कंपन्यांना दिल्या आहेत. त्यातील केवळ एक-दोन कंपन्यांनीच त्रुटी दुरुस्त करून पुन्हा सॉफ्टवेअर तपासणीसाठी पाठविले आहे. उर्वरित कंपन्यांच्या सॉफ्टवेअरच्या तपासणीचे काम सुरू आहे. आत्तापर्यंत केवळ १५ ते २० 'टायटल्स'मधील त्रुटी दूर झाल्या असून, त्यांना मान्यता देण्याची प्रक्रिया सुरू आहे.'' या सॉफ्टवेअरमध्ये अनेक त्रुटी असल्यामुळे विद्यार्थ्यांना दर्जेदार 'ई-लर्निंग' साहित्यापासून वंचित राहावे लागत आहे, हे लक्षात घेऊन आता बालभारतीने ई-लर्निंगची स्वतंत्र संगणक प्रणाली विकसित करण्याचे ठरविले आहे.

❖

नवं कोरं

TBC 26
Book No. 4




आपल्या मुलीच्या शोधात निघालेल्या बापाची अस्वस्थ करणारी कथा

# बॅड ट्रॅफिक

मूळ लेखक - **सायमन लुईस**

अनुवाद- **प्रसाददत्त गाडगीळ**

**किंमत : ३५०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

चिनी पोलीस जिआनचं आयुष्य तसं निवांत चाललेलं असतं. मुलगी दूरदेशात इंग्लंडमध्ये शिकत असते. फोनवरून तिची विचारपूस केली की, तो कर्तव्यातून मोकळा, असं त्याला वाटत असतं; पण अचानक एके दिवशी जिआनला त्याच्या लेकीचा फोन येतो – बाबा मला वाचवा, प्लीज, मला वाचवा! आणि जिआनचे डोळे उघडतात. कोणत्याही परिस्थितीत आपल्या मुलीचा शोध घ्यायलाच हवा असा निश्चय तो करतो खरा; पण त्याचा हा शोध त्याला नेतो त्याने कधीही कल्पना न केलेल्या, भयंकर गल्ली-बोळांमध्ये...

तिथे जिआनला भेटतो, अवैधरीत्या इंग्लंडमध्ये आलेला चिनी कामगार – डिंग मिंग. तो अस्वस्थ असतो, कारण त्याच्या सोबत आलेल्या त्याच्या पत्नीशी त्याला बोलायचे असते आणि त्यासाठी त्याचा पोशिंदा त्याच्याकडे नसत्या मागण्या करत असतो. त्याला आपल्या तालावर नाचवू पाहत असतो...

दोन अस्वस्थ पुरुष, निष्ठुर गुन्हेगारांच्या टोळ्या आणि इंग्लंडमधील अधोविश्वाची गुंतागुंतीची; अस्वस्थ करणारी थरारकथा!

# पुरस्कार



*** मधुमती शिंदे यांच्या 'दोस्ती' पुस्तकास पुरस्कार**

मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशित मधुमती शिंदे लिखित 'दोस्ती'पुस्तकास 'द फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स'चा पुस्तक निर्मितीसाठीचा प्रथम पुरस्कार जाहीर झाला आहे. बालसाहित्य प्रकारातील हा पुरस्कार आहे.

*** मंदार लवाटे यांना बेडेकर पुरस्कार**

शिवभूषण निनाद बेडेकर विचार मंचातर्फे देण्यात येणारा शिवभूषण निनाद बेडेकर स्मृती पुरस्कार प्रसिद्ध इतिहास अभ्यासक मंदार लवाटेआणि व्याख्याते मोहन शेटे यांना देण्यात आला. १७ ऑगस्टला भारत इतिहास संशोधक मंडळामध्ये हा कार्यक्रम झाला. ज्येष्ठ पुरातत्त्व अभ्यासक डॉ. गो. बं. देगलूरकर यांच्या हस्ते पुरस्कारार्थींना सन्मानित करण्यात आले, अशी माहिती मंचाचे सचिव पांडुरंग बलकवडे यांनी दिली.

*** बाबासाहेब पुरंदरे यांचा 'अत्रे पुरस्कारा'ने गौरव**

''पु. ल. देशपांडे यांच्या निधनानंतर विनोदी साहित्याचे दालन सुने झाले असून, लघुकथा हा प्रकारच लुप्त पावण्याची भीती निर्माण झाली आहे,'' अशी खंत शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी 'आचार्य अत्रे पुरस्कार' सोहळ्यात व्यक्त केली.

ज्येष्ठ साहित्यिक आचार्य अत्रे यांच्या ११८व्या जयंतीनिमित्त लोकसभा अध्यक्षा सुमित्रा महाजन यांच्या हस्ते बाबासाहेब पुरंदरे यांना आचार्य अत्रे पुरस्काराने विलेपार्ले येथील दीनानाथ नाट्यगृहात गौरविण्यात आले. या

सोहळ्याला सांस्कृतिक कार्यमंत्री विनोद तावडे, अत्रे यांच्या कन्या मीना देशपांडे, परचुरे प्रकाशनचे अप्पा परचुरे, सारस्वत बँकेचे अध्यक्ष गौतम ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते.

''आचार्य अत्रेंनी प्रत्येक क्षेत्रात आणि साहित्याच्या दालनात पराक्रम केला. मात्र, त्यांच्या पश्चात कादंबऱ्या आणि काव्य यांच्यावर धुके दाटल्यागत परिस्थिती सध्या निर्माण झाली आहे,'' अशी खंत बाबासाहेब पुरंदरे यांनी व्यक्त केली. 'मी आचार्य अत्रेंच्या सावलीत वाढलो. आम्ही दोघेही सासवडचे असून, पुरंदरे व अत्रे ही घराणी अत्यंत जिव्हाळ्याने सोबत राहिलेली आहेत. मी त्यांना सरकार म्हणायचो. त्यामुळे आज त्यांच्या नावाचा पुरस्कार मिळत असल्याने माझ्यासाठी ही आनंदाची बाब आहे,'' असे भावपूर्ण उद्‌गार पुरंदरे यांनी काढले. ''हा पुरस्कार माझ्या अभ्यास-विषयाला, इतिहास लेखनाला आणि शिवाजी महाराजांना मिळाला आहे असे मी समजतो,'' असे त्यांनी नमूद केले. लोकसभा अध्यक्षा सुमित्रा महाजन या वेळी म्हणाल्या, की आपण आपल्या स्वातंत्र्यप्राप्तीचा इतिहास विसरत चाललो आहोत. आपण मुघल, इंग्रजांचे राज्य याचा अभ्यास करतो. मात्र, आपल्या हिंदुस्थानी राजांनी, प्रशासकांनी आपल्या राज्याची घडी कशी बसवली त्याचा मात्र पुरेसा अभ्यास होताना दिसत नाही.

''अहिल्याबाई होळकरांनी भारतीय समाजाच्या दृष्टिकोनातून न्यायपद्धती अवलंबली. त्याचाही अभ्यास होणे आवश्यक आहे,'' असे महाजन यांनी नमूद केले.

या सोहळ्याप्रसंगी आचार्य अत्रे लिखित 'चांगुणा' या कादंबरीची नवी आवृत्ती, त्याचप्रमाणे शिरीष पै लिखित 'फक्त हायकू' हा कवितासंग्रह प्रकाशित करण्यात आला.

*** श्रावणबाळ साहित्य गौरव**

महाराष्ट्र साहित्य परिषद, इंदापूर आणि श्रावणबाळ अनाथ बालकाश्रम यांच्या वतीने दिला जाणारा 'श्रावणबाळ साहित्य गौरव पुरस्कार' कवयित्री संगीता वेताळ  यांना पद्मश्री डॉ. यु. म. पठाण यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. 'कविवर्य अरुण दा. ढवळे' काव्य संमेलनामध्ये पुरस्कार वितरण पार पडले. मानपत्र, स्मतिचिन्ह, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या वेळी माजी सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील, विजय कोलते, प्रकाश

पायगुडे, सुरेश देशमुख, श्यामसुंदर सोन्नर महाराज, शीतल मालुसरे, कृष्णा ताटे, राजीव करडे यांची प्रमुख उपस्थिती होती. वेताळ यांना यापूर्वी उत्कृष्ट सूत्रसंचलन, कविता सादरीकरण,काव्यवाचन स्पर्धा, निबंध स्पर्धा आदींमध्ये अनेक पारितोषिके मिळाली आहेत.

*** 'चला ओडिशाला' प्रथम पुरस्कार**

मराठी प्रवास वर्णन लेखक मंचातर्फे घेण्यात आलेल्या उत्कृष्ट मराठी प्रवास वर्णन स्पर्धेत 'चला ओडिशाला' - पांडुरंग पाटणकर, 'वेगळे प्रवास अनोखे अनुभव' - श्रीकृष्ण सवदी, 'काटेरी केनियाची मुलायम सफर' - डॉ. संदीप श्रोत्री या पुस्तकांना पारितोषिके मिळाली.

*** वाङ्मयीन व्यवहार हे सामाजिक काम : डॉ. खोले**

''व्यक्तिगत पातळीवरील लेखनापासून संस्थात्मक कामापर्यंत चालणारे वाङ्मयीन व्यवहार हे सामाजिक काम आहे. ते कमी दर्जाचे आहे असे मानले जाऊ नये,'' असे मत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेचा 'डॉ. गं. ना. जोगळेकर स्मृती पुरस्कार' यंदा ज्येष्ठ समीक्षक डॉ. विलास खोले यांना डॉ. मोरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

डॉ. खोले म्हणाले, ''ज्यांच्या हाताखाली शिकलो, त्यांच्याच नावाचा पुरस्कार मिळाल्याने भारावून गेलो आहे. १९६५पासून जोगळेकर आणि माझ्यात विद्यार्थी-शिक्षकाचे नाते होते. त्यांनीच साहित्य परिषदेच्या कामाची घडी बसवली. त्यांनी अनेक कविताही लिहिल्या आहेत. त्या पुस्तकरूपाने वाचकांसमोर यायला हव्यात.''

''कामावरची निष्ठा आता दुर्मिळ होत चालली आहे. हल्ली लोकांना काम न करताच श्रेय हवे असते. त्यासाठीच चढाओढ सुरू असते. वेगवेगळ्या क्षेत्रांत हे चित्र दिसते. ते बदलायला हवे,'' असे डॉ. मोरे म्हणाले.

*** स्वरशब्दप्रभू पुरस्कार**

''मंगेशकर कुटुंबात जन्मलो असल्यामुळे मला कामांची आणि प्रसिद्धीची कसली कमतरता असणार असं सरसकट कुणालाही वाटणं साहजिकच आहे. मात्र, हेच मंगेशकर आडनाव एकेकाळी माझ्यासाठी जणू लोहदंडच झालं होतं.

त्या अभिजात उंचीच्या घरातली एक खोली म्हणजे जणू एखादे कारागृह आणि पुढ्यात असणाऱ्या त्या तंबोऱ्याच्या तारा म्हणजे बेड्याच! अशा त्या मनोवस्थेतून काकतकर यांनीच मला बाहेर काढले. माझ्या यशात त्यांचे ८० टक्के श्रेय आहे,'' अशा शब्दांत ज्येष्ठ संगीतकार पंडित हृदयनाथ मंगेशकर यांनी आपल्या भावनांना वाट करून दिली.

संगीत, शब्द, जाहिरात, शिक्षण अशा विविध क्षेत्रांत मुशाफिरी करणारे दिवंगत बासरीवादक अजित सोमण यांच्या स्मरणार्थ यंदाचा 'स्वरशब्दप्रभू' पुरस्कार दूरदर्शनचे प्रयोगशील निर्माते अरुण काकतकर यांना मंगेशकर यांच्या हस्ते देण्यात आला. अनुराधा सोमण, भाग्यश्री सोमण-गढवाल, गुणवर्धन सोमण, प्रकाश भोंडे या वेळी उपस्थित होते.

मंगेशकर म्हणाले, ''माझ्या सुरवातीच्या काळात मला काकतकर भेटले आणि त्यांनी मला अक्षरश: हात धरून दूरदर्शनवर नेले. त्यांनीच मला आत्मविश्वास दिला. मला ओळख दिली. माझ्यासारख्या अनेकांना त्यांनी दूरदर्शनवर संधी देऊन प्रसिद्धीच्या झोतात आणले. अनेकांना पुढे आणून ते स्वत: मात्र मागे राहिले. 'मन असणारा माणूस' म्हणजे काकतकर.''

सोमण यांच्या आठवणी सांगताना मंगेशकर म्हणाले, ''अजित सोमण उत्तम वादक होते आणि तेवढेच उदार मनाचे होते, हळवे होते. एवढे चांगले बासरीवादक असूनही त्यांनी माझ्या ध्वनिमुद्रिकेसाठी कधीही वाजवले नाही.''

काकतकर यांच्या कार्याचा मागोवा घेणारा 'नक्षत्रांचे दिवस' हा दृक्‌श्राव्य कार्यक्रम झाला. या वेळी काकतकर यांच्याशी अरुण नूलकर यांनी संवाद साधला.

अरुण काकतकर म्हणाले, ''मला पुरस्कार मिळण्याची सवय नाही, त्यामुळे पुरस्कारांना उत्तर द्यायचीही सवय नाही; पण आज ज्यांच्या नावाचा पुरस्कार मला मिळतोय, त्या माझ्या मित्राच्या अजितच्या आठवणी माझ्या मनात दाटून येताहेत. १९७७मध्ये त्याला भेटलो तेव्हापासून तो जाईपर्यंत अजित माझा जवळचा मित्र बनून राहिला. त्याचं काम अतीव मोठं होतं; पण दुर्दैवाने तो एक 'अनसंग हीरो' राहिला.''

*** रत्नाकर मतकरी यांना पुरस्कार**

''समाजाचा एक वर्ग नेहमी दुखावून जायला टपलेलाच असतो. कलाकृतींवरील 'सेन्सॉरशिप' बाबत हे पहिल्यापासून चालत आले आहे;

परंतु समाजात जेव्हा अशी लाट येते आणि राज्यकर्तेही त्यावर मूग गिळून गप्प बसतात व त्याला पाठिंबा देतात, तेव्हा ते देशाचेच धोरण आहे की काय असे वाटते,'' असे परखड मत ज्येष्ठ नाटककार रत्नाकर मतकरी यांनी व्यक्त केले.

पुणे नगर वाचन मंदिरातर्फे आयोजित कार्यक्रमात डॉ. वि.भा. देशपांडे पुरस्कृत 'इंदिरा भालचंद्र पुरस्कार' मतकरी यांना अमोल पालेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. दहा हजार रुपये व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. संस्थेचे अध्यक्ष माधव सोमण, सचिव अरविंद रानडे, उपाध्यक्ष शरच्चंद्र ठकार, रवींद्र घारमळकर या वेळी उपस्थित होते.

मतकरी म्हणाले, ''पूर्वीच्या व आताच्या 'सेन्सॉरशिप'मध्ये थोडा फरक होता. 'घाशीराम कोतवाल', 'सखाराम बाईंडर' अशा प्रत्येक नाटकाला वेगवेगळ्या कारणांसाठी विरोध होत गेला. समाजाचा एक वर्ग नेहमीच 'आमच्या जातीवर घाला घातला', 'आमची अस्मिता दुखावली' अशा कारणांनी दुखावून जायला टपलेलाच असतो; परंतु समाजात अशी लाट येते आणि तुम्ही हे खायचे नाही, तुम्ही तसा पोषाख करायचा नाही असे सांगून मग काय करायचे हेही सांगितले जाते. माणसातील व्यक्तित्व काढून घेऊन आपण त्यांची बाहुली करणार असू तर त्या समाजव्यवस्थेला काही अर्थ नाही. मी एकाही साहित्य वा नाट्य संमेलनाला गेलेलो नाही. एकाच संमेलनाला योगायोगाने हजर राहिलो. आपले अग्रक्रम आपण ठरवायचे असतात. संमेलनांचे अध्यक्षपद हीच आयुष्याची इतिकर्तव्यता मानली तर त्यासाठी धडपडाल, इतर काही ठरवले तर त्यासाठी धडपड कराल.''

''कलावंताने सामाजिक जबाबदारीत खारीचा तरी वाटा उचलणे मला महत्त्वाचे वाटते. प्रवाहाविरुद्ध पोहण्याचे मतकरी आणि माझे आपापले प्रयत्न हा आमच्यातील हृद्य दुवा आहे,'' असे पालेकर यांनी सांगितले.

*** अक्रम शेख यांना 'रफी पुरस्कार' प्रदान**


लष्कर परिसरातील सामाजिक कार्यकर्ते अक्रम शेख यांना मोहंमद रफी फाउंडेशनतर्फे 'मोहंमद रफी सामाजिक पुरस्कार' राघवाचार्य यांच्या हस्ते नुकताच देण्यात आला.

❖

नवं कोरं

TBC 26
Book No. 5

# इन्फर्नो




मूळ लेखक - **डॅन ब्राऊन**

अनुवाद- **अशोक पाध्ये**

**किंमत : ६००/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

‘शोधा म्हणजे तुम्हाला ते सापडेल’ हे शब्द चिन्हशास्त्रज्ञ रॉबर्ट लँग्डन याच्या डोक्यात घोळत असताना तो रुग्णालयात जागा झाला. आपण कुठे आहोत, येथे कसे आलोत, हे त्याला आठवेना. जी एक गूढ वस्तू त्याच्याजवळ होती, त्याबद्दलही त्याला सांगता येईना.

त्याला ठार मारण्याची धमकी मिळाल्याने सिएना ब्रुक्स या तरुण डॉक्टरणीसोबत त्याने पलायन केले. मग इटलीच्या फ्लॉरेन्स शहरात त्याचा पाठलाग सुरू झाला. प्राचीन व ऐतिहासिक वास्तूंच्या खाचाखोचा माहीत असल्यामुळे आपला पाठलाग करणाऱ्यांना तो गुंगारा देऊ शकत होता.

डान्टेचे महाकाव्य ‘इन्फर्नो’मधील काही काव्यपंक्तींच्या साहाय्याने तो रहस्याचा मागोवा घेत चालला होता. ते रहस्य प्राचीन शिल्पे, चित्रे, इत्यादींमध्ये सांकेतिक स्वरूपात लपलेले होते. ते उलगडले तर जगाला एका भयानक संकटातून वाचवता येणार होते...

युरोपातील पार्श्वभूमीवर लिहिलेली डॅन ब्राउनची रहस्यमय व थरारक कादंबरी! चोवीस तासात घडणाऱ्या या घटना वाचताना वाचकाला अक्षरश: भोवळ येऊ लागते; ही कादंबरी पहिल्या पानापासून ते शेवटच्या पानापर्यंत वाचकाला खिळवून ठेवते!




# चिकन सूप फॉर द फादर्स सोल

भाग १

## पितृप्रेमाने ओतप्रोत भरलेल्या अनुभवांचा संग्रह

*‘आई’ या दोनच शब्दांतून मायाळू, बिनशर्त प्रेम करणाऱ्या व्यक्तीची प्रेमळ प्रतिमा उभी राहते, आणि ‘बाबा’ म्हटलं की, संरक्षक, आपल्याला सगळ्या गोष्टी पुरवणाऱ्या, शहाणपणाचे धडे देणाऱ्या, अधिक खंबीर अशा व्यक्तीची प्रतिमा उभी राहते. पित्याचं प्रेम दृढ आणि विश्वासार्ह असूनही बरेचदा ते तितक्या भावनाशीलतेनं व्यक्त होत नाही, पण ते आई इतकंच उत्कट असतं! फक्त ते बरेचदा शब्दांत मांडलं जात नाही. या पुस्तकात याच नात्याचे गोफ हळूवारपणे उलगडून दाखवणाऱ्या हळव्या कथा आहेत. या कथा वाचकांना त्यांच्या पित्याच्या गाढ प्रेमाची जाणीव देतील आणि त्यांच्या काळजाची तार छेडतील.*




*पित्याचं काळीज उघडून दाखवणाऱ्या हळुवार कथा...*

लेखन व संकलन

**जॅक कॅनफिल्ड / मार्क व्हिक्टर हॅन्सन**
**जेफ ऑबेरी / मार्क डोन्नेल्ली / क्रिसी डोन्नेल्ली**

अनुवाद

**सुप्रिया वकील**

*"पिता बनण्यापेक्षा जास्त खास आणि पवित्र भूमिका कुठलीच नसते, याचे स्मरण आपल्याला या पुस्तकातून घडते."*

**– मेरलिन ऑल्सेन**
**NFL Hall-of-Famer, अभिनेत्री**

*" 'चिकन सूप फॉर द फादर्स सोल' पित्याचं मुलांबद्दलचं अमर्याद प्रेम अधोरेखित करते."*

***– रॉबर्ट डेडमन, अध्यक्ष, क्लबकॉर्प***

*“वडिलांचं प्रेम ही एक सर्वोत्तम भेट मिळालेली गोष्ट असते, हेच या विलक्षण कथासंग्रहातून दिसून येतं.”*

**– बार्बरा डी अँन्जेलिस, पीएच.डी.**
**‘व्हॉट विमेन वॉन्ट मेन टू नो’च्या लेखिका**

*“ज्यांना आपण घेतलेला सर्वोत्तम निर्णय आठवून पाहायचा असेल, अशांसाठी ‘चिकन सूप फॉर द फादर्स सोल’ हा सुखद वाचनानुभव आहे. हा निर्णय म्हणजे : पिता बनण्याचा.”*

**– क्लाईड ड्रेक्स्लर, माजी NBA खेळाडू**

*“प्रेमळ पिता हा त्या व्यक्तीच्या मुलांसाठी आशीर्वादच असतो. या हृदयस्पर्शी कथा पितृत्वातील गुंतागुंतीच्या भावना आणि आनंदाचे अनेक क्षण उलगडून दाखवतानाच, जगभरातील समर्पित व आस्थेवाईक पित्यांसाठी उदाहरण घालून देतात.”*

***– सारा ओ’ मिअरा आणि यॉनी फेडरसन***
***संस्थापक, चाइल्डहेल्प, यूएसए***





**जॅक कॅनफिल्ड आणि मार्क हॅन्सन** जॅक कॅनफिल्ड आणि मार्क हॅन्सन हे चिकन सूप मालिकेचे संस्थापक व निर्माते म्हणून प्रसिद्ध आहेत. या दोघांनी लेखन व संकलन केलेल्या ‘चिकन सूप’ या मालिकेची सध्या दोनशे शीर्षके

आहेत आणि जगभरातील चाळीस भाषांमधील वाचकांपर्यंत ती पोहोचली आहेत.

**जॅक कॅनफिल्ड** यांचा जन्म १९४४ साली ऑगस्टमध्ये फोर्ट वर्थ, टेक्सास येथे झाला. त्यांनी शिक्षक, कार्यशाळा संयोजक, मानसोपचार तज्ज्ञ अशा विविध क्षेत्रांत काम केले आहे. कॅनफिल्ड यांची एकाच वेळी सात पुस्तके न्यू यॉर्क टाइम्सच्या 'बेस्टसेलर' पुस्तकांच्या यादीत आल्याने त्यांचे नाव 'गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये नोंदविले गेले आहे.

**मार्क हॅन्सन** यांचा जन्म १९४८ साली जानेवारीमध्ये झाला. ते अमेरिकेतील एक स्फूर्तिदायक आणि प्रेरणादायक वक्ते, प्रशिक्षक आणि लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. 'ओप्राह', 'द टुडे शो' अशा कार्यक्रमांमधून ते दिसले आहेत. 'युएस टाइम्स', 'द न्यू यॉर्क टाइम्स', 'आन्त्रप्रेनॉयर मॅगझिन' यांत त्यांनी लेखन केले आहे. सन २००० मध्ये त्यांना नॉर्थवुड विद्यापीठाने 'असामान्य औद्योगिक नेता' म्हणून गौरविले. गुण आणि तत्त्वे यांचे मानवीकरण करणारे म्हणून त्यांना 'होरॅशिओ अल्गर असोसिएशन ऑफ डिस्टिंग्विश्ड अमेरिकन्स'ने 'होरॅशिओ अल्गर' पुरस्काराने गौरविले. असे आणखीही अनेक मानाचे पुरस्कार मार्क हॅन्सन यांच्या नावावर आहेत.

## *अनुवादाची पार्श्वभूमी*

'आई' या दोनच शब्दांतून मायाळू, मनावर हळुवार फुंकर घालणाऱ्या, सांभाळ करणाऱ्या, बिनशर्त प्रेम करणाऱ्या व्यक्तीची प्रेमळ प्रतिमा उभी राहते, तर बाबा म्हटलं की, संरक्षक, सगळ्या गोष्टी पुरवणाऱ्या, शहाणपणाचे धडे देणाऱ्या अधिक खंबीर व्यक्तीची प्रतिमा उभी राहते. पित्याचं प्रेम, तेही तितकंच दृढ व विश्वासार्ह असूनही, तितक्या भावनाशीलतेनं ते व्यक्त होत नाही अथवा पूर्णत: लाभत नाही.

तीन वर्षांपूर्वी आम्ही या प्रकल्पाला सुरुवात केली, ती याच 'पितृत्वा'चा तसा सहजी हाती न येणारा गंध त्याच्या अगणित स्वरूपांमध्ये मिळवण्याचा

प्रयत्न करण्यासाठी. बरेचदा गैरसमजांची शिकार होणारं पिता व मुलांमधलं नातं आई-मुलांमधल्या भावबंधांपेक्षा वर्णन करायला कितीतरी पट अवघड असतं. आमच्या या कामामध्ये आम्हाला आढळलं की, 'बाबा'सुद्धा मनावर हळुवार फुंकर घालणारे, सांभाळ करणारे, मायाळू असतात. ते विनोदवीर असतात, प्रशिक्षक असतात, नेता असतात आणि आयुष्यातील सर्वांत महान धडे देणारे गुरूही असतात.

या पुस्तकात सहभागी होणाऱ्या प्रत्येकानं पित्याची मनाला भिडलेली गोष्ट व घडलेलं परिवर्तन याबद्दल लिहिलं आहे. यातील बऱ्याच गोष्टी पित्यांनी लिहिलेल्या आहेत; पण तुम्हाला यामध्ये मुलं आणि नातवंडांचे विचारही कळतील. या लोकांनी पित्याचं प्रेम अनुभवलं आहे, समजून घेतलं आहे आणि त्यांच्यामध्ये अधिक चांगले बदल घडले आहेत.

कदाचित यातल्या काही कथा तुम्हाला पित्याच्या महत्त्वपूर्ण भूमिकेचं महत्त्व अधिक जाणवून देतील; काही कथांतून तुम्हाला आपल्या कुटुंबासमोर प्रेम कसं व्यक्त करावं, याबद्दलच्या नव्या कल्पना मिळतील. तुमच्या वडिलांना तुमच्याबद्दल जे गाढ प्रेम आहे, त्याची जाणीव तुम्हाला काही कथांतून होईल, तर काही कथा तुमच्या काळजाची तार छेडतील.

आम्हाला या कथांनी खूप आनंद दिला आणि खूप काही शिकवलंही. तुम्हालाही तसाच अनुभव येईल, अशी आम्हाला आशा आहे. आमच्या असंही लक्षात आलं की, काही 'बाबा' त्यांच्या भावना शब्दांत व्यक्त करत नसले, तरी भावनेच्या पातळीवर ते आईच्या बरोबरीनं, कधी-कधी तर तिच्याहूनही सखोल असतात. पितृत्वाची जबाबदारी पार पाडताना वेदनेचे आणि त्यावर हळुवार फुंकर घालण्याचे, गोंधळाचे आणि डोक्यात लख्ख प्रकाश पडण्याचे, अश्रूंचे आणि हास्याचे अनेक क्षण येतात. हे अर्थातच बिनशर्त प्रेम असतं; पण याचा स्वाद मातृत्वापेक्षा निराळा असतो. आम्ही हा 'फादर्स सोल'चा मूक उत्सव तुमच्यासाठी सादर करण्याचा प्रयत्न केला आहे.

**– जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन,**
**जेफ ऑबेरी, मार्क डोन्नेल्ली, क्रिसी डोन्नेल्ली**

❖ ❖

# पितृत्व

*पितृत्व लाभणं, ही जगातील सर्वांत मोठी संधी लाभणं आहे...*
*आपल्याला मुलं असणं आणि त्यांना आयुष्याच्या विविध टप्प्यांवर*
*मोठं होताना पाहणं...*
*मी दररोज तीन ते चार वेळा या स्मृतिचित्रांशी थबकतो आणि*
*माझ्या आयुष्यातील त्या सुखकर काळाच्या आठवणींचे पक्षी*
*बोलावतो.*
*'मुलं' ही परमेश्वराकडून लाभणारी सर्वश्रेष्ठ देणगी असते.*

**– बिल बेल**

# चिरंतन क्षण!

वय वर्षे तीन ते नऊ या दरम्यानच्या आमच्या चिल्ल्यापिल्ल्यांचा लवाजमा गाडीत भरून नेणं, ही काही माझ्या मौजेच्या कल्पनेत बसणारी गोष्ट नव्हती. पण सकाळी अगदी लवकर... आणि बरोबर ठरलेल्या वेळी... मी हा चमत्कार घडवला होता. आम्ही लेक मिशिगनला सुट्टीला आलो होतो. आता सुट्टी सरली होती. मी कॉटेजमध्ये परत आलो, तेव्हा माझी बायको ईव्ही – केर – काढत होती.

''साडे-सहा झालेत... निघायची वेळ झाली,'' मी म्हणालो, ''मुलं कुठं आहेत?'' ईव्हीनं झाडू बाजूला ठेवला.

''मी त्यांना खाली किनाऱ्यावर शेवटची फेरी मारून यायची परवानगी दिलीय.''

मी माझ्या काळजीपूर्वक आखलेल्या वेळापत्रकावरच्या या अतिक्रमणामुळं वैतागून मान हलवली. रहदारीच्या तडाख्यात सापडण्याआधी आम्ही इथून निघणार नव्हतो, तर पहाटे उठायची तसदी तरी कशाला घेतली? मुलांनी (वाळूचे किल्ले बांधत, जादूई खडकांचा शोध घेत, सरोवरा किनारी भटकंती करत.) दोन आठवडे इथं निवांतपणे घालवलेच होते. आणि आजही ती गाडीत फक्त आरामच करणार होती... हवं तर झोपूही शकत होती... मला मात्र घरापर्यंतचा दीर्घ रस्ता एकट्यानं कापायचा होता.

मी पोर्चमध्ये जाऊन बाहेर नजर टाकली. किनाऱ्यावर वाळूच्या ढिगांपलीकडं माझी चारही मुलं दिसली. त्यांनी बूट काढून टाकले होते आणि ती पाण्यात पाय बुडवून खिदळत होती. प्रत्येक वेळी लाट पायावर फुटली की, ती उडी मारून खिदळत होती. अंगावरचे कपडे न भिजवता आपण सरोवरात किती आत जाऊ शकतोय, हे पाहण्याचा त्यांचा खेळ सुरू होता. हे दृश्य पाहून मला भयंकर संताप आला, कारण त्यांचे बाकीचे सगळे कपडे 'कार ट्रंक'मध्ये अक्षरश: कोंबून भरलेले होते.

मग मी मुख्य जवानाच्या ठामपणानं मुलांना ताबडतोब 'गाडीजवळ परत या,' हे ओरडून सांगण्यासाठी दोन्ही हातांचे अर्धगोल तोंडाशी नेले; पण कसं कोण जाणे, मनातले धारदार शब्द ओठांतच राहिले.

सकाळच्या वेळी सूर्याचे कोवळे किरण पसरलेले होते. खेळण्यात गुंगलेल्या चार लहान मुलांच्या सोनेरी आकृत्या दिसत होत्या. त्यांच्या दृष्टीनं सूर्य, पाणी आणि आकाश यांच्याकडून मिळणाऱ्या आनंदाचा अखेरचा थेंब टिपण्यासाठी फक्त काही क्षण उरले होते.

मी जितकं जास्त वेळ पाहात राहिलो, तितकं मला समोरच्या त्या दृश्याला जादूई वलय निर्माण झाल्याचं भासत होतं. कारण हे चित्र पुन्हा अशाच रूपात कधीही पाहायला मिळणार नव्हतं. आपल्या आयुष्यात आणखी एका वर्षानं, आणखी दहा वर्षांनी कोणते बदल घडावेत, असं आपल्याला अपेक्षित असतं? एक मात्र वास्तव होतं ते हा क्षण, हा झगझगता किनारा आणि ही मुलं – *माझी* मुलं! त्यांच्या केसांत सूर्यकिरण गुंफले होते आणि त्यांच्या हास्याचा आवाज वाऱ्याच्या आणि लाटांच्या आवाजात मिसळत होता....

मी स्वत:लाच प्रश्न केला... 'मी साडे-सहा वाजता निघण्यासाठी इतका का तडफडत होतो की, मी त्यांना झापण्यासाठी कॉटेजमधून धावत बाहेर यावं? माझ्या मनात विधायक शिस्तीचा विचार होता की, पुढं दिवसभर गाडी चालवायची आहे, हा विचार मनात ठुसठुसत होता? अगदी ठरलेल्या वेळी, नेमक्या ठोक्याला तिथून निघण्यानं कुठली बक्षिसं वगैरे मिळणार नव्हती की, आम्ही ठरवलेल्या वेळेपेक्षा तासभर उशिरा आमच्या मोटेलवर पोहोचलो, तर कुठलाही भव्य बँड आमची वाट पाहत तिष्ठत थांबणार नव्हता आणि मी माझ्या स्वत:च्या तरुणपणीच्या स्मृती जिवंत ठेवू शकलो नाही, तर मी आत्ता आणि पुढच्या काळातही माझ्या मुलांशी सुसंवाद राहण्याची अपेक्षा कशी ठेवू शकीन?'

खाली किनाऱ्यावर उभी राहून माझी थोरली मुलगी मला त्यांच्याकडं येण्याची खूण करत होती. मग बाकीच्यांनीही त्यांच्या मौजमस्तीत सहभागी होण्यासाठी ईव्हीला व मला हात करत हाका मारायला सुरुवात केली. मी क्षणभर मागं सरकलो; पण पुढच्याच क्षणी मी माझ्या पत्नीचा हात धरून तिला किनाऱ्यावर नेण्यासाठी कॉटेजमध्ये धावलो. आम्ही दोघं धावत, वाळूच्या छोट्या-छोट्या टेकड्यांवरून घसरत किनाऱ्यावर पोहोचलो आणि पायातले बूट भिरकावून दिले. आम्ही प्रफुल्लित मनानं, जरा जादाच शौर्यानं मुलांना मागं टाकत पाण्यात पुढं गेलो. ईव्हीनं तिचा स्कर्ट वर उचलला होता आणि मी पँट खालून दुमडली होती. अखेर ईव्हीचा पाय घसरला आणि ती कर्कश किंचाळत पाण्यात आपटली... तिनं मलाही मुद्दाम तिच्यासोबत पाण्यात ओढलं.

आज इतक्या वर्षांनीही, त्या दिवशीचं आमच्या चिमण्या मुलांचं हसणं आठवून मनाला खूप बरं वाटतं... किती दिलखुलास आणि प्रेमळ! आज मुलं जेव्हा त्यांच्या सर्वांत आवडत्या आठवणींचा कप्पा उघडतात, तेव्हा हे क्षण... ...त्यांच्या सर्वांत मौल्यवान क्षणांच्या कुपीत जपून असतात.

*– ग्रॅहॅम पोर्टर*

## गवताचा गंध

*माझे वडील कोण होते; हे महत्त्वाचं नाही, मला ते कोण म्हणून आठवतात, हे महत्त्वाचं !*

*– ॲनी सेक्स्टन*

नुकत्याच कापलेल्या हिरव्यागार पाचूसारख्या गवतावर पहुडणं, हा किती शांत-निवांत अनुभव होता! ओल्या गवताच्या गंधानं ॲम्बरला भूतकाळात बरंच मागं नेलं... ती चार वर्षांची होती, तेव्हा ती गवतावर पसरून मऊशार निळ्या आभाळाकडं टक लावून पाहायची. ती आणि तिचे डॅड ढगांचे प्राणी करत असत. ढग हत्तीसारखे दिसतात, असं तिचे डॅड नेहमी म्हणत असत. रातकिड्यांची किरकिर कानी पडत असे... उन्हाळ्याचा स्वर. उकाड्यानं अंगाची लाही-लाही होत असली तरी मागच्या अंगणातलं थंडगार गवत ॲम्बर व तिच्या डॅडना ताजंतवानं करत असे.

बालपणातले उन्हाळ्याचे दिवस आठवताना ॲम्बरला खरबुजं, बर्फाच्या

कांड्या, प्लॅस्टिक पूल्स, तुषारांची कारंजी, निळंशार आभाळ, स्वच्छ नितळ पाणी आणि हिरवं-हिरवं गवत आठवतंच.

ॲम्बर आठवणींच्या प्रदेशातून बाहेर आली आणि तिनं पुढच्या दाराचं कुलूप काढलं. कितीतरी वेळ ती त्यांच्या घराचं मागचं अंगण आणि वडिलांसमवेत घालवलेले उन्हाळ्याचे दिवस, याबद्दल विचार करत होती.

ॲम्बरचे वडील २४ ऑगस्ट १९९० रोजी निवर्तले होते. त्या वेळी ती फक्त पाच वर्षांची होती. त्यांना त्या वर्षीच्या उन्हाळ्यात कर्करोगाचं निदान झालं होतं; पण ही गोष्ट त्यांनी ॲम्बरला कळू दिली नव्हती. त्यांचे अखेरचे काही आठवडे उरले होते. त्या काळातल्या त्यांच्या सहवासावर त्यांना दु:खाचा झाकोळ नको होता. अलीकडं तिला त्यांची फार-फार आठवण होत होती, गेल्याच मंगळवारी ते पंचेचाळीस वर्षांचे झाले असते. ते गेले तेव्हा ती खूप लहान होती, तरीसुद्धा तिला त्यांच्या सगळ्या गोष्टी आठवत होत्या. त्यांचं खळखळून हसणं, तांबुस रंग, त्यांचं दिलासादायक हास्य... त्यांच्यासोबतचा प्रत्येक क्षणन्‌क्षण तिला अतिशय प्रिय असायचा. ती डॅडची छकुली होती.

ॲम्बरनं तिच्या आईच्या डेस्कवर साहित्य आदळलं आणि इतिहासाच्या अभ्यासाला सुरुवात केली. वीस मिनिटांनी तिनं आळोखे-पिळोखे देत आजूबाजूला पाहिलं – तिला पेन्सिलला टोक करायचं गिरमीट हवं होतं. तिनं जुन्या ओकच्या डेस्कच्या प्रत्येक डॉवरमध्ये शोधलं. एका ड्रॉवरमध्ये तिला इतर वह्यांच्या गठ्ठ्यात एक जीर्ण निळी वही सापडली. त्या वहीच्या चामडी कव्हरला स्पर्श करताना तिच्या हात थरथरला. तिनं दीर्घ श्वास घेतला आणि वही उघडून काळ्या किरट्या अक्षरातील मजकूर वाचू लागली.

*जुलै २६, १९९०*

*मी अजूनही माझ्या इवल्याशा परीपुढं ही बातमी फोडलेली नाही. जेव्हा-जेव्हा मी तिच्या गोड डोळ्यांत पाहतो, तेव्हा ही गोष्ट सहजतेनं सांगण्यासाठी मला शब्दच मिळत नाही. मला तिची सर्वांत जास्त आठवण होईल. मला तिला मोठं होताना पाहता आलं तर... आम्हा दोघांमध्ये खूप साम्य आहे. मी परमेश्वराजवळ प्रार्थना करतो की, तिला कायम सुदृढ आणि सुंदर ठेव. मी या जगात नसेन तेव्हा मी तिच्यावर लक्ष ठेवीनच. आमच्या अंगणात गवतावर खेळतानाचे मौजेचे क्षण मला फार-फार आठवतील. ती माझ्यासोबत खेळायला स्वर्गात येईल, त्या दिवसाची मी वाट पाहात असेन.*

ॲम्बरनं वही खाली ठेवली. तिला पुढं वाचायची आवश्यकता नव्हती. ती मूकपणे अश्रू ढाळत होती... थोडं दु:खानं तर थोडं आनंदानं; पण त्याहून महत्त्वाचं कारण म्हणजे, त्या वहीतून वाळलेल्या गवताची चार इवली पाती तिच्या हातात पडली होती.

– *ॲडेलैड इसॅक*

## मी आजोबा

मी तीन मुलांना वाढवलं आहे. त्यामुळं आता आपण प्रेक्षक या भूमिकेत मातापित्यांची पुढची पिढी पाहणार आहोत, असं मला वाटत होतं; पण माझ्या मुलीनं – मेरी किमनं – तिला दिवस गेल्याची गोड बातमी देत विचारलं,

''डॅड, तुम्ही आमचे 'नॅचरल चाईल्डबर्थ कोच' व्हाल का?''

मी डोळे चोळले आणि क्षणभर थबकलो.

मेरी किमनं मला बेत समजावून सांगितला, तेव्हा माझ्या चेहऱ्यावरून खारट द्रवाचे ओघळ वाहू लागले.

तिचा नवरा स्टीव्ह प्रशिक्षकाच्या नव्या नोकरीसाठी हजार मैल दूर जाणार होता आणि तिची आई बिझनेस एक्झिक्यूटिव्ह असल्यामुळं तिला बरेचदा दौरे असत, त्यामुळं हायस्कूल शिक्षकाची नोकरी करणारा मी घरी जखडलेला असायचो.

तरी मी चिवटपणे विचारलं, ''स्टीव्ह नाही का करू शकत?''

''डॅडी, माझं बाळंतपण फेब्रुवारीत येतंय. तो बास्केटबॉलचा हंगाम असतो. त्यामुळं मी इथं राहावं, असं आम्ही ठरवलंय.''

अगदी तर्कशुद्ध! तिचा नवरा देशाच्या दुसऱ्या भागातून 'चाईल्डबर्थ कोच' ही भूमिका पार पाडू शकणार नव्हता; पण मी पोरंबिरं या जंजाळातून बऱ्याच वर्षांपूर्वीच निवृत्त झालो होतो.

''डॅड,'' ती माझा हात धरत म्हणाली, ''आपला जॉन झाला त्या वेळी तुम्ही 'बाळाचा नैसर्गिक जन्म' या विषयाचा अभ्यास केला आहे. तुम्ही त्याची सुरुवात केलीय,'' ती तिच्या धाकट्या भावाच्या जन्माच्या वेळचा दाखला देत म्हणाली.

चिंता... त्या जोडीला जराशी उरात धडकी... अपेक्षा, थरार....

''नक्कीच,'' मी शूरपणे म्हणालो, ''अगदी आनंदानं.''

मग दुसऱ्याच दिवशी सकाळी आम्ही स्त्रीरोग व प्रसूतिशास्त्रतज्ज्ञाकडं गेलो. मी कधी काळी या प्रकारच्या 'स्पेशालिस्ट'कडं आलो होतो. आम्ही तिथं गेल्यानंतर

प्रतीक्षागृहात काहींना आठ्या पडल्या, तर काहीजण हसू दाबत आहेत असं वाटलं. माझ्यात वेडाबिडाची यत्किंचितही छटा नव्हती; पण आम्हाला नखशिखान्त न्याहाळणाऱ्या तिथल्या अर्धा डझन बायकांच्या आणि तीन पुरुषांच्या भुवया सामुदायिकरीत्या उंचावल्या.

माझी दाढी हे तर कारण नसेल? तिथं बसलेले पुरुष माझ्या मागच्या लिटल् लीग टीममधल्या खेळांडूसारखे दिसत होते. त्यांना पितृत्वाची प्रतीक्षा होती. ते माझ्याकडं चोरून बघत होते. मला अगदी अपमानित वाटत होतं. मी काही इतका प्राचीन, पुरातन वगैरे दिसत होतो की काय?

तितक्यात स्वागतिकेनं हाक दिली.

''मिस्टर ॲन्ड मिसेस. एस, आत चला.''

''नाही, मी मिस्टर नाही...'' मी काकुळतीनं सांगत होतो.

पण त्या बाईनं माझ्या वाक्याकडं दुर्लक्ष करून माझ्या मुलीला वजनकाट्यावर उभं राहायचा हुकूम दिला.

''यावर उभ्या राहा!''

अशा प्रकारे नोंद दुरुस्त करण्याचे माझे प्रयत्न विफल झाले.

त्यानंतर त्या शुभ्र पोशाखातल्या बाईनं आम्हाला एका छोट्याशा खोलीत कोंबलं. कागदानं आच्छादलेल्या तपासायच्या टेबलाच्या वरच्या बाजूला हस्तिदन्ती रंगछटा असलेले प्लॅस्टिकचे समुद्रपक्षी घिरट्या घालत होते. मी ते पक्षी फिरवू लागलो. तितक्यात कुणीतरी आत आलं. पक्ष्यांच्या कसरती पाहून ती हसली.

''डॉक,'' माझी मुलगी म्हणाली, ''हे माझे डॅड.''

डॉक्टर अगदी किशोरवयीन मुलीसारखी दिसत होती.

ती म्हणाली, ''ते इतके मोठे वाटत नाहीत.''

त्या चटोर वाक्यानं पुढं कित्येक महिने माझा अहंकार सुखावलेला होता.

मग डॉक्टरांनी 'फीट्ल मॉनिटर'नामक एक अत्याधुनिक दिसणारं उपकरण माझ्या मुलीला जोडलं. त्यावर एक इवलंसं 'हृदय' फ्लॅश होऊ लागलं त्यावर मी माझ्या नातवंडाच्या हृदयाचे ठोके क्वाड्राफोनिक स्टिरिओवर ऐकले.

डॉक्टर म्हणाली, ''बाळा, आजोबांना नीट ऐकव...''

अशा प्रकारे कोचिंगमधला पहिला अडथळा यशस्वीरीत्या दूर झाला.

त्या रात्री मी ग्रंथालयात गेलो आणि तिथं 'बाळाचा नैसर्गिक जन्म' या विषयावरच्या पुस्तकांचा ढीगच्या ढीग काढला. त्या पुस्तकांत बाळाच्या जन्माच्या पद्धती, भयमुक्त बाळंतपण, नैसर्गिक बाळंतपण यांबाबत माहिती

**नवं कोरं**

# चिकन सूप
## फॉर द
# सिस्टर्स सोल

**भाग २ व ३**




मूळ लेखक- **जॅक कॅनफिल्ड**
**मार्क व्हिक्टर हॅन्सन**
**पॅटी ऑबेरी**
**केली मिशेल झिमरमन**

अनुवाद- **विनीता जोगळेकर**

**प्रत्येकी किंमत : १४०/-रु. । प्रत्येकी पोस्टेज :५०/-रु.**

बहिणी-बहिणींच्या नात्यातला हा भावबंध त्यातल्या वात्रट, रांगड्या, बोचऱ्या आणि प्रेरक छटांसह.
तुमच्या त्या झिपऱ्या केसांचे दिवस अन् लांबसडक केसांचे दिवस तिनं पाहिलेले असतात आणि अगदी तुमची पहिली रुपेरी बटही तिच्या परिचयाची असते. तीच तर असते, पहिली स्वस्तातली ब्रा विकत घेऊन देणारी तुमची सल्लागार. त्यानंतर मग तुमचा लग्नाचा पोषाख आणि बाळंतपणानंतरची जीन्स खरेदी करतानाची मार्गदर्शक ती तुमची बहीण असते, मैत्रीण असते, तुमचा विश्वास असते.
तुमच्या आयुष्यात ती जे जे काही घेऊन येते, त्या सर्वांची मजा, 'चिकन सूप फॉर द सिस्टर्स सोल' च्या ह्या दुसऱ्या भागात अनुभवा. हृदयस्पर्शी प्रेरणादायक आणि हास्यस्फोटक गोष्टींचा हा संग्रह तुमच्या त्या रम्य दिवसांचे स्मरण करून देईल. काळजाला भिडणाऱ्या ह्या कहाण्या तिनं तुम्हाला तुमच्या खडतर काळात कसा आधार दिला, यावरही प्रकाश टाकतील.

होती. तिथून येणा-जाणारे माझ्या पुस्तकांच्या कलत्या मनोऱ्याकडं पाहात होते.

मी बरेच तास वाचन केलं, विस्तृत टिपणं काढली. आता मला श्वासोच्छ्वास, कळा यांबाबत सगळं काही माहीत झालं होतं. आता फक्त ती वेळ येण्याची खोटी होती!

'नॅचरल बर्थ' विषयातील माझ्या पहिल्या 'रिफ्रेशर कोर्स'च्या आठवडाभर आधी माझी पत्नी व मुलीनं माझ्या 'कोचिंग'बद्दल पुनर्विचार सुरू केला. त्यांचं काहीतरी कुचुकुचु संभाषण सुरू असायचं, त्यावरून मला त्याचा सुगावा लागलाच होता. शेवटी त्यांनी मला या कामावरून दूर करताना त्यांना किती यातना होत आहेत, हे मला सांगितलंच. माझ्या आयुष्यातल्या या दोन स्त्रियांना अनुभव 'शेअर' करताना पाहून आणि त्यांचे मनात गुंजत राहिलेले हळुवार शब्द आठवून मी माझ्या पहिल्या क्लासच्या सायंकाळी म्हणालो,

''माझ्याऐवजी तुम्ही दोघी हा धडा का शिकत नाही?''

''पण डॅड, तुम्ही फार थरारून गेला होतात.''

माझी हकालपट्टी करणं त्यांना आणखी सोपं व्हावं यासाठी मी म्हणालो,

''तुम्ही मायलेकींनीच हे करावं हे बरं. शिवाय आई म्हणून तुला तिला समजून घेता येईल.''

त्या दोघींनीही सहानुभूतियुक्त हसत माझी सूचना स्वीकारली. मग मायलेकींचं गुळपीठ जमलं. दर क्लासनंतर त्या गावातल्याच एका हॉटेलमध्ये चहा घ्यायच्या. त्यांचं सतत कळांबद्दल बोलणं सुरू असायचं. त्यांनी बाळासाठी खोल्यांची रचना ठरवली. मला आराम करायला आणखी वेळ मिळू लागला.

मग 'रुग्ण' आणि घरधणीन धीरानं बाळाच्या जन्माची वाट पाहू लागल्या.

बाळाच्या जन्माची जी तारीख दिली होती, त्याच्या आदल्या दिवशी स्टीव्हनं भेटायला येऊन आश्चर्याचा धक्का दिला. मात्र लगेचच सोमवारी त्याला परत जावं लागणार होतं. फेब्रुवारी महिन्यातल्या त्या सकाळी डांबरी रस्त्यावरचं बर्फाचं आच्छादन फोडत मी त्याला गाडीतून स्थानिक विमानतळावर नेऊन सोडलं. त्यानंतर चार तासांनी पुन्हा वितळल्या बर्फावरून मार्ग काढत मी मेरी किमला रुटीन चेकअपसाठी घेऊन गेलो.

या वेळी तिथली पद्धत बदललेली होती. डॉक्टरांच्या आतल्या दालनाचं दार ताबडतोब उघडलं. परिचारिकेनं पुन्हा माझ्या मुलीचं वजन घेतलं. मी काट्यावर डोकावण्याचा प्रयत्न केला.

त्यानंतर आणखी एका परिचारिकेनं आम्हाला टेलिफोन बूथच्या आकाराच्या

दुसऱ्या एका प्रतीक्षागृहात नेलं. तिथं उडते समुद्रपक्षी नव्हते! कुणीही हसलं नाही.

माझ्या मुलीला आडवं व्हायला सांगितलं. मागच्या वेळचीच ती सुपरिचित उपकरणं तिच्या पोटाला चिकटवण्यात आली. बाळाच्या हृदयाचे ठोके पुन्हा एकदा ऐकायला मिळाले. त्या ठोक्यांची नोंद करत असताना परिचारिकेच्या भुवयांत मला चिंतेची चाहूल लागली.

त्या परिचारिकेनं घाईघाईनं मॉनिटर बंद केला आणि गडबडीनं आम्हाला दुसऱ्या मजल्यावर एका खोलीत नेलं. तिथं माझ्या मुलीला कसलीतरी उपकरणं जोडली – आण्विक पाणबुडीला असतात तसली. तपासणी झाल्यानंतर आम्ही तपासणी झाल्यानंतर आम्ही आता ते काय सूचना देतात, याची वाट पाहात पुन्हा स्वागतकक्षात थांबलो. आता ते काय सूचना देतात, याची वाट पाहात थांबलो. तितक्यात परिचारिका धावतच बाहेर आल्या. त्यातल्या एकीनं माझ्या मुलीचा हात धरत सांगितलं.

''मिसेस एस, डॉक्टरांना तुम्हाला आत्ताच्या आत्ता तपासायचं आहे.''

''मी इथंच थांबतो,'' मी म्हणालो.

दहा मिनिटांनी माझी मेरी किम बाहेर आली.

''आपल्याला हॉस्पिटलमध्ये जायचंय, आजोबा. माझं पाणी गेलंय. आता ते बाळंतपण करतील.''

मी अनुभवी होतो. मी माझ्या मधल्या मुलाचा – पीटरचा – जन्म पाहिला होता; पण तरीही आमच्या मूळ 'स्क्रिप्ट'मध्ये या गोष्टीचा उल्लेख कधीही आला नाही. 'फक्त रुटीन चेकअप'... हे शब्द माझ्या मनात घुटमळत होते.

मी गाडीचा दरवाजा उघडला आणि मेरी किमला आत बसायला मदत केली.

''डॅड.'' ती म्हणाली, ''मला जराशी भीती वाटतीय.''

जराशी भीती! इथं माझं सर्वांग थरथरत होतं; पण मी माझं भय प्रकट होऊ दिलं नाही.

''काळजी करू नकोस, बाळा. मी तुझ्या आईबरोबर इथं आलो होतो,'' मी म्हणालो.

हॉस्पिटल तिची वाटच पाहात होतं. एक मदतनीस प्रवेशद्वाराजवळ उभाच होता. मला आपण अतिमहत्त्वाची व्यक्ती असल्यासारखं वाटलं. तिथं काही कागदपत्रांवर सह्या करणं आवश्यक होतं. बाळ होवो, ना होवो; पण या कागदपत्रांवर सह्या करण्यानं तिला प्रवेश मिळणार होता. दुसऱ्या जागतिक महायुद्धावरच्या गुप्तहेरपटांतल्या पात्रांनीसुद्धा यापेक्षा कमी कागदपत्रं निर्माण केली असतील!

ते सगळे फॉर्मस् वगैरे भरून दिल्यानंतर मी त्या दालनाच्या दुसऱ्या टोकाला असलेल्या टेलिफोनच्या दिशेनं धावलो. फोन वॉर्डन त्यावर रेलून बसलेला होता. तो रशियन पॉवर लिफ्टरसारखा दिसत होता.

''मी फोन करू शकतो का? माझ्या मुलीची प्रसूती होतीय,'' मी आर्जवानं विचारलं.

तो माणूस गलेलठ्ठ जबड्यातून किंचितसा हसला आणि नाखुशीनंच होकारार्थी मान हलवली. मी वेडापिसा होऊन तीन फोन केले. तो अजस्त्र राक्षस पाहात होता. मी ॲडिलीला घरी फोन केला. मग ऑफिसमध्ये केला. ...पण काहीही प्रतिसाद मिळाला नाही. मी त्या दैत्याचे आभार मानून तिथून बाहेर पडलो.

प्रसूती दालनात मात्र माझा नूर एकदम पालटला. माझ्यात एकदम 'कोच डॅड' ही भूमिका भिनली. मी आता माझी तज्ज्ञता पाजळायला सज्ज होतो. तिला आत्ता डॅडची गरज होती.

तिथली परिचारिका म्हणाली, ''मिस्टर एस, आम्ही त्यांना दुसरे कपडे घालतोय आणि आधीचे कपडे तुमच्याकडं देतोय, ते गाडीत ठेवून लगेच इकडं या.'' मी 'मिस्टर एस' या बिरूदाबद्दल लढायचं सोडून दिलं.

मी इलेव्हेटरमध्ये येऊन खाली जाण्याचं बटण दाबलं. नंतर माझ्या मुलीनं सांगितलं की, 'मी तिची चूक दुरुस्त केली. ते माझे डॅड आहेत, मिस्टर एस नाहीत.'

त्यावर ती नर्स म्हणाली, ''तुमचे डॅड घाबरले होते वाटतं. त्यांनी तुमची कपड्यांची पिशवी इलेव्हेटर जवळच पाडली होती.''

त्यावर दोघीही हसल्या होत्या.

मी कारच्या दिशेनं मुसंडी मारली. कोच डॅड पुन्हा तरारून उठले होते. मी धापा टाकत प्रतीक्षागृहापाशी आलो. तिथं ॲडिलीला पाहून दचकलोच, निराशेनं माझ्या पायांचा वेग आवरता घेतला. तिच्या येण्यानं माझ्या कोचिंगची अखेर झाली. मी तिला थोडक्यात सगळं सांगितलं आणि ती इलेव्हेटरकडं जाताना खिन्न चेहऱ्यानं पाहात राहिलो. मग मी चेहरा टाकून घरी परतलो.

दोन तासांनी प्रसूतिदालनातून मुलीचा फोन आला.

''डॅड,'' ती म्हणाली, ''माझं काळं मेकअप किट घेऊन या.''

''अजून तिथंच आहेस?''

''होय. अजून इथंच डॅड.''

त्यानंतर तासाभरानं 'कोच मॉम'सुद्धा निवृत्त झाल्या. या मैदानाचे मुख्य

कोच स्टीव्ह बरीच विमानं धरत-धरत परत आले. तो आल्यानंतर काही क्षणातच माझ्या नातीचा – ॲलीचा – जन्म झाला. 'नॅचरल चाइल्डबर्थ कोच' म्हणून मला काहीच कामगिरी बजावता आली नाही; पण आता यातल्या कशालाच काही महत्त्व नव्हतं. मी आजोबा झालो होतो.

*– एफ. ॲन्थोनी डी' ॲलेस्सँड्रो*

## मूठभर ब्लॅकबेरीज

*माणसाची मुळं त्याच्या पालवीपेक्षा जास्त महत्त्वाची असतात.*

*– वूड्रो विल्सन*

मी न्यू यॉर्कमध्ये नव्या नोकरीला सुरुवात केली त्याच वेळी मला आणखी एक महत्त्वाचं काम शिकावं लागलं. पितृत्वाचं. ऑफिसमध्ये आमचे तीन प्रकल्प सुरू होते आणि घरी माझ्या भराभर मोठं होणाऱ्या छकुल्याला माझी गरज होती. एके दिवशी तर ही गोष्ट फारच ठळकपणे स्पष्ट झाली. गुरुवार होता. मी त्या आठवड्यात दुसऱ्यांदा कामाच्या निमित्तानं बाहेरगावी निघालो होतो. मी बॅग भरत असताना माझी पत्नी एलेन म्हणाली,

''तुझं काम किती महत्त्वाचं आहे ते मला माहीत आहे; पण तू घरी जास्त वेळ दिलास तर बरं होईल.''

तिचं बरोबर आहे हे मला कळत होतं. आमचा मुलगा ल्यूक तीन वर्षांचा होत आला होता, त्यामुळं मलाही इतकं घराबाहेर राहणं आवडत नव्हतंच.

''काल ल्यूक 'माझा डॅडी कुठं आहे? कुठं आहे तो?' असं म्हणत घरभर फिरत होता,'' एलेन म्हणाली.

एलेनला याबद्दल आणखीही बोलायचं होतं; पण मला वेळच नव्हता.

''हनी, मला हे विमान धरावंच लागणार आहे,'' मी म्हणालो, ''मी उद्या परत आल्यावर आपण बोलू या.''

शिकागोत माझी मीटिंग लवकर संपली, त्यामुळं मला काही तास वेळ काढावा लागणार होता. मग मी डॅनना फोन केला. डॅन म्हणजे आमच्या कुटुंबाचे जुने स्नेही. ते नातवंडांसमवेत राहण्यासाठी इथं आले होते. एकेकाळी डॅन इंडियानामध्ये शेती करत असत. त्या वेळी माझे वडील तिथं डॉक्टर होते.

आम्ही डॅन यांच्या घरी किचन टेबलाशी बसलो असताना त्यांनी माझे डॅड

किती चांगली व्यक्ती होते, त्याबद्दलच्या आठवणी सांगायला सुरुवात केली.

''काय वाटेल ते झालं तरी ते समोरच्या माणसाला बरं करायचे,'' डॅन सांगत होते.

''त्या प्रदेशात असा एकही माणूस नसेल, ज्याचं तुमच्या वडिलांवर प्रेम नसेल!''

आश्चर्याची गोष्ट म्हणजे डॅननी त्यांचं एक गुपित मला सांगितलं. ते म्हणजे, डॅनना प्रॉस्टेट कॅन्सरमधून बरं झाल्यानंतर प्रचंड नैराश्य घेरून आलं होतं. यातून  ते बाहेरच पडत नव्हते.

''मला बरं व्हावंसं वाटतच नव्हतं,'' डॅन म्हणाले, ''पण तुमच्या डॅडींनी मला त्यातून बाहेर काढलं.''

त्यांच्या आठवणींनी मी हेलावलो. त्यांच्या खांद्यावर हात ठेवत मी त्यांच्याशी सहमती दर्शवत म्हणालो,

''ते त्यांच्या रुग्णांची खूप काळजी घ्यायचे.''

माझे वडील त्यांच्या रुग्णांच्या बाबतीत किती मनापासून काम करायचे ते मला माहीत होतं, आणि ह्या समर्पणभाव आणि परिश्रम यांची किंमत मोजावी लागायची, हेही मला माहीत होतं... ही किंमत त्यांच्या कुटुंबाला फार मोठी वाटायची.

माझे डॅड उंचेपुरे, सडपातळ चणीचे होते. त्यांचे आकाशी डोळे कशाचाही थेट आरपार वेध घेऊ शकत असत. मात्र त्यांची थेट नजर आणि स्पष्ट बोलण्याची पद्धत असूनही त्यांच्याशी बोलणं नेहमीच सोपं वाटत असे.

आम्ही शेतावर राहायचो. आम्ही शेतकरी होतो म्हणून नव्हे, तर डॅडींचे बरेच रुग्ण तिथंच होते म्हणून. ते बरेचदा रोख पैसे देण्याऐवजी गुराढोरांच्या रूपात त्यांची फी द्यायचे. त्यामुळं डॅडींनी त्यांची 'फी' चरायला सोडता यावी यासाठी शेत घेतलं होतं.

माझ्या वडिलांच्या शिकारप्रेमाबद्दल तर बोलायलाच नको. मात्र ते कायम कुत्री पाळायचे. त्यांना शिकार करण्यासाठी प्रशिक्षित करण्याचं काम माझ्याकडं असायचं. हे काम त्यांनी माझ्याकडं सोपवलं होतं. कारण ते म्हणायचे की, माझ्याकडं तेवढी सहनशक्ती नाही. मात्र ते काहीही करोत अथवा ना करोत, मी एखादी गोष्ट स्वत:ची स्वत: करण्यातून काय शिकू शकेन, याकडं त्यांचं लक्ष असायचं. माझ्या डॅडनी मला सगळ्या गोष्टी शिकवल्या. त्यांनी मला करवत चालवायला शिकवली, बरोबर काटकोन आखायला शिकवला. त्यांनी शिकवलेल्या कौशल्याचं एक

नवं कोरं

भाग १ व २




# चिकन सूप फॉर द फादर ॲण्ड सन सोल

मूळ लेखक- **जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन, डोरोथी फर्मन आणि टेड स्लॉवस्की**

अनुवाद- **डॉ. मीना शेटे-संभू**

**प्रत्येकी किंमत : १७०/-रु. । प्रत्येकी पोस्टेज :५०/-रु.**

कोणतीही व्यक्ती ‘वडील’ बनू शकते, पण ‘डॅड’ होण्यासाठी ती खास व्यक्तीच असावी लागते.

वडील आणि मुलगे यांच्या आयुष्यातील कित्येक घटना ‘चिकन सूप फॉर द फादर ॲन्ड सन सोल’मधून मांडण्यात आल्या आहेत. मुलाचा जन्म, बालपण, किशोरावस्था, तारुण्य, प्रौढावस्था, ज्येष्ठ नागरिकत्वाची अवस्था हे आयुष्यातील महत्त्वाचे टप्पे आणि त्या टप्प्यांदरम्यानच्याही काही अवस्था यांचे चित्रण हे पुस्तक करते. जीवनयात्रा सुरू असताना वडील आणि मुलगा एकमेकांसमवेत कसे जगत असतात ते यात मांडले आहे.

उदाहरण म्हणजे मी आमच्या शेतापलीकडल्या तळ्यात नेण्यासाठी एक तराफा बनवला होता. त्याचा एक कोपरा जरासा बाहेर आला होता; पण डॅडनी त्या चुकीवर भाष्य न करता तो तराफा तळ्यात उतरवण्यात मला मदत केली होती. त्यांची मदत करण्याची सर्वोत्तम पद्धत म्हणजे ते असे प्रश्न विचारायचे की, त्यातून बऱ्याच गोष्टी माझ्या मलाच उमगायच्या.

एकदा शाळेत मी एका मुलाशी मारामारी करायला घाबरत होतो, तेव्हा त्यांनी मला विचारलं होतं,

"तू त्याच्याशी दोन हात करू शकशील?"

"असं वाटतंय खरं."

"नुसतं वाटायला नकोय. इथं उभा राहा आणि लाव ठोसा मला."

मी त्यांना अक्षरश: आडवं करेपर्यंत त्यांनी मला त्यांच्याशी मारामारी करायला लावली आणि म्हणाले,

"हे बघ, तू किती बलदंड आहेस याची त्याला फक्त कल्पना द्यायला हवीस. तू प्रयत्न कर आणि मग तो मागं सरकला नाही तर बघ."

मी त्याप्रमाणे केलं आणि यशस्वी झालो!

मला डॅडींकडून अशा प्रकारची मदत हवी होती; पण मी तेरा वर्षांचा झालो त्या उन्हाळ्यात ते माझ्या आयुष्यातून अक्षरश: अदृश्य झाले आणि मला काय करावं ते सुचेनासं झालं.

बरीच माणसं आजारी असायची, त्यामुळं डॅडींचा बराचसा वेळ रुग्णांना पाहण्यातच जात असे. शिवाय ते नवं ऑफिस बांधत होते आणि एक्स रे मशीन घेण्यासाठी आवश्यक तेवढे पैसे मिळवण्याच्या प्रयत्नात होते. आम्ही रात्री जेवायला बसलो की बरेचदा फोनची रिंग वाजायची. फोनवर डॅड सांगायचे "आत्ता येतो."

मग मॉम त्यांचं ताट झाकून ठेवायची. मग ओव्हनमध्ये ठेवलेलं त्यांचं ताट त्यांची वाट बघत राहायचं.

बरेचदा त्यांना परत यायला तासभर किंवा त्यापेक्षाही जास्त वेळ लागत असे. मग त्यांच्या गाडीचा आवाज ऐकला की, मी धावत खालच्या मजल्यावर जात असे आणि ते जेवायला बसले की त्यांच्याजवळ बसत असे. मग ते दिवसभर काय काय घडलं त्याची चौकशी करत असत आणि मी शेतात काय करावं, याबद्दल मला जो सल्ला हवा असेल तो देत असत.

ते वर्ष सरलं तशी मला त्यांची काळजी वाटू लागली आणि स्वत:चीही.

मला त्यांच्या मदतीची उणीव भासत होती. त्यांच्या हास्यविनोदाची उणीव भासत होती आणि फक्त एकमेकांसोबत असण्याचीही. मला वाटायचं, *आपण त्यांना पूर्वीइतके आवडत नाही. कदाचित माझ्याच हातून त्यांना निराश करण्याजोगं काहीतरी घडलं आहे.* ते मला 'मोठं' होण्यात साहाय्य करत होते आणि त्यांच्या मार्गदर्शनाखेरीज ते शक्य नव्हतं.

शेतापलीकडच्या तळ्याभोवती वेळूचं वन होतं. मला त्या तळ्यात मासेमारी करायला फार आवडायचं. माझ्या गळाला कधी मोठा मासा लागला नव्हता. मी फक्त छोटे मासे पकडले होते; पण तिथं मोठे मासे होते. सकाळच्या प्रहरी धुक्याच्या पडद्याआड त्यांची चमकदार हालचाल मी पाहिली होती. कधी-कधी त्यांनी उठवलेल्या लाटा किनाऱ्यापर्यंत पोहोचायच्या.

त्या उन्हाळ्यात मी माझ्या तराफ्यात बसून माझ्या वडिलांना आमच्याकडं कसं खेचून घेता येईल, याचे मार्ग शोधत होतो. माझ्या आईची सुट्टी घ्यायची इच्छा होती; पण वडिलांनी त्यांना खूपच काम असल्यामुळं या बेताला नकार दिला होता.

एके दिवशी मी आणि आई स्वयंपाकघरात त्यांच्याबद्दल बोलत होतो.

''हे बघ, तू त्यांना मासेमारीसाठी जायला तयार करू शकतोयस का बघ,'' ती म्हणाली,

''फक्त एक संध्याकाळ मिळाली तरी पुरे आहे.''

मी दुसऱ्या दिवशीपासून डॅडना तळ्यावर न्यायची मोहीम उघडली. मी शेकोटी करायचा बेत आखला होता... मक्याची कणसं आणि जे काही मिळेल ते भाजायचा माझा बेत होता. प्रश्न होता तो डॅडना जुने कपडे घालायला लावून काही तासांसाठी बाहेर नेण्याचा.

अखेर, एका शुक्रवारी मी त्यांना अक्षरश: भाग पाडलं. त्यांची गाडी आलेली दिसताच मी त्यांना वाटेतच अडवलं आणि मडरूममध्ये ओढून नेलं. तिथं आम्ही कपडे बदलले.

''आपण मासेमारीला चाललोय,'' मी म्हणालो, ''आणि चाललोय म्हणजे चाललोय.''

आणि आम्ही निघालो!

मावळतीच्या किरणांच्या साक्षीनं आम्ही तळ्याच्या काठी उभे असताना, आपण डॅडना इथं यायला तयार केलं, या गोष्टीचं आश्चर्य अजूनही ओसरलं नव्हतं. मग मी शेकोटीसाठी लाकूड गोळा केलं. अजून काही आमचं नशीब खुललं नव्हतं; पण तरीही मक्याची कणसं भाजणं आणि गप्पा मारणं हे मात्र शक्य होतं.

मी काम करत असताना डॅड पडलेल्या रेड ओकजवळ एका खोल खड्ड्यावर नजर खिळवून होते.

''त्यांना मासे पकडू दे.'' मी स्वत:शीच म्हणालो,

''*कोणताही* मासा असो... फक्त त्यांना काहीतरी पकडू दे.''

जसं काय माझ्या मनातल्या विचारानं मासा गळाशी आणला!

''ओहो, बॉस!'' त्यांनी आरोळी ठोकली... आणि शेवाळी रंगाचा एक मासा हवेत उडाला. तो चांगला मोठा दिसत होता, त्यानं सुटण्यासाठी बरीच धडपड केली; पण डॅडनी कौशल्यानं त्याला जाळ्यात पकडून शेकोटीजवळ आणलं.

''हे डॅड,'' मी म्हणालो, ''हाउ अबाउट दॅट!''

डॅड तरुण आणि आनंदी दिसत होते. त्यांचा चेहरा अभिमानानं फुलला होता. मी तो मासा मक्याच्या रव्यात घोळवून शेकोटीवर भाजला. आम्ही एका दगडावर बसून रात्रीच्या भोजनाचा आस्वाद घेऊ लागलो.

''मस्त जेवण झालं,'' ते खाणं संपवून म्हणाले, ''याआधी इतका मस्त बेत कधी झाला नसेल.''

मग डॅड कॉफी बनवू लागले. तोवर मी शेताच्या टोकाला गेलो. तिथं पिकलेल्या ब्लॅकबेरींच्या भारानं झुडपं वाकली होती. मी 'डेझर्ट' म्हणून ब्लॅकबेरी तोडल्या आणि माझ्या बेसबॉलच्या टोपीत भरून घेऊन आलो. कॉफीसमवेत बेरींचा आस्वाद घेत आम्ही पश्चिमेकडं आभाळात सूर्याची डोळे दिपवणारी रंगाची उधळण पाहात होतो. डॅड एकेक बेरी चवीचवीनं खात होते. मग अचानक ते माझ्याशी बोलू लागले... माझ्याबद्दल त्यांना किती आस्था आहे ते सांगू लागले.

''यू नो, सन, तू आयुष्यात यशस्वी होणार आहेस,'' ते म्हणाले.

''मी असं म्हणतोय कारण मला तुला कोणतीही गोष्ट कर म्हणून पुन्हा दुसऱ्यांदा सांगावं लागलेलं नाही. आणि त्यापेक्षाही महत्त्वाचं म्हणजे, तू चांगला मुलगा आहेस.''

त्यांच्या चेहऱ्यावर इतके प्रेमळ आणि अभिमानाचे भाव होते की, मला आपण अतिशय भाग्यवान आहोत असं वाटलं.

माझ्या वडिलांची प्रॅक्टिस अधिकाधिक वाढत गेल्यामुळं असे क्षण अगदी क्वचितच आले, पण मला जेव्हा कधी गरज असेल, तेव्हा मी तळ्याकाठच्या त्या क्षणांशी मागं जायचो आणि डॅड माझ्यासोबत होते तेव्हा मला किती छान वाटलं होतं, ते आठवायचो.

''होय, सर,'' डॅन माझी आठवणींची शृंखला तोडत म्हणाले,

''तुमचे वडील फार चांगला माणूस होते. आणि त्यांचं औषध म्हणजे केवळ गोळ्या आणि पातळ औषध नव्हतं. ते लोकांचा खूप विचार करायचे. एखादा माणूस कशातून चाललाय, ते त्यांना नेहमी समजायचं.''

''हो. कधी-कधी समजायचं,'' मी क्षणभर नजर बाजूला वळवत म्हणालो.

मग डॅन म्हणाले, ''जेव्हा माझी अवस्था अतिशय वाईट होती, तेव्हा मी त्यांना म्हणालो होतो, 'डॉक, या नैराश्याच्या गर्तेतून बाहेर कशासाठी यायचं?... मला एक कारण सांगा.' त्यावर ते काय म्हणाले माहीत आहे?''

मी पुन्हा त्यांच्या डोळ्याला डोळा भिडवेपर्यंत ते बोलायचे थांबले होते. मी त्यांच्याकडं पाहताच ते म्हणाले, ''ब्लॅकबेरीज. मूठभर ब्लॅकबेरीज डोळ्यांसमोर आणा आणि आठवा... किती मस्त असतात त्या! मूठभर ब्लॅकबेरीज घ्या, तुमच्या अतिशय प्रेमाच्या माणसासोबत बसा आणि त्यांचा आस्वाद घ्या. विचार करून बघा आणि मग मला सांगा, आयुष्य तितक्या मोलाचं नाहीय का? तुम्हाला इतकी चांगली बायको आणि तीन छानशी मुलं आहेत. काही वेळ त्यांच्यासाठी द्या. आपण कुटुंबासाठी जगतो... फक्त स्वत:साठी नाही.''

''हे त्यांचे शब्द माझ्या कायमचे स्मरणात राहिले आहेत,'' डॅन म्हणाले,

''मला वाटतं या शब्दांनीच माझे प्राण वाचवले.''


माझे हात थरथरत होते. मी फक्त त्यांच्याकडं पाहिलं. माझ्या मनात भावनांचा इतका कल्लोळ माजला होता की माझ्या तोंडून एकही शब्द फुटेना.

घरी परत येताना मी विमानात डोळे मिटले होते. मनात माझे आणि माझ्या डॅडचेच विचार होते. त्या दिवशी तळ्याकाठच्या त्या दिवसाचं माझ्यालेखी काय मोल होतं, ते मला माहीत होतं; पण त्याचं त्यांच्यालेखी काय मोल होतं ते मला कधीच कळलं नव्हतं. आत्ता माझ्या मन:चक्षूंसमोर डॅड होते... गळ टाकून पाण्याच्या काठाशी उभे असलेले... आनंदानं निथळत असलेले डॅड. *लाटा किती रुंद पसरल्या होत्या... आणि किती दूरवर पोहोचल्या होत्या.*

अकस्मात माझी नजर विमानाच्या खिडकीतून बाहेर गेली. मला विमान वेळेत पोहोचावं, असं वाटत होतं. मी अंधार पडण्याआधी घरी पोहोचायचं ठरवलं होतं... मावळतीच्या प्रकाशात मला माझ्या मुलासोबत अंगणात खेळायचं होतं.

*– डब्ल्यू. डब्ल्यू. मीड*

*('चिकन सूप फॉर द कंट्री सोल'मधून)*



# स्मरण

## विंदा करंदीकर

सामाजिक आशयाच्या कवितांचा विचार मनात डोकावतो तेव्हा प्रथम आठवण होते ती १८८८मध्ये केशवसुतांनी लिहिलेल्या 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' ह्या मन कासावीस करणाऱ्या कवितेची. केशवसुतांच्या कवितांतून प्रगट झालेल्या सामाजिक आशयाच्या कवितेतल्या प्रत्येक शब्दात अर्थस्फोटाची विलक्षण ताकद आहे. आर्थिक व सामाजिक विषमता केशवसुतांच्या काळात, म्हणजे सव्वाशे वर्षांपूर्वी खूप खोलवर रुजली होती. तोच जळजळीत अनुभव, त्यानंतर पन्नास वर्षांनी, म्हणजे १९४०मध्ये, पुढे अत्यंत प्रतिभावंत म्हणून गौरवल्या गेलेल्या कविवर्य विंदा करंदीकरांनी आपल्या 'मुंबई' ह्या अप्रतिम कवितेमधून व्यक्त केला.

या उंच हवेल्या, कां रस्त्यावर पडतां?
ही धान्यागारे, कां तळतळुनी मरतां?
ही शीघ्र वाहनें, रखडता कां मग पायी?
या प्रचंड गिरण्या, वस्त्र तुम्हां कां नाही?
छे, नगर नव्हे हे, हिंदभूमीच्या शरिरी,
वाटते जाहली जखम, भयंकर जहरी,
शेटजी कोठले? त्यात किडे लवलवती,
हे शरीर शोषुनि रक्तावरती जगती...
जर सूख हिच्यातिल सर्वांसाठी असते,
ही जखम न असती, भूषण मजला गमते...

दशपदीचा बाज असलेली 'मुंबई' ही कविता, विंदा करंदीकरांच्या साम्यवादी

विचारसरणीतून अवतरली होती; परंतु कुठल्याही पक्षीय झेंड्याखाली कविता उभी राहिली नव्हती. मानवी मनाची उत्कट स्पंदने विंदांनी आपल्या काही सामाजिक आशयाच्या कवितांमधून सहजपणे प्रगट केली. कम्युनिस्ट पक्षाचा लाल बावटा विंदांच्या प्रतिभासंपन्न माथ्यावर फडफडत असता, तर कविता लालभडक झाली असती आणि काळाच्या ओघात अस्तंगत झाली असती.

अशाच आशयाची एक तप्त कविता १७ सप्टेंबर १९४० रोजी विंदांनी लिहिली होती, तिचे नाव होते 'लाव्हा'

ओततो हृदयिं जें लपुनि बसे;
जन वदतिल याला खचित पिसें
जड जगताच्या जुलमाखालीं
मानवता जरि दडपुनि गेली,
ज्वालामुखि ही जागृत झाली,
हा लाव्हा त्यांतुनि उसळतसे,
जन वदतिल याला खचित पिसें...

ह्या छोट्या 'लाव्हा' मधून विंदांच्या मनातला सामाजिक जाणिवांचा तप्त रस बाहेर पडला होता.

ज्वालामुखी एकदा का जागृत झाला की, जो लाव्हारस जमीन दुभंगून बाहेर पडतो, तो अशा काही प्रचंड शक्तिनिशी बाहेर पडतो की, त्याला थोपवता येत नाही. विंदा करंदीकरांच्या समग्र अक्षर वाड्मयाला 'लाव्हा' ह्या त्यांच्याच कवितेतला एकूण भाव पूर्णपणे लागू आहे. ऐन तारुण्यात, म्हणजे अगदी सळसळत्या विशीत असताना शुद्ध कवितेचा प्रवाह गंगौघासारखा उफाळून आला, तो सतत चाळीस वर्षं फेसाळतच होता. १९८१ मध्ये विंदांनी स्वतःच निर्णय घेतला की, हा कवितेतून प्रकट झालेला तप्त लाव्हारस थोपवायचा आणि त्यांनी तो स्वतःच स्वताकदीने थोपविला. मग हा अक्षर वाङ्मयाचा ज्वालामुखी आतल्या आत खदखदत नसेल का? मला तरी निश्चितच वाटतं की, हा सळसळता प्रवाह थोपविण्याची आध्यात्मिक ताकद विंदांसारख्या एखाद्याच प्रतिभावंत कविपाशी असेल. ज्ञानदेवांच्या 'अमृतानुभवा'चे 'अर्वाचिकरण' करणाऱ्या विंदांनी जाणूनबुजून आपल्या अत्यंत सामर्थ्यशाली कवितेला समाधिस्थ केले. 'निळा पक्षी' ह्या कवितेत विंदा म्हणतात,

काही केल्या काही केल्या
निळा पक्षी जात नाही...

अवघं कवितेचं आकाश निळं करणारा हा ‘निळा पक्षी’ १९८१ साली प्रतिभेच्या अवकाशाच्या दिशेने झेपावला. तो ‘निळा पक्षी’ स्वत:च्या अवकाशातच तरंगत राहिला.

विंदा करंदीकरांचे मूळ नाव होते, गोविंद विनायक करंदीकर. त्यांचा जन्म दक्षिण रत्नागिरीतल्या घालवली ह्या छोट्या खेड्यात २३ ऑगस्ट १९१८ रोजी झाला. अगदी तरुण वयात ‘विंदां’वर माधव ज्युलियन, मर्ढेकर यांच्या कवितांचा संस्कार झाला. माधव ज्युलियन आणि श्रेष्ठ कादंबरीकार ना.सी.फडके ह्यांचा प्रत्यक्ष सहवास विंदांना कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजात लाभला. लहानपणापासून निसर्ग त्यांना खुणावत होता. कोकणातल्या घनदाट वृक्षांना ते तासन् तास न्याहाळत बसत. त्यातून प्रगट होणाऱ्या आनंदाचा मनमुराद आस्वाद घेत. करंदीकरांची ‘आनंद’ प्रगट करणारी एक कविता आहे.

असहाय्य दु:खितांना, आनंद देत जावे,
आनंद देत असता, आनंद घेत जावे...
आनंद मिळविण्याची, शक्ती मुलात मोठी,
तो बालयोगी स्मरुनी, आनंद घेत जावे...
संघर्ष खेळ माना, घ्या प्रेम सत्य साथी,
त्यातून ही व्रतीचा, आनंद घेत जावे...
आयुष्य वेधी सगळ्या, ग्रंथांतुनी महान,
सर्वात्म जाहल्याचा, आनंद घेत जावे...
सहजीवनांत द्यावा, सन्मान ऐकमेकां,
प्रेमात मिलनाचा, आनंद घेत जावे...
आकाश माड दर्या, एकत्र पाहताना,
तीर्थास भेटल्याचा, आनंद घेत जावे...
मृत्यु असे म्हणून, जगण्यास अर्थ आहे,
अर्थास मूल्य देण्या, आनंद घेत आहे...

करंदीकर जीवनातल्या प्रत्येक क्षणावर प्रेम करीत, समरसतेतून आपले आयुष्य, कविताविश्वात पूर्णपणे रममाण होत जगले. विंदांच्या जगण्याला एक विलक्षण अशी माणुसकीची ओढ होती. १९३९-४०च्या सुमारास, म्हणजे ऐन विशीत विंदांच्या कवितांचा वसंतऋतू जो उमलून आला तो पुढे अनेक वर्षं उमलतच होता. शब्दांमधून प्रगट होणाऱ्या अर्थाबरोबर प्रत्येक शब्द नादवलयांसहित कवितांना फुलवत होता. आत्मतत्त्वाच्या स्वरूपाचा शोध करंदीकरांनी आपल्या

कवितांमधून घेण्याचा सुंदर प्रयत्न केला.

त्यांच्या कवितेतला ‘मी’ हा कोणत्याही स्वतंत्र आणि इतरत्र भटकणाऱ्या आत्म्याचा उच्चार असतो, हे जाणून घेणेसुद्धा तितकेच महत्त्वाचे आहे. विंदांची कविता तिच्या जन्मक्षणापासून म्हणूनच कुणाच्याही छायेत क्षणभरसुद्धा उभी राहिली नाही. त्यांचे भावविश्व त्यांनीच निर्माण केलेले होते. भावगर्भ, अर्थपूर्ण ओळी हा विंदांच्या कित्येक कवितांचा प्राण आहे. विंदांची अत्यंत गाजलेली एक कविता आहे, ‘घेता...’

देणाऱ्याने देत जावें
घेणाऱ्याने घेत जावें...
हिरव्यापिवळ्या माळावरून
हिरवीपिवळी शाल घ्यावी;
सह्याद्रीच्या कड्याकडून
छातीसाठी ढाल घ्यावी...
वेड्यापिशा ढगाकडून
वेडेपिसे आकार घ्यावें;
रक्तांमधल्या प्रश्नांसाठी
पृथ्वीकडून होकार घ्यावें...
उसळलेल्या दर्याकडून
पिसाळलेली आयाळ घ्यावी;
भरलेल्याशा भीमेकडून
तुकोबाची माळ घ्यावी...
देणाऱ्याने देत जावें;
घेणाऱ्याने घेत जावें,
घेतां घेतां एक दिवस
देणाऱ्याचे हात घ्यावें...

साठ वर्षांपूर्वी, म्हणजे ११ जुलै १९५६ या दिवशी,करंदीकरांचे अवघे अनुभवसिद्ध भावविश्व पूर्णांशाने प्रकट व्हावे, तशी ही कविता त्यांच्या हातून लिहिली गेली आणि ह्या एकाच कवितेने तर विंदांचे अवघे प्राणविश्व सर्वच काव्यरसिकांचे प्राणप्रिय विश्व झाले. हा मानवी सक्षम जन्म आपल्याला प्राप्त झालेला आहे, म्हणून या भाग्यशाली जीवन प्राप्त झालेल्या संवेदनशील माणसाने ह्या जीवनाकडून काय काय घ्यावे ह्याचे भान दिले आहे. इथे देणारा

म्हणजे परमेश्वर आहे. ईश्वराने आपल्याला अमाप दिलेले आहे. त्याप्रमाणे आपणसुद्धा ईश्वराप्रमाणे आपल्याला जेवढे म्हणून देता येईल ते सर्वांना द्यावे आणि हे घ्यायचे कसे ह्याचे भान देताना विंदा शेवटी जे म्हणतात, की देणाऱ्याचे 'ते' देणारे हात आपण घेतल्याशिवाय आपले हात देणारे होणार नाहीत.

विंदा करंदीकरांचा 'स्वेदगंगा' हा पहिला संग्रह १९४९मध्ये प्रसिद्ध झाला. त्यानंतर 'मृदगंध', 'धृपद', 'जातक', 'विरूपिका' आणि शेवटचा २००३मध्ये प्रसिद्ध झालेला 'अष्टदर्शन. ह्या 'अष्टदर्शने' कवितसंग्रहाने 'ज्ञानपीठ पुरस्कार' विंदांना मिळवून दिला. विंदांच्या बालकविता हा तर त्यांच्या स्वतंत्र प्रतिभेचा परमोच्च आविष्कार होता. त्यांनी आपल्या बालकवितेने मुलांसाठी एक अद्भुत असे विश्व निर्माण केले. वॉल्ट डिस्ने यांनी जसे खास मुलांसाठी अद्‌भुत असे विश्व निर्माण केले होते अगदी तसेच अद्‌भुतविश्व विंदांनी निर्माण केले होते. एका प्रयोगाचा तो सर्वोत्तम आविष्कार होता. विंदांनी जशा कविता लिहिल्या तसेच समीक्षा वाङ्‌मय निर्माण केले. अनुवाद केले. ज्ञानदेवांच्या 'अमृतानुभवा'चे अर्वाचीनीकरण तर अप्रतिम केलेच परंतु त्या संग्रहाला त्यांनी अप्रतिम अशी प्रदीर्घ 'अहो ज्ञानेश्वर' म्हणत प्रस्तावना जी लिहिली तीसुद्धा त्यांच्या प्रगाढ चिंतनाचा उत्कृष्ट आविष्कार आहे.

वि.स.खांडेकर, कुसुमाग्रज यांच्यानंतर विंदा करंदीकर यांनी ज्ञानपीठ पुरस्कार मिळविला. 'देणाऱ्याने देत जावे' असे प्रतिपादित करीत असतानाच 'घेणाऱ्याने देणाऱ्याचे हात घ्यावेत' हा अमर संदेश देणारे विंदा हे एक अद्भुत असे रसायन होते.


१४ मार्च २०१० ह्या दिवशी विंदांनी वयाच्या ९२व्या वर्षी या जगाचा निरोप घेतला. परमेश्वरी कृपेने त्यांना प्रदीर्घ आयुष्य लाभले आणि विंदांनी आयुष्यभर शाश्वत कवितेलाच जोजवले हे सत्यही तितकेच आनंददायी होते. विंदांच्या समग्र कवितेला अमरत्वाचे वरदान प्राप्त झाले हे मात्र निश्चित...

**– वामन देशपांडे**
**डोंबिवली (पूर्व)**
**९३२४६१५०७७**

**नवं कोरं**

**भाग १ व २**

# चिकन सूप
## फॉर द सोल
## थिंक पॉझिटिव्ह




मूळ लेखक- **जॅक कॅनफिल्ड,**
**मार्क व्हिक्टर हॅन्सन,**
**ॲमी न्यूमार्क**

प्रस्तावना- **डेबोरा नॉरविल**

अनुवाद- **मंजूषा मुळे**

**प्रत्येकी किंमत : २४०/-रु. । प्रत्येकी पोस्टेज :५०/-रु.**

सकारात्मक विचारांचा अवलंब करून आपलं आयुष्य कसं सुधारावं आणि आव्हानांवर मात कशी करावी, हे अनेकांनी आपल्या वागण्यावरून प्रत्यक्ष दाखवून दिलं आहे. अशांपैकीच काही जिगरबाज माणसांनी त्यांच्या स्वतःच्याच शब्दांत लिहिलेले हे त्यांचे अनुभव वाचणाऱ्याला अचंबित करणारे तर आहेतच; शिवाय आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडणारे आहेत. सकारात्मक विचार तुमचं आयुष्य कसं बदलू शकतात, सुसह्य करू शकतात, हे दाखवून देणाऱ्या या खऱ्या घडलेल्या गोष्टी आहेत. अचानक समोर उभ्या ठाकलेल्या आणि आयुष्यच उद्ध्वस्त करायला आलेल्या वेगवेगळ्या प्रसंगांवर, संकटांवर केवळ सकारात्मक विचारांच्या मदतीनं कशी मात करता येते, याची ही चालती-बोलती उदाहरणं सर्वांनीच कायम स्मरणात ठेवायला हवीत आणि स्वतःलाही नेटानं, निश्चयानं सकारात्मक मनोवृत्तीकडे, विचारांकडे वळवण्याचा आणि त्यायोगे आपलं आयुष्य आनंदमय, शांततामय करण्याचा सतत प्रयत्न करायला हवा, असा मौल्यवान विचार हे पुस्तक वाचणाऱ्या प्रत्येकाच्या मनात नक्कीच रुजेल, यात शंका नाही.

# श्रद्धांजली

**✍ इरगोंडा पाटील यांचे निधन**

शिक्षण, सामाजिक कार्य आणि साहित्य या तिन्ही क्षेत्रांत योगदान देऊन वेगळी ओळख निर्माण करणारं नावं म्हणजे इरगोंडा पाटील. ६ ऑगस्ट रोजी या समर्पित व्यक्तिमत्त्वाची प्राणज्योत मालवली. मेहता पब्लिशिंग हाऊससोबत त्यांचा सुमारे तीन दशकांचा ऋणानुबंध. आम्ही प्रकाशित केलेल्या तब्बल २५ पुस्तकांच्या रुपात त्यांनी 'प्रौढ साक्षरता' विषयात अनमोल योगदान दिले. 'सांगावा', 'निरंतर शिक्षण' सारख्या नियतकालिकांच्या माध्यमातून साक्षरता आणि प्रौढ शिक्षणासाठी त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. त्यातूनच त्यांची ओळख घडली. या कार्याबद्दल त्यांना राष्ट्रपती पुरस्कारही लाभला.

पुणे विद्यापीठाने सुरू केलेल्या निरंतर शिक्षणाच्या कार्यक्रमात पाटील यांनी स्वत:ला झोकून दिले. ग्रामीण भागात बालपण गेल्याने त्यांना ग्राम जीवनाची - भाषेची कल्पना होती. त्या जाणीवेतून ते प्रौढांना साक्षर करू लागले. त्यातून लेखनास सुरुवात झाली. त्यांनी कविता, कथा कादंबरी या साहित्यप्रकाराचीही वाट चोखाळली. बोली भाषेबाबत ते कमालीचे संवेदनशील होते. भाषा ही बोलण्यासाठी असल्याने ती मूलत: बोलीच असते, तिला प्रमाण भाषेचे स्वरूप नंतर प्राप्त होते, याकडे ते नेहमी लक्ष वेधत. त्यांच्यासारखा संवेदनशील अभ्यासकाच्या जाण्याने साहित्य क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

**✍ दादा गोगावले यांचे निधन**

पुस्तकांचा ज्ञानसाठा जितका महत्त्वाचा तितकचं पुस्तकांना बांधून ठेवणारं बाइंडिंग महत्त्वाचं. मराठी साहित्य विश्वात बाइंडिंगच्या रूपानं पुस्तक संरक्षणाचे

काम माधवराव लक्ष्मण गोगावले यांनी केले. चार दशके प्रामाणिकपणानं आणि सचोटीनं बाइंडिग क्षेत्रात योगदान देणाऱ्या दादा गोगावले यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या जी. माधव बाइंडर्सशी मेहता पब्लिशिंग हाऊसचा जुना ऋणानुबंध.

त्यांचा बाइंडिंग व्यवसाय टिळकवाड्यात असून केसरी मधील सर्व सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग होता. वीराची तालीम या मंडळाची त्यांनी अनेक वर्षं धुरा सांभाळली.

### ✍ डॉ. राजूरकर यांचे औरंगाबादेत निधन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. भगतसिंह हनुमंतराव राजूरकर (वय ८२) त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे ते पहिले विभागप्रमुख होते. हरिद्वारमधील कांगडी गुरुकुल येथे त्यांनी संस्कृतमधून शिक्षण घेतले. त्यानंतर दिल्ली विद्यापीठातून एम.ए. (संस्कृत), उस्मानिया विद्यापीठातून एम.ए. (हिंदी) पदवी प्राप्त केली.

### ✍ ज्येष्ठ समीक्षक दिगंबर पाध्ये यांचे निधन

ज्येष्ठ समीक्षक प्रा. दिगंबर पाध्ये यांचे मुंबईमध्ये गंभीर आजाराने निधन झाले. ते ७७ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, नातू असा परिवार आहे. तीन आठवड्यांपूर्वी त्यांना फुफ्फुसाचा आजार झाल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर त्यांच्यावर मालाड येथील संजीवनी रुग्णालयात उपचार सुरू होते.

पाध्ये यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील पाथर्डी येथे झाला. १९६६ पासून 'आलोचना' नियतकालिकामध्ये त्यांनी सहसंपादक म्हणून काम करायला सुरुवात केली. या नियतकालिकामधून त्यांनी पुस्तक परीक्षणे लिहिली. महाराष्ट्र साहित्य पत्रिका, समाज प्रबोधन पत्रिका, प्रतिष्ठान, कवितारती, अनुष्टुभ या नियतकालिकांमधून समीक्षात्मक लेख लिहिले. त्यांची 'नारायण सुर्वे यांची कविता' आणि 'साहित्य, संस्कृती आणि समाज' ही पुस्तके प्रकाशित झाली. 'साहित्य, संस्कृती...' मध्ये साहित्य आणि संस्कृती या संकल्पनांविषयी त्यांनी तात्त्विक विवेचन केले. ग्रंथांच्या परीक्षणातून त्यांनी साहित्य, संस्कृतीशी निगडित प्रश्नांचा ऊहापोह केला.

❖



## अभिप्राय

# एका कल्पक उद्योजकाच्या जिद्दी वाटचालीची काहणी

'मॅस्वी आणि कंपनी प्रा. लि.' या १९४३ साली स्थापन झालेल्या कंपनीचे मालक शारंगधर पुरुषोत्तम कान्हेरे यांचे हे छोटेखानी चरित्र. हे चरित्र आनंद कान्हेरे या त्यांच्या मुलानेच लिहिलं आहे.

उत्तम आर्थिक परिस्थिती असल्याने शारंगधर कान्हेरे यांनी त्या काळात परदेशात, मँचेस्टरला इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंगमध्ये बी.एस्सी. टेक केलं आणि त्यानंतर बर्मिंगहॅम इथल्या ऑटोमॅटिक इलेक्ट्रिक कंपनीत रिसर्च आणि डेव्हलपमेंट विभागात नोकरी केली. या काळात युरोपातही दुसऱ्या महायुद्धाचे वारे वाहत होते. कंपनीतलं उत्कृष्ट काम करून कान्हेरे राष्ट्रभक्ती आणि घरातील जबाबदारीची जाण ठेवत भारतात परतले आणि व्यवसाय सुरू केला. या व्यवसायाची सुरुवात पाच जणांनी केली आणि त्यांच्याच नावाच्या आद्याक्षरांनी मॅस्वी हे नाव दिले. सुरुवातीच्या काळात मॅस्वीने मुख्यत्वे पंपसेट, मोठ्या इलेक्ट्रिकल मोटारी व स्वीचगिअरची विक्री केली. हा व्यवसाय मुख्यत्वे एजन्सीजच होता. त्याची वाढ होत असली तरी कान्हेरेंच्या शिक्षणाचा, अनुभवाचा कस लावणारा नव्हता. त्यामुळे कान्हेरेंनी 'भारत मॅन्युफॅक्चरिंग' नावाने स्वतंत्र व्यवसायही सुरू केला. या उद्योगाने सुरुवातीला शेगड्या, इस्त्री अशा विद्युत्चलित गोष्टी बनवायला सुरुवात केली. आईसफ्रूट

बनवणे, प्लेटिंग करणे अशी कामे सुरू केली. मात्र दोन्ही कामांचा ताण आल्याने त्यांनी 'भारत इलेक्ट्रिकल'ची जबाबदारी दुसरीकडे सोपवली. पुढे मॅस्वीचा विस्तार करत त्यांनी त्याची शाखा कोल्हापूरलाही सुरू केली. कंपनीकडे पुढे एअर इंडियाने काही वसतू बनवण्यासाठी विचारणा केली आणि १९५३ मध्ये मॅस्वीत वस्तुंचीही निर्मिती सुरू झाली. सुरुवातीला सामान ठेवण्यासाठी रॅक्स आणि लोखंडी स्कॅफोल्डिंग बनवले आणि पुढे विमानाच्या दाराशी जाईल अशी शिडी बनवण्यात येऊ लागली. असंख्य कसोट्यांना पार करत ही शिडी एअर इंडियाला योग्य वाटली आणि हीच या कंपनीसाठी यशाची शिडी ठरली. पुस्तकाचे चरित्र लेखकही अभियंते असल्याने या शिडीचे तांत्रिक बारकावेही तयांनी कुशलतेने लिहिले आहेत.

मॅस्वी उद्योगाने यानंतर पुण्यात स्वतंत्र कारखाना उभा केला. या कारखान्यात केवह विमानांसाठी शिड्याच नव्हे तर अनेक उत्पादने घेतली जाऊ लागली. जुन्या उत्पादनातही त्यांनी कल्पक सुधारणा केल्या. लेखकांनी हा भाग तांत्रिक तपशील अन् आकृत्या देत अतिशय स्पष्ट लिहिला आहे. पुढे एअर इंडियासाठी टायर ट्रान्सपोर्ट डॉली, पॅरॅफिन एअरक्लिनिंग इक्विपमेंट बॅगेज ट्रॉली अशी अनेक उत्पादनं बनवली आणि विमानतळावर लागणाऱ्या वस्तुंचे कान्हेरे प्रमुख उत्पादक बनले, एवढेच नव्हे तर देशात आयात होणाऱ्या या वस्तूंचे उत्पादन भारतातच झाल्याने देशाचे लक्षावधी डॉलरचे परकीय चलन वाचवले. एअर इंडियाच्या 'इंजिन इन्स्ट्रॉलेशन अॅन्ड रिमूव्हल स्टॅन्ड' या उत्पादनासाठी कान्हेरेंना १९७३ साली राष्ट्रपती पदकही मिळाले.


पुढे १९७१ नंतरच्या आर्थिक मंदीच्या काळात मात्र मॅस्वीला अनेक संकटांना सामोरे जावे लागले. अगदी दिवाळखोरीलाही सामोरे जावे लागले. या सगळ्या काळात वृद्धत्वाकडे झुकलेल्या कान्हेरेंनी अतिशय ठामपणे निश्चयाने आपला लढा सुरू ठेवला आणि देणेकऱ्यांचे पैसे देण्यात यशही मिळवलं.

मॅस्वीची ही वाटचाल लेखकाने अतिशय बारकाईने लिहिली

आहे. विशेषत: त्यातला तांत्रिक भाग सखोलतेनं लिहिला आहे. अतिशय सुसंस्कृत प्रयोगशील माणसानं कष्टानं उभा केलेला हा उद्योग यशाची उंचीही गाठतो आणि अपयशाने पूर्णत: खचतो. त्यामुळे ही कहाणी वाचकाला अंतर्मुख करते, अनुभवाचे धडेही देते. लेखकाने आपल्या पित्याचे कष्ट, त्यांची जिद्द, त्यांची प्रयोगशील वृत्ती अन् हुशारी अत्यंत जवळून अनुभवली असल्याने आशयाची अस्सलता लेखनात उतरली आहेच. व्यवसायाबद्दल, वडिलांबद्दल तटस्थतेने लिहिण्याचा प्रयत्न केला असला, तरी आपल्या माणसांविषयी आस्था, आदर अन् त्यांच्या यशापशातलं गुंतणंही पुस्तकात वाचायला मिळतं. एकूणच एका कर्तबगार, संवेदनशील वत्सल माणसानं आपला व्यवसाय, कुटुंबाचा मांडलेला हा लेखाजोखा वाचकांनाही आपलंसं करून घेतो.

व्यवसायाचं चरित्र लिहित असताना उत्पादनातल्या तांत्रिक गोष्टी अन् त्यामागचे विचार, अनुभव, उत्पादन अधिकाधिक उत्कृष्ट बनवण्यासाठी घेतलेला ध्यास परिपूर्णतेनं आला आहे.

**मॅस्वी कान्हेरे**
लेखक : आनंद कान्हेरे
प्रकाशन : मेहता पब्लिशिंग हाऊस
मूल्य : १८०/-
पृष्ठे : १७६
**साहित्य सूची, २०१६**




नवं कोरं

# पीस, लव्ह अँड हीलिंग

मूळ लेखक - **बर्नी एस. सिगल**

अनुवाद - **पूर्णिमा कुंडेटकर**

**किंमत : ३२०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**




साधारण दहा वर्षांपूर्वी मूळ प्रकाशित झालेले ‘पीस, लव्ह अँड हीलिंग’ हे पुस्तक आपल्यामध्ये स्वत:ला बरे करण्याची शक्ती अंगभूतच आहे, हा क्रांतिकारी संदेश देते. अनेक शास्त्रीय अभ्यासांतून हे आता सिद्धही झालेले आहे. मन, बुद्धी आणि शरीर यांतील परस्पर संबंध आता संपूर्ण वैद्यकीय क्षेत्राकडूनही स्वीकारले जात आहेत. याच तत्त्वाचा पुन्हा परिचय करून देताना डॉ. बर्नी एस. सिगल चेतना, मनोसामाजिक घटक, वृत्ती आणि प्रतिकार यंत्रणा यांमधील संबंधावरील सध्याच्या संशोधनावर प्रकाश टाकतात.

सिगल म्हणतात, ‘प्रेम आणि मन:शांती आपले नक्कीच संरक्षण करीत असते. जीवनाच्या खडतर प्रवासामध्ये समस्यांचा सामना करायला यामुळेच ताकद येते. यामुळे आपल्याला टिकून राहण्यास शिकवले जाते, वर्तमानामध्ये जगायला प्रोत्साहन मिळते आणि आलेल्या प्रत्येक दिवसाचा सामना करायला नव्याने जोम येतो.’



# जिज्ञासू तथ्य



## जागतिक गिनीज रेकॉर्डमधल्या काही थक्क करणाऱ्या गोष्टी

**पोपटाचे शूट्स - हूप्स**



मॅकाव जातीचा पोपट तुमच्याशी स्पर्धा करू शकतो. हा पक्षी बॉल उचलून एक मिनिटांत २२ वेळा बास्केटमध्ये टाकू शकतो. हा पक्षी छोटी छोटी भोकं असलेला चेंडू (Whiffle Ball) उत्साहित असेपर्यंत टाकत राहतो. त्याचा मालक त्याला प्रशिक्षण देतो व तो ज्या ज्या वेळी छोट्याशा बास्केटमध्ये चेंडू टाकतो त्या त्या वेळी त्याला पक्ष्यांचे खास बक्षीस मिळते.

**मानवी डॉमिनोज (Dominoes)**

११५० लोकांनी रात्रभर जागून डुलकी न घेता मऊ-कडक अशा गादीवर रात्र काढली. जर्मनीमधल्या एका फर्निचरच्या दुकानात या सभासदांनी या जाड गाद्या विकत घेऊन ही मानवी डॉमिनोजची साखळी चालवली. बहुतेक या सर्व प्रकारानंतर ते छोटीशी वामकुक्षी घेतील.

**अवाढव्य गाडी**

या भव्य अशा गाडीचे चाक बदलताना नक्कीच खूप ताकद लागते. वाऊटर वान देन बॉश याने सर्वांत जड, चालवण्याजोगी गाडी बनवली आहे.



ह्या गाडीचे वजन १६५० पाऊंड एवढे आहे. त्याने केलेल्या या निर्मितीला खूप कष्ट लागले आणि चालवायलाही. म्हणून वाऊटर वान देन बॉश याने त्याच्या गाडीचे एक चाक मोठे आणि एक चाक असे बसवले ज्याने त्याला वर चढून बसायला मदत होते. आता तुम्हीच विचार करा, ह्या गाडीला घेऊन तो व्हीली करू शकेल का?

**विचित्र पण खरं!**

पाम नावाच्या झाडाची पाने २ लिमो नावाच्या गाडीएवढी झपाट्याने वाढू शकतात.

सूर्याच्या गाभ्यापासून ते सूर्याच्या पृष्ठभागापर्यंत प्रकाशाला पोहोचायला एक लाख वर्षं लागतात.



पिकलेलं केळं अंधारात निळ्या रंगाचं दिसतं.

फोटो घेताना बल्गेरियामधले नागरिक 'कॅबेज' (Cabbage) असे म्हणतात. तर इतर सर्व देशांतील नागरिक 'चीज' (Cheese) असे म्हणतात.

आपल्या शरीरातल्या संपूर्ण हाडांपैकी २६ टक्के हाडे ही आपल्या मनगट आणि हातात असतात.

शास्त्रीय संगीत ऐकून गायी भरपूर दूध देऊ शकतात.

**हे खाऊन बघा!**

टॅकोज! हा शब्द किंवा हा मेन्यू हॉटेलमध्ये कधी दिसत नाही. १८व्या शतकात काही मेक्सिकन लोक जे चांदीच्या खाणींमध्ये काम करत, त्या लोकांनी गनपाऊडर म्हणून टॅकोजचा वापर केला. जेव्हा काही शेफ लोकांनी टॉरटील नावाच्या मध्यम जाडीच्या पोळीमध्ये भाजी आणि मांसाहारी पदार्थ

भरले तेव्हा चंद्राच्या आकाराचा हा पदार्थ अस्तित्वात आला. सर्वांत प्रसिद्ध अशी टॅकोजची रेसिपी म्हणजे टॅकोज दे मिनेरो व मायनस टॅको.

✍ युनायटेड स्टेट्समधल्या लोकांनी 'सालसा' नावाच्या सॉसपेक्षा केचपवर पैसे जास्त खर्च केले.

✍ ॲव्हाकॅडो या फळापासून गुआकामोल हा पदार्थ तयार होतो. हा शब्द मुळात ॲजटेकपासून तयार झाला आहे. नाहीतर याला ॲव्हाकॅडो सॉस असंही म्हणतात.

✍ नैसर्गिक चीझ (चेद्दार) याचा रंग पांढरा असतो आणि आपण जो नारिंगी रंग मार्केटमध्ये बघतो तो एका अन्नपदार्थ प्रक्रियेमधून आलेला असतो.

✍ काळे कडधान्य हे एक प्रकारच्या मशरूमप्रमाणे लागते.

✍ १९३९ पासून कणसाचे कवच असलेले टॅकोज यू.एस.मध्ये आहेत; पण मऊ टॉरटिलाज तेराव्या शतकापासून आहेत.

**चला स्वतःचे टॅकोज बनवू!**

टॅको हे एखाद्या कुरकुरीत सँडवीचसारखे असतात; पण टॉरटीला हे एखाद्या ब्रेडसारखे असतात ज्यांमध्ये आपण हवं ते भरू शकतो. चला तर मग आपल्या पालकांची मदत घेऊन मजेदार, चविष्ट टॅकोज बनवू.

१. स्किलेट हे मध्यम आचेवर गरम करावे. सहा ते आठ मिनिटांसाठी पाऊण किलो टर्की, मटण किंवा चिकन शिजवून घ्यावे.

२. त्यामध्ये एक चमचा जिरे पावडर आणि ३/४ चमचे मीठ घालावे. दोन ते तीन मिनिटे मिश्रण ढवळावे.


३. मग आठ टॅको शेल्समध्ये मटण, एक किसलेले ॲव्हा-कॅडोचे फळ, १/२कप आंबट क्रिम आणि १/२ कप सालसा सॉस घालावा.




४. वरून चीज (चेद्दार) भुरभुरावे.

**– निहारिका देशमुख**

## ठिपके जोडा आणि बघा काय तयार होईल.



# सावली ओळखा



# आमची चिकन सूप मालिकेतील नवीन पुस्तके




चिकन सूप फॉर द
फादर ॲण्ड सन सोल भाग १




चिकन सूप फॉर द
फादर ॲण्ड सन सोल भाग २




चिकन सूप फॉर द
सिस्टर्स सोल भाग २




चिकन सूप फॉर द
सिस्टर्स सोल भाग ३




चिकन सूप फॉर द सोल
थिंक पॉझिटिव्ह भाग १




चिकन सूप फॉर द सोल
थिंक पॉझिटिव्ह भाग २

**RNI NO-MAHMAR/2000/2739**

Regd.No.:PCW/086/2015-2017/ Posted at Marketyard Pso, Pune


Publishing Date : 11 Sep, 2016. Posting Date : 11 Sept, 2016.

# - नवं कोरं -











**मेहता मराठी ग्रंथजगत**

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,

टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति, ______________________________

______________________________

______________________________

______________________________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.